आंदोलन

वर्ष 16 | अंक 11 | मूल्य 25/-

शाश्वत विकासासाठी

जून 2025 | पृष्ठे 36

विनाशकारी विकास थांबवूया
हवामान संकट परतवूया

विकासाच्या हव्यासाने झाला पर्यावरणाचा ऱ्हास
उष्णतेच्या लाटेवरुन अवकाळीने केला घात

आंदोलन
शाश्वत विकासासाठी

जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वयाचे मासिक संवाद माध्यम

शाश्वत विकास न्यासाचा उपक्रम

वर्ष सोळावे, अंक अकरावा

जून २०२५ ✠ मूल्य रु. २५/-

- **संपादक**
  मेधा पाटकर

  संपादक मंडळ
  प्रा. सुभाष वारे, मीनल उत्तुरकर, अमेय तिरोडकर, सुनीती सु. र., सुरेश सावंत, साधना दधीच, मिलिंद चंपानेरकर, राज असरोंडकर
- **कार्यकारी संपादक**
  संजय मंगला गोपाळ
  ९८६९९८४८०३
- **व्यवस्थापक**
  शरद जोशी
  ७०४५००३६४०
- **पत्रव्यवहार व वर्गणी पाठविण्याचा पत्ता**
  आंदोलन शाश्वत विकासासाठी
  द्वारा शरद जोशी
  बी/९, मेघमल्हार, गावंड पथ,
  मल्हार सिनेमा जवळ, नौपाडा,
  ठाणे (प.) ४००६०२
- **अक्षर मांडणी**
  पंकज गुरव
- **मुखपृष्ठ मांडणी**
  प्रतीक ठाकूर
- **मुखपृष्ठावरील छायाचित्रे**
  'आंदोलन'च्या संग्रहातून व इंटरनेटवरून
- **मुद्रणस्थळ**
  श्री गुरुकृपा प्रिंटर्स, माहिम, मुंबई - १६
- **शाश्वत विकास न्यासाचे कार्यालय :**
  द्वारा - ६, राघव, श्री रघुराज सोसायटी, सिंहगड रस्ता, पुणे ४११०३०
- दर महिन्याच्या १ तारखेला प्रसिद्ध होते.
- अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

संपादकीय/आता वेळ आहे युद्धाच्या विरोधात आणि शांतता व न्यायाच्या बाजूने उभे राहायची/ NAPM/ ३

राजकारण/दारे उघडा, सूक्ष्म पातळीवर सुधारणा करा/ योगेंद्र यादव/ ६

टिप्पणी/ पर्यावरणद्वेषी पळवाटा/ लोकसत्ता/ ८

टिप्पणी/सैन्यदलाच्या राजकीयीकरणाचे दोषी !/ महेश सरलष्कर/ १०

टिप्पणी/व्यारा सरकारी रुग्णालयाच्या खाजगीकरणाच्या विरोधात राज्यपालांना निवेदन/ राष्ट्रीय स्वास्थ्य अधिकार समन्वय (संलग्न NAPM)/ १२

टिप्पणी/पहलगामपासून 'सिंदूर'पर्यंत... एकतेच्या परीक्षेवर भारत कुठे उभा आहे?/ मिथिला राऊत/ १४

टिप्पणी/उष्णतेची लाट ही आपत्ती यादीत समावेश करण्यासाठी अधिसूचना जारी करण्याबाबत मुख्यमंत्र्यांना पत्र/ NAPM महाराष्ट्र/ १६

टिप्पणी/अनौपचारिक कामगारांसाठी उष्णतेच्या लाटेसंबंधी मार्गदर्शक तत्त्वे/ नॅशनल अलायन्स फॉर क्लायमेट अँड इकोलॉजिकल जस्टिस (NACEJ-NAPM)/ १७

टिप्पणी/पंजाबमध्ये महिला शेतकरी नेत्या व शिक्षिकांवर पोलिस अत्याचार/ मीनल उत्तुरकर/ २२

विशेष/पर्यावरण जगवण्यासाठी लोकशाहीचे आरोग्य महत्वाचे/ इंदवी तुळपुळे/ २३

खास वृत्तांत/NAPM राष्ट्रीय अधिवेशनात पर्यावरण संकटावर गट चर्चा/ सुहास कोल्हेकर/ २८

खास वृत्तांत/NAPM च्या ३० व्या राष्ट्रीय संमेलनात श्रमिकांना न्याय मिळवून देण्याचा निर्धार/ जगदीश खैरालिया/ ३२

आघाडीवर/पंढरपूरमध्ये समता वारी संपन्न/ दादासाहेब रोंगे/ ३४

कृपया वर्गणीचे दर वाढविण्यात आलेले आहेत

कार्यकर्ते/विद्यार्थ्यांना वर्गणीत सवलत मिळू शकेल.
खाली दिलेल्या ईमेल किंवा मोबाईलवर सवलतीसाठी संपर्क साधा.
आंदोलन शाश्वत विकासासाठीची वर्गणी भरा आता ऑनलाईन!

Name of A/c.: Andolan Shashwat Vikasasathi
Bank Of India, Naigaum Cross Road Branch, Dadar (East), MUMBAI 400014. Current A/c No.: 003520110001099, IFSC: BKID0000035

वर्गणी ऑनलाईन जमा केल्यानंतर खाली दिलेल्या ईमेल किंवा मोबाईलवर मेसेज करून लागलीच कळवा! ईमेल : andolan.magazine@gmail.com
मोबाईल : 9869984803/ 9869392013/ 7045003640

जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय - मराठी संवाद माध्यमाचा अंक - वर्ष २९ अंक ६

कार्यालय : आंदोलन शाश्वत विकासासाठी, द्वारा केमिकल मजदूर सभा, २९-३०, पहिला मजला, ए विंग, हाजी हबीब बिल्डिंग, नायगांव क्रॉस रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०००१४.

वार्षिक वर्गणी - व्यक्ती - रु. ३००/- संस्था - रु. ४००/-
१२ वर्षांची वर्गणी - व्यक्ती रु. ३,०००/- संस्था - रु. ४,०००/-

• आपण एकाहून अधिक वर्षांसाठी वर्गणी भरू शकता. • चेक/ड्राफ्ट 'आंदोलन शाश्वत विकासासाठी' ह्या नावाने काढावा. • वर्गणी शक्यतो चेक/ड्राफ्टनेच पाठवावी • तसे शक्यच नसल्यास मनिऑर्डरने पाठवावी.

• चेक/ड्राफ्ट/मनीऑर्डर ठाण्याच्या पत्त्यावरच पाठवाव्या.

संपादकीय

आता वेळ आहे युद्धाच्या विरोधात आणि शांतता व न्यायाच्या बाजूने उभे राहायची

पहलगाम घटनेला महिना पूर्ण: दहशतवादी हल्ल्याप्रकरणी सरकारने जबाबदारी स्वीकारावी, दहशतवाद्यांवर तातडीने कारवाई व्हावी. युद्धाकडे ढकलण्याच्या प्रयत्नांना विरोध करा: भारत व पाकिस्तानमधील शांततेवर प्रेम करणाऱ्या नागरिकांसाठी इशारा आणि आवाहन.

२२ एप्रिल २०२५ रोजी, जम्मू-काश्मीरमधील सौंदर्यसंपन्न आणि लोकप्रिय पर्यटनस्थळ असलेल्या पहलगामच्या बैसरण कुरणावर, चार सशस्त्र दहशतवाद्यांनी २५ भारतीय आणि एका नेपाळी नागरिकाची थेट गोळ्या झाडून हत्या केली. ही घटना केवळ एक दहशतवादी हल्ला नव्हती, तर ती एक जबर मानसिक आघात करणारी क्रूरता होती, जी अनेक कुटुंबांच्या जीवनात कायमचा आघात करून गेली.

हा हल्ला केवळ हिंसक नव्हता, तर त्यात नियोजनबद्ध निर्दयता दिसून आली. देशभरातून तसेच आंतरराष्ट्रीय समुदायातून या घटनेचा तीव्र निषेध करण्यात आला. मात्र, आज एक महिना उलटून गेला तरीही, अनेक मूलभूत प्रश्न अनुत्तरित आहेत, आणि त्याचे उत्तर शोधण्याऐवजी सरकारकडून गोंधळ व दिशाभूल सुरू आहे. या घटनेत बळी गेलेल्या कुटुंबांना आम्ही भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो आणि त्यांच्या न्यायाच्या लढ्यात पूर्ण समर्थन आणि ऐक्य व्यक्त करतो.

सुरक्षाव्यवस्थेतील भेद उघड करणारी घटना

काश्मीर हे जगातील सर्वाधिक लष्करीकरण झालेलं क्षेत्र मानलं जातं. अनुच्छेद ३७० रद्द झाल्यापासून केंद्र सरकारने तेथील संपूर्ण प्रशासन व नियंत्रण स्वत:कडे घेतले आहे. विरोधाचे सर्व स्वरूप दडपण्यात आले आहे आणि 'दहशतवादविरोधी कारवाई' आणि 'विकास'च्या नावाखाली लोकशाहीची गळचेपी होत आहे. तरीही, अशा संवेदनशील आणि सुरक्षा-सज्ज भागात, चार heavily armed दहशतवादी सहजतेने शिरतात, निर्दोष नागरिकांची हत्या करतात आणि कुणालाही कळू न देता पळूनही जातात, हे अत्यंत गंभीर आणि धक्कादायक आहे. ही घटना सरळ सरळ सुरक्षा व्यवस्थेतील भेद उघड करणारी आहे. लष्करीकरणाला केंद्र स्थानी ठेवून जे प्रशासन चालवले जाते ते सपशेल अपयशी ठरले आहे.

NAPM सह देशभरातील लोकशाहीवादी संघटनांनी या घटनेचा तीव्र निषेध केला असून, यासंदर्भात केंद्र सरकारला खालीलप्रमाणे स्पष्ट प्रश्न विचारले जात आहेत:

1. अशा कडक सुरक्षा व्यवस्थेमध्येही हे ४ सशस्त्र दहशतवादी शिरले कसे?
2. बैसरणसारख्या लोकप्रिय पर्यटन स्थळी सुरक्षा कर्मचारी हजर का नव्हते?
3. दहशतवाद्यांना इतका वेळ गोळीबार आणि हत्या करायला कसा मिळाला ? ते चालू असताना प्रतिसाद देण्यासाठी सुरक्षा यंत्रणा तिथे लगेच का पोहोचल्या नाहीत ?
4. आरोपी दहशतवादी घटनास्थळावरून कुणाच्याही नजरेत न पडता निसटले कसे आणि तरी त्यांचा माग कसा लागला नाही ?
5. त्यांची ओळख लगेच हत्याकांडाच्या दुसऱ्या दिवशी पटली असतानाही, त्यांना अजून अटक करणे लष्कराला कसे शक्य झाले नाही ?

पीडित महिलांवर उजव्या विचारसरणीची ट्रोलिंग निषेधार्ह

या क्रूर घटनेनंतर जेव्हा काही पीडित महिलांनी आपल्या दु:खाचा वापर करून मुस्लिम आणि काश्मिरी समाजाविरुद्ध द्वेष निर्माण करण्यास नकार दिला, तेव्हा त्यांना सोशल मीडियावर उजव्या विचारसरणीच्या मंडळींकडून विटंबना व ट्रोलिंगला सामोरे जावे लागले. या महिलांनी अत्यंत परिपक्वता व धैर्य दाखवत आपल्या दु:खाचं राजकारण होऊ दिलं नाही, या बद्दल त्यांना सलाम ! समाजातील अशा संवेदनशील आणि समंजस आवाजांवर दबाव आणण्याचा हा प्रकार लोकशाहीविरोधी आहे.

दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर वाढती द्वेष भावना

पहलगाम हल्ल्याच्या दुसऱ्याच दिवशी काश्मीरच्या अनेक शहरात नागरिकांकडून मोठे मोर्चे काढून या दहशतवादी

हल्ल्याचा निषेध करण्यात आला. पण पहलगाम हल्ल्यानंतर आणि 'ऑपरेशन सिंदूर' नंतर देशात हिंदुत्ववादी गटांकडून देशातील इतर भागात राहणाऱ्या, शिकणाऱ्या, नोकरी व्यवसाय करणाऱ्या काश्मिरी नागरिकांविरोधात आणि मुस्लिम नागरिकांविरोधातही विद्वेषी प्रचार व हिंसाचार वाढला आहे. १०० हून अधिक प्रकरणे अशा धमक्यांची, मारहाणीची आणि द्वेषमूलक वक्तव्यांची नोंद झाली आहे. माध्यमांकडून लष्कराच्या कारवायांचे राजकारण करण्यात आले, आणि काही वरिष्ठ राजकारणी नेत्यांकडून अत्यंत गैरजबाबदार विधानं झाली - ज्यात मध्य प्रदेशचे एक मंत्री विजय शाह कर्नल सोफिया कुरेशी यांना 'दहशतवाद्यांची बहीण' म्हणतात, तर मध्य प्रदेशचे उपमुख्यमंत्री 'लष्कर मोदींच्या पाया पडतं' असं अपमानास्पद वक्तव्य करतात. हे सगळं लष्कराच्या सन्मानालाही धक्का देणारे आहे.

NAPM ची मागणी आहे की या संपूर्ण प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी तातडीने करण्यात यावी आणि तिचे निष्कर्ष सार्वजनिकपणे जाहीर करण्यात यावेत. या २६ नागरिकांच्या मृत्यूला थेट जबाबदार असलेले गृह मंत्रालय आणि संबंधित मंत्री यांना जबाबदारी स्वीकारावी लागेल. त्यांनी आपल्या पदाची जबाबदारी मान्य करून योग्य ती कृती करावी, अन्यथा पदाचा राजीनामा द्यावा.

'ऑपरेशन सिंदूर' चे वास्तव

पहलगाममधील हत्याकांडानंतर भारतीय राज्यकर्त्यांनी पाकिस्तानच्या हद्दीत असलेल्या ९ ठिकाणांवर लष्करी हल्ले केले, ज्यांना त्यांनी 'दहशतवादी कॅम्प्स' असे संबोधले. या कारवाईला 'ऑपरेशन सिंदूर' असे नाव देण्यात आले हे नावच पितृसत्ताक मानसिकतेचे प्रतीक असल्याची टीका झाली आहे. या मोहिमेमुळे अपेक्षेप्रमाणे, पारंपरिक युद्धसामग्रीचा वापर करून दोन अण्वस्त्रधारी देशांमध्ये संघर्ष अधिक तीव्र झाला.

या संघर्षात सीमाभागातील लष्करी तसेच नागरी ठिकाणांवर हल्ले करण्यात आले, ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर जीवितहानी आणि मालमत्तेचे नुकसान झाले, विशेषत: सीमेलगतच्या गावांमध्ये. अधिकृत माहितीनुसार, भारतात १६ नागरिक आणि ५ लष्करी कर्मचारी मृत्युमुखी पडले, तर पाकिस्तानमध्ये हेच आकडे अनुक्रमे ४० आणि ११ होते. अनेक जखमी आणि विस्थापित झाले असून, प्रत्यक्ष आकडे आणखी मोठे असल्याचा अंदाज आहे. या लष्करी कारवाईनंतर निर्माण झालेल्या युद्धजन्य अराजकतेला शेवटी १० मे रोजी अमेरिकेच्या मध्यस्थीनंतर युद्धविरामाच्या माध्यमातून थांबवण्यात आले, असे अनेक अहवाल सांगतात.

तरीही नंतर काही हल्ले प्रतिहल्ले झाले पण शेवटी काही संवेदशील नागरिकांनी घेतलेली संयम आणि शांतीची भूमिका योग्य ठरून सैन्य कारवाई थांबवण्यात आली. युद्धाची ही एक क्रूर विडंबना आहे की, युद्धासाठी जयघोष करणारे लोक आपल्या सुरक्षित घरात किंवा टीव्ही स्टुडिओत बसून आनंद व्यक्त करतात, तर युद्धाच्या थेट झळा सहन करणारे हे कामगारवर्गातील कुटुंबांचे सदस्य असतात - ज्यांना सतत 'राष्ट्रासाठी बलिदान' द्यायची अपेक्षा केली जाते.

जनतेने युद्धखोरी आणि उन्मादी राष्ट्रवादाच्या विरोधात ठाम भूमिका घेणे आवश्यक आहे. युद्धातून नेमकं कोणाला फायदा होतो आणि कोणाचं नुकसान होतं, हा मूलभूत प्रश्न विचारला पाहिजे. दहशतवादी हल्ले आणि युद्धांच्या पार्श्वभूमीवर परराष्ट्र धोरणातील अपयशाचे चिकित्सक विश्लेषण करणे गरजेचे आहे.

कष्टकरी वर्गाच्या संघर्षशील चळवळींची अखिल भारतीय आघाडी म्हणून, NAPM युद्धाच्या विरोधात ठाम भूमिका घेते आणि सर्व राजकीय मतभेदांचा शांततेच्या मार्गाने समाधान व्हावे, यासाठी आग्रह धरते.

मुख्य माध्यमांच्या धोकादायक भूमिका

सलग चार दिवस, भारतीय प्रसारमाध्यमांनी जवळजवळ कोणतीही अपवाद न ठेवता भारतीय नागरिकांविरोधात चुकीची माहिती पसरवण्याचे २४X७ मोहिमेचे स्वरूप घेतले. विशेषत: टीव्ही वृत्तवाहिन्यांवर अत्यंत बिनबुडाच्या बनावट बातम्या आणि युद्धाचे खोटे सावट यांचे साम्राज्य पसरले होते.

या प्रकारामुळे नागरिकांमध्ये अस्वस्थता आणि भीती निर्माण झालीच, पण अधिक गंभीर बाब म्हणजे भारतातील परवानाधारक प्रसारमाध्यमांनी भारताच्या लष्करी कारवायांचे आंतरराष्ट्रीय स्तरावर चुकीचे चित्र उभे केले. भारत सरकार आणि लष्कराने वारंवार सांगितले की त्यांच्या कारवाया मर्यादित आणि सावधगिरीने आखलेल्या होत्या, जेणेकरून पाकिस्तानमधील सामान्य नागरिकांचे नुकसान टाळता येईल. तरीही भारतीय प्रसारमाध्यमांनी भारतीय लष्कराने पाकिस्तानी शहरे उद्ध्वस्त केली आणि ताब्यात घेतली असल्याचे मनमानी दावे

सातत्याने सादर केले.

या माध्यमांनी देशांतर्गत राजकीय वातावरणही दूषित करण्याचा प्रयत्न केला, आणि या संघर्षाला सांप्रदायिक रंग देण्याचे उद्दिष्ट ठेवले. या मुळे भारतीय माध्यमांची विश्वासार्हता पार धुळीला मिळाली. ही अत्यंत चिंताजनक घडामोड आहे, आणि भारतीय जनतेने ती अत्यंत गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. ही घटना स्पष्टपणे दाखवते की प्रसारमाध्यमे विशेषत: टीव्ही वृत्तवाहिन्या केवळ अविश्वसनीयच नाहीत, तर संकटाच्या काळात राष्ट्रीय हिताच्या विरोधात काम करणारे धोकादायक घटक आहेत. त्यांची पत्रकारिता ही पूर्णत: राजकीय हेतूंनी प्रेरित असून सत्ताधाऱ्यांना सुखवण्याच्या उद्देशाने तयार केली जाते अगदी त्या वेळीही, जेव्हा सत्ताधारी पक्षाने देशाला अणुयुद्धाच्या उंबरठ्यावर नेलेले असते. जर भारतात खरे देशद्रोही कोणी असतील, तर त्या यादीत या टीव्ही वृत्तवाहिन्या अगदी वरच्या क्रमांकावर असतील.

युद्धासाठी पाण्याचा हत्यार म्हणून वापर

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याच्या प्रत्युत्तरात भारत सरकारने एकतर्फीपणे सिंधू पाणी करार स्थगित ठेवण्याची घोषणा केली. या कृतीचा उद्देश थेट पाकिस्तानमधील सामान्य नागरिकांना, विशेषत: सिंधू नदीच्या पाण्यावर आपल्या अन्नधान्य आणि पिकांच्या शेतीसाठी अवलंबून असलेल्या लहान शेतकऱ्यांना लक्ष्य करणे आहे.

सत्तेचा गैरवापर : युद्धजन्य राजकारण

सत्तेवर असलेल्या पाकिस्तानी सुरक्षा गटांनी आणि भारतातील हिंदुत्ववादी गटांनी लष्करी मोहिमांचा वापर करून आपली राजकीय प्रतिमा मजबूत करण्याचा प्रयत्न केला आहे, तो सीमेच्या दोन्ही बाजूच्या सामान्य नागरिकांच्या हिताला मारक आहेत. अशा मोहिमा देशाच्या दीर्घकालीन धोरणात्मक प्रगतीलाही मारक ठरतात. केवळ 'मजबूत नेता' म्हणून स्वत:ला प्रस्थापित करण्यासाठी युद्धाच्या दिशेने वाटचाल करणे हे राष्ट्रविरोधी आहे. यामुळे भारतात लोकशाही संस्थांचा संकोच होईल आणि सैनिकीकरणाच्या राजकारणाला चालना मिळेल.

भारत आणि पाकिस्तानमधील सामान्य नागरिकांच्या हिताविरुद्ध कार्य करणाऱ्या सत्ताधाऱ्यांचा विरोध करणे, हीच खरी देशभक्ती आहे. फक्त दोन्ही देशांतीलच नव्हे तर संपूर्ण दक्षिण आशियातील लोकशाहीवादी, प्रगतीशील शक्तींनी युद्धविरोधी लढ्यांसाठी एकत्र यावे. सर्व नागरिकांनी शांतता आणि लोकशाही टिकवण्यासाठी पुढाकार घ्यावा. केवळ सैन्य आणि सत्ताधाऱ्यांचे धोरण चालेल की लोकांचे अधिकार हा प्रश्न ऐरणीवर आहे.

NAPM च्या स्पष्ट मागण्या

1. 22 एप्रिलच्या पहलगाम हल्ल्याच्या संदर्भातील सुरक्षा चुकांची सखोल चौकशी करण्यात यावी, त्याचा अहवाल जनतेपुढे आणावा.
2. काश्मीरमध्ये लोकशाहीचा विस्तार होणे आवश्यक आहे - यात राज्याचा दर्जा पुन:स्थापित करणे, नागरिकांचा विश्वास मिळवणे आणि मूलभूत हक्कांचे रक्षण यांचाही समावेश आहे.
3. ऑपरेशन सिंदूरवरील संपूर्ण माहिती व पार्श्वभूमी स्पष्ट करणारा शासकीय श्वेतपत्र (White Paper) प्रकाशित केला जावा. त्या मध्ये लष्करी कारवाईची संपूर्ण माहिती व त्यात झालेल्या नुकसानीची ही माहिती द्यावी जेणेकरून वास्तव मूल्यांकन करता येईल.
4. भारत-पाकिस्तान या दोन्ही राष्ट्रांनी युद्ध किंवा अणुयुद्धाच्या दिशेने जाण्याचे कोणतेही पाऊल उचलण्याचे टाळावे. सर्व प्रश्न मुत्सद्दीगिरीने शांततापूर्ण संवादातून सोडवले जावेत.
5. भारताने काश्मीरमध्ये लोकशाही पद्धतीने चालणाऱ्या आंदोलनांचे दमन थांबवावे. पाकिस्तानने आपल्या भूमीवर दहशतवादी गटांविरोधात ठोस कारवाई करावी. दोन्ही देशांनी या भागाचे सैनिकीकरण कमी करावे आणि लोकशाहीचे पालन करावे.
6. भारतीय प्रसारमाध्यमांवर (विशेषत: टीव्ही चॅनेल्सवर) एक स्वतंत्र चौकशी समिती नेमली जावी. चुकीच्या बातम्या आणि अपप्रचार पसरवल्यास त्यांचे परवाने रद्द करण्यात यावेत आणि त्यांच्या मालकांना दोषी ठरवावे.
7. सिंधू जल करार पुन्हा प्रभावीपणे राबवला जावा आणि पाणी हे युद्धाचे नाही तर सहकार्याचे साधन असावे - विशेषत: हवामान बदलाशी लढण्यासाठी.

भारत आणि पाकिस्तानमधील सर्व शांतताप्रिय नागरिकांनी आणि नागरिक समाजातील घटकांनी एकत्र येत, दोन्ही देशांत एक मजबूत युद्धविरोधी चळवळ उभारणे अत्यावश्यक झाले आहे.

आता वेळ आहे शांती, न्याय आणि उत्तरदायित्वाच्या बाजूने उभे राहण्याची. आपल्याला युद्ध, द्वेष आणि दहशतीला नकार देत लोकशाही आणि मानवतेच्या मार्गावर पुढे जायचं आहे.

जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय (NAPM)

राजकारण

दारे उघडा, सूक्ष्म पातळीवर सुधारणा करा

योगेंद्र यादव

जातीनिहाय जनगणनेची घोषणा ही सामाजिक न्यायाच्या धोरणे व राजकारणाच्या नव्या पर्वाची सुरुवात आहे. सरकारच्या नाट्यमय घोषणेनंतर निर्माण झालेल्या धुळीतून जेव्हा स्पष्टता येईल, तेव्हा जातिव्यवस्थेविषयीच्या चर्चांना नवीन दिशा मिळेल. जेव्हा सर्वोच्च नेत्याने स्वत:च आपली भूमिका बदलली आहे, तेव्हा या साध्या संकल्पनेभोवती निर्माण झालेला अपप्रचार, अर्धसत्ये यांचा धुरकट पडदा दूर होईल. मागील तीन दशके ओबीसींना कायदेशीर संरक्षण देत असताना त्यांची गणना न करता पुढे नेण्याचा हास्यास्पद प्रकार संपुष्टात येईल. आता चर्चेचा केंद्रबिंदू "जातीनिहाय जनगणना का ?" यावरून "कधी, कशी आणि पुढे काय ?" यावर सरकतो. सकारात्मक कृती (affirmative action) संदर्भातील चर्चा यानंतर पूर्वीसारख्या राहणार नाहीत.

सध्या सुरू असलेल्या नरेंद्र मोदी सरकारच्या हेतूंवरील चर्चेत फार काळ अडकून राहण्याची गरज नाही. हा एक राजकीय निर्णय आहे, जसे निवडणुकीच्या लोकशाहीतली बहुतेक मोठे निर्णय असतात, चांगले असोत वा वाईट. राहुल गांधी यांनी जातीनिहाय जनगणनेचा मुद्दा पुढे रेटल्यामुळे भाजपच्या लोकप्रिय पण असुरक्षित असलेल्या सवर्णां व्यतिरिक्त मतदार आधाराला धोका वाटल्याने पंतप्रधानांनी केलेली ही एक आगाऊ कृती आहे.

अश्विनी वैष्णव यांनी ही जनगणना रोखल्याचा आरोप काँग्रेसवर टाकला, पण तो त्यांच्यावरच उलटला आहे. खरं पाहता, जातीनिहाय जनगणनेचा प्रस्ताव गाडून टाकण्याचे मूळ पाप २००० मध्ये वाजपेयी सरकारने केलं. २०११ मध्ये काँग्रेस सरकारने ही जातगणना जनगणनेपासून वेगळी केली, पण भाजप सरकारने २०११ च्या या सामाजिक–आर्थिक–जात गणनेचा (Social – Economic Caste Census - SECC) डेटा दाबून ठेवला.

त्याचप्रमाणे, या उपक्रमाचे श्रेय कोणाला, यावरील वादही लवकरच विस्मरणात जाईल. इतिहास अभ्यासण्याची मानसिकता असलेल्यांसाठी तर या संकल्पनेचे श्रेय राममनोहर लोहिया यांच्या सामाजिक न्याय चळवळीला, तसेच कर्पूरी ठाकूर, मधु लिमये यांच्यासारख्या जात गणनेची सतत मागणी करणाऱ्यांना व शरद यादव, ज्यांनी जातगणनेला आपले जीवनकार्य बनवले, त्यांना जाते. धोरणात्मक दृष्टिकोनातून पाहता, ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्याचे श्रेय पूर्वीच्या बिहारमधील आरजेडी–जेडीयू सरकारला व सध्याच्या तेलंगणा सरकारला दिले पाहिजे. पण राजकीय दृष्टीने पाहता, राहुल गांधी यांना हे श्रेय द्यावे लागेल. या उपक्रमाला महत्व मिळालं नसतं जर त्यांनी जातगणनेचा मुद्दा स्वत:च्या प्रतिष्ठेशी जोडला नसता आणि काँग्रेसला ही मागणी आघाडीवर आणण्यासाठी भाग पाडलं नसतं. विरोधी पक्षनेते म्हणून नि:संशयपणे हे त्यांचे पहिलं मोठं धोरणात्मक यश मानलं जाईल.

जेव्हा चर्चेचा रोख "कसा करायचा ?" याकडे वळतो, तेव्हा तातडीने लक्ष देण्याच्या तीन गोष्टी आहेत, ज्यामुळे जातीनिहाय जनगणना वेळेत व अचूक होईल:

१) २०११ मधील अपयशातून धडा घेतला पाहिजे जातगणना ही सामान्य जनगणनेचाच भाग असली पाहिजे, स्वतंत्र उपक्रम म्हणून नव्हे.

२) ही गणना संपूर्ण असली पाहिजे. केवळ आरक्षित जातीं पुरती (SC, ST, OBC) मर्यादित न ठेवता सर्व सामान्य गटांतील जातींचीही गणना झाली पाहिजे, म्हणजे जातसापेक्ष सवलतींचं संपूर्ण चित्र स्पष्ट होईल.

३) ही जनगणना राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी (NPR) किंवा तत्सम कोणत्याही गोष्टीशी जोडून घोटाळा करण्याचा प्रयत्न होऊ नये.

यापलीकडे, अधिक गंभीर मागणी ही आहे की जातीनिहाय संसाधने व संधींचे विश्लेषण करणारी सविस्तर माहिती मिळवावी. आत्तापर्यंतची जनगणना व्यक्तीच्या (वय, शिक्षण, व्यवसाय, भाषा, धर्म, जात वगैरे) व घराच्या (घराचा प्रकार, मूलभूत सोयी आणि काही मालमत्ता) काही मूलभूत बाबी नोंदवते. जाती गणनेची घोषणा म्हणजे जनगणने मध्ये प्रत्येक व्यक्तिची जात नोंदवली

जाईल (फक्त अनुसूचित जात, जमात आणि अन्य मागास वर्गीय असं नाही, जसं आत्तापर्यंत होत होतं).

तरीही, इथे प्रत्येक जातीच्या आर्थिक व सामाजिक स्थितीविषयी सखोल माहिती नोंदवत नाही जसे की जमिनीचे मालकी हक्क, उद्योग, सरकारी नोकऱ्या, इ. पण २०११ च्या SECC मध्ये ही माहिती विचारली गेली होती. आता नव्या जनगणनेच्या वेळेस हे सगळे घटक जनगणनेच्या घरगुती माहितीच्या फॉर्म मध्ये सामावून घ्यावे लागतील.

तरीही, काही छोट्या पण महत्त्वाच्या बाबी आहेत ज्या कोणतीही जनगणना टिपू शकणार नाही जसे की मोठ्या कंपन्यांच्या मालकी हक्क व संचालकपद, उच्च सरकारी पदं, खासगी क्षेत्रातील मोठ्या नोकऱ्या, देशातील सर्वोच्च शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश, व राजकीय नेतृत्व. या साठी पूरक माहिती संकलन आवश्यक आहे जसे की जातींच्या अधारे राष्ट्रीय स्तरावर संसाधन, संधी व अधिकारांची सूची तयार करणे. यासाठी विद्यमान सर्वेक्षणांमध्ये जात पद्धतशीरपणे समाविष्ट करावी लागेल उदाहरणार्थ, आर्थिक जनगणना, कृषी जनगणना, उच्च शिक्षणावरील सर्वेक्षण, NSSO च्या श्रम व ग्राहक सर्वेक्षण, नोंदणीकृत कंपन्यांच्या संचालकांची यादी, सार्वजनिक क्षेत्रातील कर्मचारी व लोकप्रतिनिधी यांची माहिती इत्यादी.

शेवटचा आणि महत्त्वाचा टप्पा म्हणजे विद्यमान सकारात्मक कृतीच्या प्रणालीत सुधारणा करणे. जातगणना हे केवळ निदानाचे साधन आहे जर हे निदान वापरले गेले नाही, तर त्याचा काही उपयोग नाही. ही माहिती आर्थिक दुर्बल घटकांकरिता असलेल्या १०% आरक्षणाच्या वैधतेसंदर्भात स्पष्टता आणेल. काही जातींना ओबीसी यादीतून वगळणे किंवा समाविष्ट करणे आवश्यक ठरू शकते.

या माहितीद्वारे अनुसूचित जाती, जमाती आणि अन्य मागासवर्गीय गटांतील काही जातींकरिता उप–आरक्षण आवश्यक आहे का, याबाबत ठोस निर्णय घेता येतील. न्यायालये नेहमीच आरक्षणाच्या धोरणासाठी पुराव्यांची मागणी करत आली आहेत; जातगणनेद्वारे सबळ पुरावा मिळेल.

या सर्व सूक्ष्म सुधारणांव्यतिरिक्त, जातीनिहाय जनगणना दोन मोठ्या धोरणात्मक बदलांसाठी दारे उघडू शकते:

१) जर संसाधने आणि संधींमध्ये जातींच्या समूहांमध्ये आणि जातीं अंतर्गत मोठ्या प्रमाणात विषमता आढळली तर विद्यमान आरक्षण धोरण सूक्ष्म पातळीवर न्यावं लागेल. उदाहरणार्थ ही गणना ओबीसींच्या लोकसंख्येला बहुतेक ४५% पेक्षा अधिक दाखवेल, तर त्यांचे २७% आरक्षण वाढवावे लागेल. यासाठी सर्वोच्च न्यायालयाने ठरवलेली ५०% मर्यादा ओलांडावी लागेल जशी EWS आरक्षणाच्या वेळी सरकारने केली होती.

२) जर खाजगी क्षेत्रात विषमता अधिक आढळली, तर सकारात्मक कृतीचा विस्तार खाजगी नोकऱ्या, विद्यापीठे व महाविद्यालयांपर्यंत करावा लागेल. आता भाजप स्वत:ला सामाजिक न्यायाचा समर्थक म्हणवत आहे, तर त्याला काँग्रेसच्या प्रश्नाला प्रतिसाद द्यावा लागेल: सरकार तयार आहे का ५०% मर्यादा काढून टाकण्यासाठी, खाजगी क्षेत्रात आरक्षण लागू करण्यासाठी, व खाजगी शैक्षणिक संस्थांमध्येही सद्याचा आरक्षण कायदा लागू करण्यासाठी?

गेल्या दोन दशकांपासून सामाजिक न्यायाचं राजकारण व धोरण ठप्प झालं होतं. ही चळवळ ठराविक चौकटीत अडकून गेली होती; ठप्पपणा, विभागणी, अपप्रचार, बचावात्मक वृत्ती व अंतर्गत आव्हानांना नाकारणं यामुळं ती कमकुवत झाली. जातगणनेची घोषणा ही नव्याने सुरुवात करण्याची संधी आहे सार्वजनिक क्षेत्राच्या पलिकडे सकारात्मक कृती विस्तारण्याची, आरक्षणाच्या पलिकडे अन्य उपायांचा विचार करण्याची, आणि जात केंद्रित निकषांपलिकडे जाऊन समग्र समावेशाच्या दिशेने वाटचाल करण्याची.

yyopinion@gmail.com

अनुवाद: मीनल उत्तुरकर

meenalutturkar16@gmail.com

आंदोलन मासिकाची वर्गणी नियमितपणें जमा करा!

वर्गणी online/चेक/मनिऑर्डरनें पाठवा!!

वर्गणी जमा करण्याचे तपशील पान २ वर पहा!!!

- व्यवस्थापक

टिप्पणी

पर्यावरणद्वेषी पळवाटा

लोकसत्ता

‘पर्यावरण मंजुरी’ची वाट न बघता थेट प्रकल्प उभारू लागायचे, मग सरकारने ही मंजुरी ‘पूर्वलक्ष्यी प्रभावाने’ द्यायची; याला न्यायालयाने चाप लावला... या अधिसूचनेच्या विरोधात देशातील अनेक पर्यावरणवादी संस्था-संघटना-व्यक्ती यांनी निवेदने केली, पर्यावरण मंत्रालयाच्या संकेतस्थळावर या विरुध्द आक्षेप नोंदवले. तरीही सरकाराने ही अधिसूचना लागू केली होती!

पर्यावरण रक्षणाच्या मुद्द्यावर उक्ती आणि कृतीत प्रचंड विरोधाभास हा भारतातल्या कोणत्याही सरकारचा स्थायिभाव राहिला आहे. मग ते सरकार कोणत्याही पक्षाचे वा आघाडीचे असो. जे बोलायचे त्याच्या अगदी विरुद्ध करायचे, नंतर त्याचे समर्थन करताना देशाच्या प्रगतीसाठी उद्योग वा मोठे प्रकल्प कसे आवश्यक अशी भलामण करायची. ती करताना पर्यावरणाच्या रक्षणासाठी आम्ही कसे कटिबद्ध, असेही सांगत प्रतिमा जपण्याचा प्रयत्न करायचा, हेच आजवर दिसले. २०१४ नंतर विकासाची प्रचंड मोठी भूक असलेले सरकार सत्तेत आल्यावर या धोरणाला काही धरबंधच उरला नाही व पर्यावरणविषयक सर्व कायद्यांना मुरड घालून प्रकल्पांना मान्यता देण्याचा सपाटा सुरू झाला. त्याला पायबंद घालणारा निकाल सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी दिला. त्यासाठी न्यायमूर्तीद्वय अभय ओक व उज्ज्वल भुयान यांचे अभिनंदन! मुंबईतील वनशक्ती या पर्यावरण रक्षणासाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेने दाखल केलेल्या याचिकेवर निकाल देताना न्यायालयाने पूर्वलक्ष्यी प्रभावाने पर्यावरणीय मंजुरी देण्याची सरकारची पळवाटच बंद करून टाकली. ही वाट तयार करण्यासाठी सरकारने २०१७ साली काढलेली अधिसूचना व २०२१ मध्ये प्रसृत केलेली मानक कार्यपद्धती रद्द केली. त्यामुळे हा निर्णय दूरगामी परिणाम करणारा ठरतो.

पर्यावरण रक्षण करायचे असेल तर आहे ते जंगल राखले जावे यासाठी सत्तर व ऐंशीच्या दशकात अनेक कायदे करण्यात आले. १९८६ चा पर्यावरण रक्षण कायदा हा त्यातलाच एक. हेतू हाच की कुठल्याही कारणासाठी जंगल नष्ट करायचे असेल तर त्याची वेगवेगळ्या स्तरावर छाननी होऊन मगच निर्णय झाला पाहिजे. त्याला अनुसरून मग ‘पर्यावरण प्रभाव मूल्यांकन’ ही प्रक्रिया सक्तीची झाली. या सक्तीसाठी केंद्राने २००६ला अधिसूचनाही काढली. याच अधिसूचनेला विद्यमान मोदी सरकारने धाब्यावर बसवले व नवे नियम अमलात आणण्याचा प्रयत्न केला. तो या निकालातून न्यायालयाने हाणून पाडला आहे. जंगलक्षेत्रातील कोणत्याही प्रकल्पाला पर्यावरणीय मंजुरी मिळाल्यानंतरच सुरुवात करता येते हा आजवर करण्यात आलेल्या कायद्याचा मथितार्थ. हे सरकार तोच बदलायला निघाले होते. त्यामुळे सरकारकडून तत्त्वत: मान्यता मिळाल्यावर अशी मंजुरी घेण्याची वाट न बघता थेट प्रकल्प उभारणीलाच सुरुवात करायची हा प्रकार विविध उद्योग तसेच सरकारी आस्थापनांकडून रूढ होत गेला. सरकारच्या मूकसंमतीशिवाय हे शक्यच नव्हते.

नंतर याच उद्योगांना पर्यावरणीय मान्यता देण्यासाठी सरकारने एक खिडकी योजना सुरू केली. त्यात पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्या २५५ प्रकल्पांना मान्यता देण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला. हे सरळसरळ कायद्याचे उल्लंघन होते. अशी प्रकल्पोत्तर मान्यता देणे योग्य नाही असे म्हणत स्वयंसेवी संस्था न्यायालयात गेल्यावर २०२१ मध्ये या योजनेवर स्थगिती आली. तोवर सरकारने ५५ प्रकल्पांना मान्यता देऊन टाकली होती. यात अनेक खाणप्रकल्प, स्टीलउद्योग, विमानतळ, मद्यानिर्मितीचे कारखाने व काही सरकारी प्रकल्पांचा समावेश आहे. आता न्यायालयाने ही योजना अमलात आणण्यासाठी सरकारने काढलेल्या सर्व अधिसूचना बाद ठरवल्याने सरकार तोंडघशी पडले असले तरी पर्यावरण रक्षणाचे काय हा प्रश्न उरतोच. जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्याकडे झेप घेणारा देश या मुद्द्यावर किती बेफिकिरीने वागतो हे या निकालातून दिसले आहे.

देशाचा औद्योगिक विकास व्हायला हवा, त्याच्या आड कुणी येऊ नये हे मान्यच, पण तो साधताना प्रदूषण वाढणार नाही, वातावरणीय बदलाला कारणीभूत ठरणार नाही हाही दृष्टिकोन अंगी बाळगणे गरजेचे. नेमकी त्याचीच वानवा या सरकारमध्ये दिसते. या मुद्द्यावरून कुणीही एखाद्या प्रकल्पाला विरोध केला की त्याला थेट अर्बन नक्षल ठरवणे, तुरुंगात टाकणे, परदेशी हस्तक म्हणणे असे अश्लाघ्य प्रकार सत्ताधाऱ्यांच्या पातळीवर अलीकडे सुरू झाले. पर्यावरणाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक संस्थांची सरकारने मुस्कटदाबी केली ती याच काळात. त्यांना मिळणाऱ्या परदेशी निधीवर बंधने आणली. यामुळे अनेक संस्थांना गाशा गुंडाळावा लागला. पण याने वास्तव कसे बदलणार? नेमक्या त्याच वास्तवाचे भान हा निकाल देतो. देशात सध्या आठ लाख २७ हजार चौरस किलोमीटरचे क्षेत्र जंगलाने व्यापले आहे. म्हणजे एकूण भौगोलिक रचनेच्या २५ टक्के. हे क्षेत्र ३३ टक्क्यांपर्यंत नेण्याचे सरकारचेच उद्दिष्ट आहे. त्यासाठी २०५० पर्यंतची कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

गेल्या २५ वर्षांत केवळ सहा टक्के जंगल वाढले. त्यामुळे येत्या २५ वर्षांत हे उद्दिष्ट गाठणे कठीण. अशा स्थितीत आहे ते जंगल राखणे हेच सरकारचे कर्तव्य असायला हवे. प्रत्यक्षात गेल्या २५ वर्षांत ११ हजार ४३७ हेक्टर जंगल विविध प्रकल्पांच्या नावावर नष्ट करण्यात आले. सरकारच्या या धोरणामुळे हे नष्ट होण्याचे प्रमाण बेसुमार वाढले असते. या निकालाने नेमका त्यालाच चाप लावला आहे. पर्यावरणाचे रक्षण करणे हे सरकारचे सांविधानिक कर्तव्य आहे असे हा निकाल सांगतो. प्रत्येक नागरिकाला शुद्ध हवा, पाणी मिळते की नाही ते बघण्याचे काम सरकारचे. ते करायचे सोडून विकासाच्या नावावर निसर्गाची लूट करण्याचा अधिकार सरकारला नाही. पर्यावरणविषयक जागतिक परिषदेत (कॉप) कार्बन उत्सर्जन कमी करू अशी आश्वासने द्यायची. त्यासाठीची कालमर्यादा जाहीर करायची. पण प्रत्यक्षात दरवर्षी जागतिक पातळीवर जाहीर होणाऱ्या पर्यावरणीय मूल्यांकन निर्देशांकात भारत कायम तळाशी असतो. अलीकडची यादी तपासली तर भारत १८० देशांच्या यादीत १७६व्या क्रमांकावर आहे. जंगल नष्ट झाले की जैवविविधता संपुष्टात येते. यातही भारताचा क्रमांक १७० आहे. यावरून या क्षेत्रातील भारताची अधोगती तेवढी दिसते. कोणत्याही सरकारसाठी ही भूषणावह बाब कशी ठरू शकते?

पर्यावरणाचा ऱ्हास करत उद्योग विस्तार हे विकसित राष्ट्रांनी केव्हाच अमान्य केलेले तत्त्व. त्यामुळे जागतिक पातळीवर अनेक देशांत योग्य ते संतुलन राखत असे प्रकल्प मार्गी लावले जातात. भारताला हे संतुलन कधीच साधता आले नाही. सामान्यांच्या नजरेत भरेल असाच विकास विद्यमान सरकारला हवा असतो. त्यासाठी वाटेल तशी कायदेमोड करण्यासाठी तत्पर असलेले सत्ताधारी भविष्यात भेडसावणाऱ्या या संकटाचा विचार करणार तरी कधी? पर्यावरणाच्या ऱ्हासाचा थेट परिणाम वातावरण बदलावर होतो. त्याचे परिणाम आताच देशाला सहन करावे लागत आहेत. यामुळे निसर्गाचे चक्रच बदलून गेले आहे. उष्णता व अवेळी येणाऱ्या पावसाचा फटका सर्वच प्रांतांना बसू लागला आहे. हे वास्तवदेखील उद्योगप्रेमी आणि उद्योजकप्रेमी सरकार लक्षात घ्यायला तयार नाही.

सरकारच्या विरोधात जाणारा निकाल आला की त्याचे पालन करण्याऐवजी पुन्हा नवनवे कायदे करून न्याययंत्रणेला धुडकावून लावण्याचा प्रकार सरकारकडून केला जातो. किमान या प्रकरणात तरी सरकारने असे वागू नये ही अपेक्षा. कारण हा मुद्दा कोट्यवधी नागरिकांच्या जीवनमरणाशी संबंधित आहे. न्यायालयाने हा निकाल देताना आडवाटेने मंजुरी मिळवलेल्या ५५ प्रकल्पांविरुद्ध कोणतीही कारवाई प्रस्तावित केलेली नाही. हा एक प्रकारे अभय देण्याचाच प्रकार. आता हे प्रकल्प बंद केले तर मोठे नुकसान होईल हे सरकारचे मत न्यायालयाने ग्राह्य मानले. यावरच सत्ताधाऱ्यांनी समाधान मानणे इष्ट. सरकारने पुन्हा नव्या पऱ्यावरणद्वेषी पळवाटा शोधण्याचा प्रयत्न करू नये. तेच देशवासीयांच्या हिताचे आहे.

(दैनिक लोकसत्ता च्या सौजन्याने)

५ जून - जागतिक पर्यावरण दिन

यानिमित्त पर्यावरण, हवामान बदल, आदी मुद्द्यांवर कार्यक्रम करा. आपल्याकडे आयोजित कार्यक्रमांचे अहवाल आंदोलन कडे पाठवा.

टिप्पणी

सैन्यदलाच्या राजकीयीकरणाचे दोषी!

महेश सरलष्कर

सैन्यदलाला धर्माच्या राजकारणात खेचण्याचे काम भाजपचे काही नेते करतात, तेव्हा पक्षातून नाराजीही व्यक्त होत नसेल तर सैन्यदलाचा धर्माच्या राजकारणासाठी वापर या पक्षाला मान्य आहे, असा अर्थ निघू शकतो...

समाजवादी पक्षाचे राज्यसभेतील खासदार रामगोपाल यादव यांनी सैन्यदलातील महिला अधिकाऱ्यांच्या जातीसंदर्भात टिप्पणी केल्यानंतर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना राग आला. सैन्यदलातील अधिकाऱ्यांची तुम्ही जात का विचारली, असा संताप योगींनी व्यक्त केला. योगींचे म्हणणे होते की, सैन्यदलातील जवान वा अधिकारी कुठल्या जातीचे प्रतिनिधी नसतात, ते राष्ट्राचे प्रतिनिधी असतात, ते राष्ट्रधर्म पाळतात. यादव यांचे जातमूलक विचार सैन्याच्या शौर्याचा, देशाच्या अस्मितेचा अपमान आहे. हे सैन्यदलांचे राजकीयीकरण आहे, तुष्टीकरण आहे, मतांचे राजकारण आहे. विरोधक राष्ट्रभक्तीत फूट पाडत आहेत... योगींचे हे बोल ऐकल्यानंतर कोणालाही प्रश्न पडू शकतो, सैन्यदलाच्या राजकीयीकरणाची सुरुवात केली कोणी ? 'ऑपरेशन सिंदूर' नंतर भाजपच्या वाचाळवीरांच्या संख्येत होणारी वाढ थांबवण्यासाठी पक्षातील एकही वरिष्ठ नेता तसदी घेताना दिसत नाही. मग, रामगोपाल यादवांवर आगपाखड कशासाठी केली जात आहे?

सैन्यदलाचे राजकीयीकरण काँग्रेस वा इतर विरोधी पक्षांनी केलेले दिसले नाही. त्याला अपवाद भाजप ठरतो. मुस्लीमविरोध आणि सैन्यदलाचा राजकीय लाभ घेण्याचा प्रयत्न भाजपने २०१९च्या लोकसभा निवडणुकीमध्ये उघडपणे केला होता. केंद्रीय निवडणूक आयोगाने भाजपच्या नेत्यांना सैन्यदलाचा संदर्भ घेऊन निवडणूक प्रचार करू नका, असा थेट इशारा दिला होता. पुलवामामधील दहशतवादी हल्ल्यानंतर सैन्यदलाने पाकिस्तानात बालाकोटमध्ये हवाई हल्ले करून दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले होते. सैन्यदलाच्या यशाचे गुणगान करून भाजपने राजकीय प्रचार केला होता. 'पाकिस्तानने पुलवामामध्ये आमच्या ४० शूर सैनिकांना शहीद केले. त्यानंतर, आम्ही त्यांच्या प्रदेशात ४२ दहशतवाद्यांना ठार मारले आहे. आमची काम करण्याची पद्धत अशीच आहे', असे पंतप्रधान नरेंद्र मोदी भाजपच्या प्रचारसभेत म्हणाले होते. भाजपने त्या लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादाचा मुद्दा सैन्यदलाच्या शौर्याचा उल्लेख करून प्रचारात आणला आणि मते मिळवली, ही बाबही कोणाला नाकारता येणार नाही. यापूर्वी निवडणुकांमध्ये सैन्यांच्या नावाने कोणत्याही पक्षाने मते मागितली नव्हती. त्यामुळे सैन्याच्या राजकीयीकरणाची सुरुवात भाजपने केली हे मान्य करावे लागेल. २०१९च्या लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपचे नेते लष्करी पेहराव करून प्रचारात उतरले होते. त्यांना कोणीही अडवलेले दिसले नाही! २०१९च्या लोकसभा निवडणुकीमध्ये सैन्यदलाचा प्रचारात वापर केल्याबद्दल केंद्रीय निवडणूक आयोगाला मोदी–शहांना जाब विचारता आला असता; पण या दोन दिग्गज सत्ताधारी नेत्यांना 'आरोपी' करण्याचे धाडस आयोगाकडे नव्हते. २०२४च्या लोकसभा निवडणुकीमध्ये देखील आचारसंहितेचा भंग झाल्याची नोटीस केंद्रीय निवडणूक आयोगाने भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या नावे पाठवली होती. आचारसंहितेचा भंग नड्डा नव्हे, मोदींनी केल्याचा आरोप काँग्रेसने केला होता.

'ऑपरेशन सिंदूर' होण्याआधीच २०२४ची लोकसभा निवडणूक होऊन गेल्यामुळे आत्ता तरी भाजपला सैन्यदलाचा निवडणुकीसाठी वापर करण्याची गरज नाही. पण, यावेळी थेट सैन्यदलांकडून राजकीय विधाने केली गेली ही बाब अचंबित करणारी ठरते. खरेतर 'डीजीएमओ'सारख्या इतक्या वरिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांनी 'ऑपरेशन सिंदूर'ची माहिती पत्रकार परिषदेत देण्याचे कारणच काय? यापूर्वी कधी 'डीजीएमओ' लष्करी कारवायांची माहिती पत्रकार परिषदांनी दिली होती? केंद्र सरकारच्या आदेशानुसार संरक्षण दलांनी लष्करी लक्ष्य पूर्ण करायचे असते. हेच संरक्षण दलांचे युद्धामधील कर्तव्य असते. संरक्षण दलांच्या कोणत्याही दर्जाच्या अधिकाऱ्याकडून सार्वजनिक

व अधिकृत स्तरावर विधाने करणे अपेक्षित नसते. संरक्षण दलांच्या प्रवक्त्यांकडून माहिती दिली जाते. मात्र, 'आम्ही दहशतवाद्यांविरोधात कारवाई केली होती, आम्ही पाकिस्तानी लष्कर वा नागरिकांविरोधात कारवाई केली नव्हती. पण, पाकिस्तानच मध्ये पडले म्हणून आम्हाला त्यांच्या लष्करी तळांना लक्ष्य करावे लागले', असे विधान सैन्यदलांतील अधिकारी करत असतील तर, ते त्यांच्या लक्ष्याचा परीघ ओलांडून गेले, असा अर्थ निघू शकतो. ज्या दिवशी सैन्यदलांतील अधिकाऱ्यांनी हे विधान केले, त्याच दिवशी भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते संबित पात्रा यांनी पत्रकार परिषदेत नेमके हेच विधान केले. भाजपचे नेते आणि संरक्षण दलांतील अधिकारी एकसारखे विधान कसे करतात, असा प्रश्न कोणाला पडू शकतो.

जाब नाही... शल्यही नाही?

सैन्यदलातील महिला अधिकारी सोफिया कुरेशी व व्योमिका सिंह यांच्यावर 'ऑपरेशन सिंदूर' संदर्भातील माहिती देण्याची जबाबदारी देण्यात आली. सोफिया कुरेशी या मुस्लीम महिला अधिकाऱ्याला पत्रकार परिषदेसाठी पाठवून केंद्र सरकारने पाकिस्तानला प्रतीकात्मक संदेश देण्याचे काम केले हे नाकारता येणार नाही. अशी प्रतीकात्मकता हे राजकारण असते. म्हणूनच सैन्यदलाचा राजकारणासाठी केंद्र सरकारने उपयोग करून घेतला असे म्हणणे चुकीचे नव्हे. केंद्र सरकारला सोफिया कुरेशींच्या माध्यमातून दुहेरी संदेश द्यायचा होता, ते करताना देशांतर्गत राजकारण भाजपने नजरेआड केले नाही. हा संदेश भाजपच्या नेत्यांपर्यंत अचूक पोहोचला. मध्य प्रदेशचे आदिवासी विकासमंत्री विजय शहा यांनी तो अचूक हेरला. शहांनी सोफिया कुरेशींचा धर्म विचारला. त्या मुस्लीम धर्माच्या असल्यामुळे केंद्र सरकारने दहशतवाद्यांना कुरेशींच्या मार्फत चोख उत्तर दिले, असे शहा म्हणाले. दहशतवादी मुस्लीम आणि कुरेशीही मुस्लीम. दोन्ही एकाच धर्माचे. म्हणून कुरेशी दहशतवाद्यांची बहीण, असा विजय शहा यांचा वादग्रस्त युक्तिवाद. या समान धर्मीय बहिणीचा वापर दहशतवाद्यांविरोधात केला असे विजय शहांनी म्हणणे यापेक्षा धर्माचे राजकारण वेगळे काय असते? सैन्यदलाचा वापर धर्माच्या राजकारणासाठी केला गेला, याचे शल्य भाजपच्या एकाही नेत्याला झालेले दिसले नाही. दिल्लीतील भाजपच्या एकाही राष्ट्रीय नेत्याने विजय शहांना जाब विचारला नाही. मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव म्हणाले की, न्यायालय जे म्हणेल ते आम्ही करू. म्हणजे भाजप पक्ष म्हणून काहीही करणार नाही. शहांचे मंत्रीपद कायम राहील असाच संदेश दिला गेला. सैन्यदलाला धर्माच्या राजकारणात खेचण्याचे काम भाजपचे नेते करतात, पण पक्षातून नाराजीही व्यक्त होत नसेल तर सैन्यदलाचा धर्माच्या राजकारणासाठी वापर भाजपला मान्य आहे, असा अर्थ निघू शकतो.

खरेतर समाजवादी पक्षाचे नेते रामगोपाल यादव यांनी भाजपच्या सैन्यदलाच्या राजकीयीकरणाला आणि धर्माच्या राजकारणाला विरोध केला. यादव यांचे म्हणणे होते की, कुरेशींचा धर्म समजला म्हणून शहांनी वाट्टेल तशी विधाने केली आणि कुरेशींची एकप्रकारे नालस्ती केली. पण व्योमिका सिंह यांची जात शहांना माहिती नव्हती. शहांना वाटले की व्योमिका सिंह या ठाकूर आहेत, उच्चजातीतील आहेत, त्यामुळे त्यांनी व्योमिका यांच्यावर टिप्पणी केली नाही. त्या जाटव समाजातील म्हणजे दलित असल्याचे माहिती असते तर शहांनी व्योमिकांचीही नालस्ती केली असती. यादव यांचा युक्तिवाद योग्य होता. त्यांनी भाजपच्या धार्मिकद्वेषाच्या आणि जातीयवादी राजकारणाला चपराक दिली होती. मात्र यानंतर नेते यादव यांच्यावर उफराटे वार करू लागले आहेत! 'भारताचे सैन्यदल पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या समोर झुकते,' असे म्हणून मध्य प्रदेशचे उपमुख्यमंत्री जगदीश देवडा यांनी तर कमालच केली. देवडा यांचे विधान सैन्यदलाचे राजकीयीकरण नव्हे तर काय, याची कल्पना करण्याची खरेतर कोणाला गरज भासणार नाही. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री आणि त्यांच्या कुटुंबाविरोधात जल्पकांची फौज धावून गेली होती. त्यांना गद्दार, देशद्रोही म्हटले गेले.

हा अभासी राष्ट्रवादाचा ज्वर कोणी वाढवला हेही सांगण्याची गरज नसते. त्यामुळे रामगोपाल यादव यांनी सैन्यदलाचा राजकारणासाठी गैरवापर केला असा आरोप करणाऱ्यांनी सैन्यदलाच्या राजकीयीकरणाचे खरे दोषी कोण याचे उत्तर दिले पाहिजे, असे विरोधकांना विचारता येऊ शकेल.

(दैनिक लोकसत्ताच्या सौजन्याने)

mahesh.sarlashkar@expressindia.com

टिप्पणी

व्यारा सरकारी रुग्णालयाच्या खाजगीकरणाच्या विरोधात राज्यपालांना निवेदन

राष्ट्रीय स्वास्थ्य अधिकार समन्वय (संलग्न NAPM)

गुजरात मधील व्यारा सरकारी रूग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय यांचे खाजगीकरण थोपविण्याकरिता राज्यपालांनी त्यांना संविधानाने अनुच्छेद पांच अन्वये दिलेल्या स्वाधीन निर्णयाच्या विशेष अधिकाराचा उपयोग करावा यासाठी विनंती करणारे खालील पत्र जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वयाशी संलग्न राष्ट्रीय स्वास्थ्य अधिकार समन्वयाने राज्यपालांना पाठवले. त्याचा गोषवारा:

आम्ही खालील सह्या करणारे सर्व देशभरातील विविध सामाजिक संस्था-संघटनांशी संलग्न, जनतेच्या आरोग्याच्या अधिकारासाठी काम करणारे तज्ज्ञ व सामाजिक कार्यकर्ते आहेत. राष्ट्रीय स्वास्थ्य अधिकार समन्वय, हा जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय या देशव्यापी प्रक्रियेचा भाग असून आम्ही सर्व नागरिकांच्या व समुहांच्या आरोग्याच्या हक्कांचे संगक्षण व्हावे या उद्देशाने आपणास हे पत्र लिहित आहोत.

आम्ही आपल्याला विनंती करतो की, व्यारा सरकारी रूग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय यांचे खाजगीकरण थोपविण्यासाठी आपण तातडीने हस्तक्षेप करावा. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद पांच अन्वये आपल्याला स्वाधीन निर्णय घेण्याचे जे विशेष अधिकार आहेत त्याचा आपण उपयोग करावा अशी आम्ही कळकळीची विनंती करित आहोत.

आपणास नक्कीच माहित असेल की दक्षिण गुजरात मधील हजारो आदिवासींनी व्यारा सरकारी रूग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय यांच्या प्रस्तावित खाजगीकरणा विरोधांत मागील दोन महिन्यांपेक्षा अधिक काळ सातत्याने व अत्यंत संघटित पध्दतीने आंदोलन सुरु ठवलेले आहे.

तापी जिल्ह्यांतील व्यारा सरकारी रूग्णालय हे केवळ याच जिल्ह्याच्या सर्व तालुक्यांच्या करिता नोडल संदर्भ रुग्णालय नाही तर सभोवतालच्या डांग व नौसारी या आदिवासी बहुल जिल्ह्यांतील तालुक्याकरिता सुध्दा आहे.

गुजरात सरकारने या सरकारी रुग्णालयाच्या सेवांचे खाजगीकरण करण्यासाठीची व नव्यानेच मान्य झालेले,या रुग्णालयाशी संलग्न वैद्यकीय महाविद्यालय खाजगी लोकांच्या हाती देण्याची, जी हालचाल सुरु केलेली आहे, त्यामुळे या परिसरांतील आदिवासी रहिवासी अत्यंत निराश झालेले आहेत. काही वर्षांपूर्वी सुध्दा असाच, हे रुग्णालय खाजगी करण्याचा प्रयत्न सरकारने केला होता पण तापी जिल्ह्यातील आदिवासींनी आंदोलन केले व सरकारला माघार घ्यावी लागून सरकारने रुग्णालयचे खाजगीकरण करणार नाही असे आश्वासन दिले होते.

मात्र 2024 मध्ये गुजरात सरकरने शब्द फिरवला आणि खाजगीकरणाच्या वाटेने पुढे जाण्याचा निर्णय घेतला. पण आदिवासी गावांना व संघटनांना हे जसे कळले, तसे त्यांनी शांततामय पध्दतीने या रुग्णालयासमोर धरणे आंदोलन सुरु केले. रोज सर्व आदिवासी गावातील नागरिक नियमितपणे येतात व त्याचा विरोध नोंदवितात आणि खाजगीकरणाची ही अतिशय अन्यायकारक प्रक्रिया थांबवावी अशी सरकारला विनंती करतात.

इथे हे नमूद करणे संयुक्तिक आहे की गुजरातची अनेक आदिवासी क्षेत्रे ही मानवी विकासाच्या निकषांवर (विशेषत: आरोग्याच्या) मागे आहेत. तीव्र कुपोषणामुळे वाढ खुंटलेल्या बालकांची संख्या तापी आणि डांग जिल्ह्यांमध्ये (अनुक्रमे 36.6 टक्के व 40.9 टक्के) लक्षणीय आहे. या पाश्वभूमीवर हे अत्यंत महत्वाचे आहे की आरोग्य सेवेची व्यवस्था सरकारी यंत्रणेकडेच राहावी जेणेकरुन तिची जबाबदारी सुनिश्चित केली जाईल. केवळ नफा कमविण्या करितांच आरोग्य क्षेत्रांत शिरणाऱ्या खाजगी मंडळींच्या हाती आपल्या आरोग्याची जबाबदारी द्यायची नाही, याबद्दल आदिवासी समाजांमध्ये संपूर्ण स्पष्टता आहे.

कृपया या गोष्टीची नोंद घ्यावी की शेजारच्या राजस्थान राज्यांत, दुर्गम ग्रामीण भागांमध्ये खाजगीकरण अयशस्वी ठरले व सरकारला सार्वजनिक आरोग्य व्यवस्था पुनर्स्थापित करावी

लागली. म्हणून अशा अनुभवातून गुजरात सरकारने शिकणे महत्वाचे आहे.

कल्याणकारी राज्यांत आपल्या नागरिकांना अन्न व सामाजिक सुरक्षा, सार्वजनिक आरोग्य, शिक्षण व परवडणाऱ्या दरांत सार्वजनिक वाहतुक सेवा या सुविधा सरकारने पुरविणे अपेक्षित असते. मात्र सध्या असे चालले आहे की विकासाच्या नावाने अशा सेवांचे प्रचंड खाजगीकरण केले जाते आहे आणि यातून यामध्ये नफाखोरी करण्यांत गुंतलेल्या एका छोट्या गटाला फक्त फायदा होतो आहे. राज्यशासन व तिथले लोक यांच्या जिवावर केवळ एकाधिकारी कंपन्या गब्बर होत आहेत.

म्हणूनच तापी जिल्ह्यातील आदिवासी समूहांची अशी मागणी आहे की व्यारा सरकारी रूग्णालय व संलग्न व्याराचे वैद्यकीय महाविद्यालय कोणत्याही परिस्थितीत खाजगी नफेखोरांच्या हाती दिले जाऊ नये व ते सरकारनेच चालवायला हवे. यांत कोणतीही तडजोड त्यांना मान्य नाही.

आधिवासी संस्कृती व मुल्यांमध्ये मानवी समुहांच्या निसर्गसंवादी सहजीवनाला नेहमीच महत्वाचे मानले आहे, जे मानवाच्या जगण्याकरिता अत्यावश्यक होते. पण नवीन भाडवली आर्थिक धोरण - उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण - आल्यामुळे या सुसंवादी सहजीवनालाच धोका निर्माण झाला आहे. आपण बघतो आहोत अधिकाधिक नैसर्गिक संसाधनाची लूट करण्याकरितांची वेडी गर्दी. यामुळेच जलवायुपरिवर्तनाचे - हवामानबदलाचे पर्यावरणीय संकट ओढवलेले आहे व सतत आपत्तींना तोंड द्यावे लागते आहे.

दक्षिण गुजरातमधील आदिवासी जिल्ह्यांमध्ये हे घडतांना आपण बघतो आहोत. याला कारण आहेत तथाकथित विकास प्रकल्पांचे लोंढे. उदाहरणे आहेत डी एम आय सी, भारतमाला, रेल्वे फ्राईट कॉरीडार, स्टँच्यु ऑफ युनीटी पासून सापुतारा ग्रीन कॉरीडार आणि नॅशनल हायवे 56. या महाकाय प्रकल्पांमुळे केवळ मोठ्या स्तरावर विस्थापनच होणार आहे असे नाही तर त्यामुळे आदिवासी क्षेत्रांतील निसर्ग व सजीवसृष्टीवर विनाशकारी परिणाम होणार आहेत.

याशिवाय वन्यजीव अभयारण्य, पर्यावरणीय दृष्ट्या संवेदनशील क्षेत्र आणि व्याघ्र प्रकल्प यांच्या बिनबुडाच्या घोषणा, आदिवासी समाजाशी कुठल्याही पध्दतीने संवाद न करताच केल्यामुळे प्रचंड वंचितता व वेदना दिल्या जाणार आहेत. या अशा कृतींमधून अपेक्षित लाभ सुध्दा मिळणार नाहीतच.

आपल्याला कल्पना असेलच की पर्यावरणीय दृष्टीने धोकादायक असलेला पार–तापी नदीजोड प्रकल्प सरकारला थोपवावा लागला, कारण दक्षिण गुजरातच्या सर्व जिल्ह्यांच्या आदिवासींनी केलेल्या संघर्षामुळेच. खरंतर संविधानाने संरक्षण दिलेल्या 5व्या अनुसूचितील आदिवासींना विस्थापित करणाऱ्या आणि पर्यावरणाचा विनाश करणाऱ्या अशा सर्वच प्रकल्पांचा गांभिर्याने फेरविचार करणे गरजेचे आहे..

आम्हाला वाटते की आपण या गोष्टीची सुध्दा दखल घेतली पाहिजे की, आंधाधुंद विनाश,वंचितता आणि विस्थापन यामुळे आदिवासींच्या जीवनात व उपजीविकाना अडथळे निर्माण होतात, त्यांच्यावर प्रचंड मानसिक तणाव वाढतो. परिणामत: नैराश्य आणि विविध मानसिक आजार जडतात. म्हणून आता आदिवासी पाड्यावर सरकारी आरोग्य यंत्रणेने अन्य आरोग्य सेवांच्या शिवाय, सोबतच प्रशिक्षित मानसोपचार तज्ज्ञांनी जाऊन समुपदेशन व उपचार देणे आवश्यक बनले आहे.

मागील दोन दशके गुजरात सरकारने आदिवासीकरिता महत्वाच्या दोन कायद्यांची परिणामकारक अंमलबजावणी केलेली नाही, वन हक्क कायदा (एफ आर ए - फॉरेस्ट राईटस् अॅक्ट) 2006 आणि पेसा (पंचायतस् एक्सटेंन्शन टू शेड्यूल्ड एरिआज अॅक्ट) 1996. सरकार अशा विनाशकारी प्रकल्पांद्वारे आदिवासींचे स्वशासनाचे 5व्या अनुसुची व्दारे मिळालेल्या हक्कांचे उलंघन करते आहे.

गुजरात सरकारचा व्यारा सरकारी रूग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय यांचे खाजगीकरण करण्याचा रेटा हा आम्हाला त्याच मालिकेतला प्रयत्न वाटतो, ज्यामध्ये या परिसरातील नैसर्गिक संसाधने लुटण्यासाठी व्यापारी गटांना आणायचे ज्यामुळे आदिवासी लवकरच कंगाल, गरीब आणि वंचित होतील.

माननीय महोदय, आम्ही आपणाला विनंती करतो की भारतीय राज्यघटनेने, अनुच्छेद पांच अन्वये आपल्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा उपयोग करून विकासाच्या बुरख्या आडून

(पान १५ वर)

टिप्पणी

पहलगामपासून 'सिंदूर'पर्यंत... एकतेच्या परीक्षेवर भारत कुठे उभा आहे?

मिथिला राऊत

भारतीय मुस्लिम पहलगाम घटनेचा तीव्र निषेध करत होते आणि या समुदायातील काही सदस्यांना अनपेक्षित हल्ल्यांना सामोरे जावे लागत होते...

२२ एप्रिल २०२५ रोजी जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण देश हादरला. सुमारे वीस मिनिटे चाललेल्या या भयानक हल्ल्यात दहशतवाद्यांनी धर्म विचारून २६ पुरुषांची निर्दयपणे हत्या केली त्यापैकी एक स्थानिक काश्मिरी मुसलमान होता. या अमानवी घटनेमुळे देशभर संतापाची लाट उसळली. सर्व धर्मांचे नागरिक, धार्मिक नेते, सामाजिक संस्था आणि राजकीय नेत्यांनी या हल्ल्याचा तीव्र निषेध केला.

तथापि, भारतातील काही भागांमध्ये काही स्वयंघोषित हिंदुत्व समर्थकांनी निर्दोष भारतीय मुस्लिमांवर प्रतिहल्ले केले, जे त्या दहशतवाद्यांशी किंवा घटनेशी कुठलाही संबंध ठेवत नव्हते आणि अशा हिंसाचारावर त्यांचे कोणतेही नियंत्रण नव्हते. अशा काही घटना पुढीलप्रमाणे:

१) अलिगढ, उत्तर प्रदेश (२८ एप्रिल २०२५): तीन जणांविरुद्ध एफआयआर दाखल झाली, ज्यांनी एका मुस्लिम विद्यार्थ्याला जबरदस्तीने पाकिस्तानी झेंड्यावर लघवी करण्यास भाग पाडले. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. (कुमार, २०२५)

२) उत्तर प्रदेशच्या शामली जिल्ह्यातील तोडा गाव (२६ एप्रिल): सरफराज नावाच्या २५ वर्षीय तरुणाने आपल्या शेजाऱ्याने (गोविंद) त्याच्यावर हल्ला केल्याचा आरोप केला. ''तुम्ही २६ मारले, आम्ही तुमचे २६ मारू,'' असे त्याने मारहाणी दरम्यान म्हटले, असे सरफराजचे म्हणणे आहे. (कुमार, २०२५)

३) मसूरी, उत्तराखंड: शब्बीर अहमद दर, २० वर्षांपासून पश्मिना शाल विकणारा काश्मिरी व्यापारी आणि त्याचा सहकारी, एका हिंदू उजव्या गटाकडून मारहाणीत सापडले. त्यांच्या दुकानांचीही तोडफोड झाली. (मतीन व जावेद, २०२५)

४) डेराबस्सी, पंजाब (२३ एप्रिल): युनिव्हर्सल ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सच्या होस्टेलमध्ये काश्मिरी विद्यार्थ्यांवर हल्ला झाला. (इंडिपेंडंट, २०२५)

५) खरावर गाव, रोहतक, हरियाणा: मुस्लिम कुटुंबांना २ मे पर्यंत गाव सोडण्याचा आदेश देण्यात आला. व्हॉट्सॲप ग्रुपवर दीपक मलिकसह काहींनी पहलगाम हल्ल्याचा संदर्भ देऊन त्यांची हकालपट्टी करण्याची मागणी केली. १५ मुस्लिम कुटुंबे गेली १०–१२ वर्षे तिथे राहत आहेत. त्यांपैकी बहुतेक लोक जवळच्या फॅक्टरींमध्ये मजूर, मेकॅनिक अशी कामे करत आहेत किंवा छोटे भंगार विक्री करणारे आहेत. (सुरा, २०२५)

६) दादर, मुंबई (२४ एप्रिल): सोफियान शाहिद अली या २१ वर्षीय युवकावर रोहिंग्या मुस्लिम समजून मारहाण करण्यात आली. या प्रकरणी भाजप माहिम युनिट अध्यक्ष अक्षता तेंडुलकर यांच्यासह ९ जणांविरुद्ध शिवाजी पार्क पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल झाली. अक्षता ने नंतर फेसबुक वर आपल्यावरचे आरोप नाकारले. तक्रार करणारा सौरभ मिश्र दादर मार्किट मध्ये टॉवेल विकण्याचा स्टॉल चालवतो आणि त्याच्याकडे उत्तर प्रदेशच्या सोफियान सह 6 लोकं काम करतात. (चिटणीस, २०२५)

७) वाकोला, सांताक्रूझ, मुंबई (२६ एप्रिल): बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी पाकिस्तान, बांगलादेश आणि पॅलेस्टाईनचे झेंडे रस्त्यावर लावून निषेध केला. पॅलेस्टाईनच्या झेंड्याचा अवमान झाल्याच्या निषेधार्थ मुस्लिम युवकांनी आक्षेप घेतल्याने संघर्ष झाला. काही लोक जखमी झाले. जेव्हा सेंटर फॉर स्टडी ऑफ सेक्युलरिझम ची टीम या घटनेची सत्यता तपासण्यासाठी गेली तेव्हा त्यांना कळले की या वाकोलाच्या गोळीबार वस्तीत गेली कित्येक वर्ष हिंदू मुस्लिम एकोप्याने राहत होते, एक दुसऱ्यांच्या सणा समारंभात सहभागी होत होते. पण गेल्या २ वर्षांपासून इथे धार्मिक भेदभाव पसरवायला सुरुवात झाली. या संघर्षात एक तरुण अबरार शेख फक्त 'असीम' – त्याच्या भावाचे नाव, या नावाचा टी–शर्ट घालून असल्याने मारहाणीला सामोरे गेला.

या बहुसंख्यांकवादी राजकीय गटांची ही कृत्ये पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील बळींना न्याय मिळवून देण्यासाठी नसून, मुस्लिमांविरोधात द्वेष पसरवण्याचे साधन ठरत आहेत. पाकिस्तानमधील दहशतवाद्यांनी केलेल्या अमानवी कृतींसाठी भारतीय मुस्लिमांवर, जे त्यांचे प्रतिनिधीही नाहीत आणि त्यांच्या प्रभावाखालीही नाहीत, त्यांच्यावर सूड उगवणे नैतिकदृष्ट्या चुकीचे आणि कायदेशीरदृष्ट्याही अन्यायकारक आहे.

भारत सरकारच्या मते, २२ एप्रिलचा पहलगाम हल्ला हा सांप्रदायिक तणाव निर्माण करण्याचा कट होता. ७ मे रोजी रात्री १:४४ वाजता भारताने या हल्ल्याला उत्तर म्हणून ''ऑपरेशन सिंदूर'' सुरू केले. ८ मे रोजी परराष्ट्र सचिव विक्रम मिश्री यांनी पत्रकार परिषदेत सांगितले, ''या हल्ल्याचे उद्दिष्ट जम्मू–कश्मीर आणि देशात साम्प्रदायिक तणाव निर्माण करणे होते. सरकार व जनतेच्या दक्षतेमुळे हा कट उधळून लावण्यात आला.'' (हाय कमिशन ऑफ इंडिया, २०२५) या कटाविरोधात भारतीय मुस्लिमांसह प्रत्येक भारतीयाने एकतेने उभे राहत भूमिका बजावली.

जर अशा घटना घडल्यावर प्रत्येक वेळी भारतीय मुस्लिमांना हिंसा व धमक्यांचा सामना करावा लागला, तर पाकिस्तानसारख्या शत्रूराष्ट्रांचे भारतात सांप्रदायिकतेचे विष पसरवण्याचे उद्दिष्टच पूर्ण होते. इतिहास सांगतो की सामाजिक स्थैर्य डळमळल्यावर आर्थिक स्थैर्यही संकटात येते, आणि त्यात सर्वाधिक नुकसान सामान्य व गरीब लोकांचेच होते. निर्दोष भारतीय मुस्लिमांवर राष्ट्रप्रेमाच्या नावाखाली हल्ले करणे हे देशभक्ती नसून राष्ट्रीय एकतेवर घाव आहे.

पण या सगळ्यात एक आशेचा किरण आहे...

अनेक इस्लामी विद्वानांनी इस्लामच्या नावावर होणाऱ्या दहशतवादी हल्ल्यांचा कठोर निषेध केला आहे. त्यांनी कुराणाच्या ५व्या अध्यायातील ३२व्या चरणाचा दाखला दिला आहे:
''जो कोणी एका निरपराध व्यक्तीचा जीव घेतो, तो जणू संपूर्ण मानवतेचा जीव घेतो; आणि जो कोणी एखाद्याचे प्राण वाचवतो, तो जणू संपूर्ण मानवतेचे प्राण वाचवतो.''

भारताची खरी ओळख म्हणजे 'विविधतेत एकता'. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुद्धा ३० मार्च २०२५ रोजी 'मन की बात' मध्ये देशातील विविध सण व नववर्ष साजरे केल्याने एकतेची भावना दृढ होते असे सांगितले. त्यांनी ईदसह इतर सणांच्या शुभेच्छा दिल्या व एकतेस बळकटी देण्याचे आवाहन केले. (द हिंदू, २०२५) भारतीयांनी वारंवार दाखवून दिले आहे की ते दहशतवादाविरोधात एकदिलाने उभे आहेत.

मुस्लिम समुदायानेही पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा जोरदार निषेध केला आहे. जम्मू-कश्मीर, दिल्ली, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, हरियाणा, पंजाब, आसाम आणि कर्नाटकमध्ये मुस्लिमांनी शांततामय निषेध केला. जमीयत उलेमा-ए-हिंद, ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड, जमात-ए-इस्लामी हिंद यांसारख्या प्रमुख मुस्लिम संघटनांनी दहशतीचा निषेध केला व कडक कारवाईची मागणी केली. 'जमीयत उलेमा-ए-हिंद' या मुस्लिम प्रमुख धार्मिक संस्थेने दहशतवादाला 'कॅन्सर' असे संबोधले व इस्लामच्या शांततेच्या तत्वांविरुद्ध असल्याचे सांगितले.

(Secular Perspective ग्रुप च्या फेसबुक वरुन)

अनुवाद: मीनल उत्तुरकर
meenalutturkar16@gmail.com

(टिप्पणी: पान १३ वरुन)

चालविलेली आदिवासी क्षेत्रातील विनाशाकडची वाटचाल आपण थोपवावी. या क्षेत्रातील लाखो आदिवासी आणि कष्टक–यांनी मागणी केलेली आहे त्यानुसार आपण व्यारा रूग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय यांचे खाजगाकरण करण्याची योजना तात्काळ रद्द करणे सुनिश्चित करण्याने सुरवात करु शकता.

भारत भरातील आम्ही सर्व संविधान, आत्मसन्मान, संसाधने व राष्ट्रीय स्वायत्तता संरक्षण समिती, व्यारा यांच्या सरकारी रुग्णालयाच्या खाजगीकरणा विरोधाच्या संघर्षाच्या समर्थनार्थ सोबत उभे आहोत.

आपल्याला धन्यवाद.आपल्याकडून लवकर सकारात्मक प्रतिसाद मिळेल व कारवाई केली जाईल या अपेक्षेत,

napmindia@gmail.com

खरा तो एकाची धर्म, जगाला प्रेम अर्पावे
– साने गुरुजी

टिप्पणी

उष्णतेची लाट ही आपत्ती यादीत समावेश करण्यासाठी अधिसूचना जारी करण्याबाबत मुख्यमंत्र्यांना पत्र

जनआंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय, महाराष्ट्र

NACEJ (नॅशनल अलायन्स फॉर क्लायमेट अँड इकॉलॉजिकल जस्टिस), महाराष्ट्र

प्रति,

माननीय मुख्यमंत्री

महाराष्ट्र राज्य

विषय: उष्णतेची लाट ही आपत्ती यादीत समावेश करण्याबाबत अधिसूचना जारी करण्याबाबत

महोदय,

जनआंदोलनांचा राष्ट्रीय समन्वयाचा पर्यावरण विषयक समन्वय NACEJ (नॅशनल अलायन्स फॉर क्लायमेट अँड इकॉलॉजिकल जस्टिस) हवामान बदलाचा व त्यामुळे येणाऱ्या उष्णतेच्या लाटेचा गंभीरपणे विचार करत आहे. सरकारने अधिसूचना जारी करून 'आपत्ती' च्या यादीत 'उष्णतेची लाट' तात्काळ समाविष्ट करावी अशी मागणी सदर पत्राद्वारे करत आहे.

तसेच उष्णतेच्या लाटेतील बळींचा समावेश प्रकल्पग्रस्तांच्या यादीत करावा आणि त्यांच्या संपूर्ण पुनर्वसनाची जबाबदारी सरकारने घ्यावी अशी मागणीही आम्ही सदर पत्राद्वारे आपणांस करत आहोत. महोदय, आपणास माहित आहेच की, १९९२ ते २०१५ दरम्यान, उष्णतेच्या लाटेमुळे भारतात २४,००० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. 'हीटवॉच'ने, केवळ २०२४ मध्ये, ७३३ हून अधिक उष्माघाताने मृत्यूची नोंद केली आहे, जी अधिकृत आकडेवारीपेक्षा जास्त आहे.

उष्णतेच्या ताणाचा असंघटीत कामगारांच्या आरोग्यावर आणि उपजीविकेवर दुहेरी परिणाम होण्याचा गंभीर धोका असतो. वाढत्या तापमानामुळे आणि उष्णतेच्या लाटेमुळे आरोग्यविषयक गंभीर धोके निर्माण होतात, ज्यामध्ये उष्णतेमुळे येणारा थकवा, उष्माघात, निर्जलीकरण आणि दीर्घकालीन आरोग्यविषयक गुंतागुंत यांचा समावेश आहे. उष्णतेमुळे त्यांची काम करण्याची क्षमता, उत्पादकता, कामाच्या संधी आणि त्याद्वारे कमाईवरही परिणाम होतो. अशा परिस्थितीत असंघटित क्षेत्रातील कामगारांना विशिष्ट आरोग्य सेवा पुरवण्यासाठी तसेच या आपत्तीमुळे रोजगार बुडवणे भाग पडणाऱ्या सर्व कष्टकऱ्यांना भरपाई म्हणून रोजगार भत्ता देण्यासाठी विशेष अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात यावी अशीही मागणी आम्ही सदर पत्राद्वारे आपणाकडे करत आहोत. तसेच खालील काही महत्वाच्या सुविधा तातडीने पुरविण्याकरिता विशेष बाब म्हणून बजेटची तरतूद करण्यात यावी व त्वरित अंमलबजावणी करण्यात यावी.

१ .कामाच्या ठिकाणाजवळ पोषक आहाराची सोय.(स्थानिक बचत गटाचे कम्युनिटी किचन).

२ .भरपूर स्वच्छ व थंड पिण्याचे पाणी मिळण्याची सोय.

३ .बाथरूम व शौचालयांत वापरण्याचे पाणी व स्वच्छता.

४ .विश्रांतीसाठी थंडाव्याची जागा (टीनशेड नसावी)

बिकट होत जाणाऱ्या हवामान बदलाचा सर्वात जास्त परिणाम कमीत कमी कार्बन उत्सर्जन करणाऱ्या असंघटीत कामगारांवर होत आहे. या हवामानविषयक अन्यायाचा सामना प्रत्येक पातळीवर, धोरणात्मक आणि जमिनीस्तरावर करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने NACEJ ने तयार केलेली मार्गदर्शक तत्त्वे सदर पत्रासोबत जोडली आहेत. या मार्गदर्शक तत्वांचा उद्देश अनौपचारिक कामगारांना उष्णतेच्या ताणाच्या परिणामांपासून स्वत:चे संरक्षण करण्यास मदत करण्यासाठी एक समर्थनीय चौकट आणि व्यावहारिक उपाय प्रदान करणे हा आहे.

उष्णतेच्या लाटेसंदर्भात हीट ॲक्शन प्लॅन्स (HAPs) तयार करुन त्याची अंमलबजावणी आपले शासन करेलच. या अंमलबजावणीवर लोकाधारित देखरेखीची (सी बी एम....कम्युनिटी बेसड मॉनिटरिंग) व्यवस्था करण्यांत यावी.

टिप्पणी

अनौपचारिक कामगारांसाठी उष्णतेच्या लाटेसंबंधी मार्गदर्शक तत्त्वे

नॅशनल अलायन्स फॉर क्लायमेट अँड इकोलॉजिकल जस्टिस (NACEJ - NAPM)

१९९२ ते २०१५ दरम्यान, उष्णतेच्या लाटेमुळे भारतात २४,००० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला. हीटवॉचने, केवळ २०२४ मध्ये, ७३३ हून अधिक उष्माघाताने मृत्यूची नोंद केली आहे, जी अधिकृत आकडेवारीपेक्षा जास्त आहे. उष्णतेच्या ताणाचा अनौपचारिक कामगारांच्या आरोग्यावर आणि उपजीविकेवर दुहेरी परिणाम होण्याचा गंभीर धोका असतो. वाढत्या तापमानामुळे आणि उष्णतेच्या लाटेमुळे आरोग्यविषयक गंभीर धोके निर्माण होतात, ज्यामध्ये उष्णतेमुळे येणारा थकवा, उष्माघात, निर्जलीकरण आणि दीर्घकालीन आरोग्यविषयक गुंतागुंत यांचा समावेश आहे. उष्णतेमुळे त्यांची काम करण्याची क्षमता, उत्पादकता, कामाच्या संधी आणि त्याद्वारे कमाईवरही परिणाम होतो. बीकट होत जाणाऱ्या हवामान बदलाचा सर्वात जास्त परिणाम कमीत कमी कार्बन उत्सर्जन करणाऱ्या अनौपचारिक कामगारांवर होत आहे. या हवामानविषयक अन्यायाचा सामना प्रत्येक पातळीवर, धोरणात्मक आणि जमिनीस्तरावर करणे आवश्यक आहे. या मार्गदर्शक तत्त्वांचा उद्देश अनौपचारिक कामगारांना उष्णतेच्या ताणाच्या परिणामांपासून स्वत:चे संरक्षण करण्यास मदत करण्यासाठी एक समर्थनीय चौकट आणि व्यावहारिक उपाय प्रदान करणे आहे.

१. उष्णतेचा तुमच्यावर कसा आणि केव्हा परिणाम होऊ शकतो?

अ. घोषित उष्णतेची लाट नसतानाही उच्च उष्णता निर्देशांक किंवा वेट बल्ब तापमानाचा लोकांवर परिणाम होऊ शकतो:

उष्णतेचा परिणाम समजून घेण्यासाठी, उष्णता निर्देशांक / वेट बल्ब तापमान - तापमानाचे एकत्रित सूचक (ज्याला ड्राय बल्ब तापमान देखील म्हणतात) तसेच सापेक्ष आर्द्रता याकडे लक्ष देणे महत्वाचे आहे. सहसा, मानवी शरीर नैसर्गिकरित्या घामाद्वारे अति उष्णतेशी झुंजू शकते. घामाचे बाष्पीभवन होते तेव्हा शरीर थंड होते. परंतु जेव्हा तापमानासोबत सापेक्ष आर्द्रता देखील जास्त असते तेव्हा हवेत आधीच भरपूर पाण्याची वाफ असते, ज्यामुळे घामाचे सहज बाष्पीभवन होणे कठीण होते. यामुळे मानवी शरीराची नैसर्गिकरित्या थंड होण्याची क्षमता कमी होते. शरीराला जास्त घाम येत असला तरी, घामाचे बाष्पीभवन होत नाही आणि शरीर थंड होत नाही. अशाप्रकारे, उच्च तापमान आणि सापेक्ष आर्द्रतेचे हे प्राणघातक संयोजन लोकांवर विनाशकारी परिणाम करू शकते, ज्यामध्ये उष्णतेमुळे येणारा थकवा, उष्णतेमुळे पुरळ येणे, उन्हाने पेटके येणे, उष्माघात आणि वेळेत योग्य उपाययोजना न केल्यास मृत्यू देखील होऊ शकतो.

ब. वेट–बल्बचे ३५°C तापमान देखील खूप धोकादायक आहे.

सामान्यत: जेव्हा कोरड्या बल्बचे तापमान ४०°C पर्यंत पोहोचते तेव्हा उष्णता बातम्यांमध्ये येते. तथापि, जेव्हा ओल्या बल्बचे तापमान, जे तापमान आणि सापेक्ष आर्द्रतेचे एकत्रित सूचक आहे, ३१°C पेक्षा जास्त होते तेव्हा कामगारांनी सावधगिरी बाळगली पाहिजे. जेव्हा ओल्या बल्बचे तापमान ३५°C पर्यंत पोहोचते तेव्हा मानवी शरीर उष्णतेशी लढण्याची सर्व क्षमता गमावते आणि काही तासांतच कोसळू शकते.

क. स्थानिक देखरेखीची आवश्यकता आहे कारण सरकारी इशारे खूप उशिरा येतात आणि खूप कमी येतात:

कृपया लक्षात घ्या की, भारताचा हवामान विभाग (IMD) बाहेर काम करणाऱ्या कामगारांसाठी परिस्थिती बिघडण्यानंतर खूप उशिरा उष्णतेची लाट जाहीर करते. तसेच, उष्णतेची लाट घोषित करण्यासाठी ते फक्त कोरड्या बल्ब तापमानाचा विचार करते. IMD नुसार, ही उष्णतेची लाट असते जेव्हा - अ) मैदानी प्रदेशातील कोरड्या बल्बचे तापमान ४०°C किंवा किनारी प्रदेशात ३७°C किंवा डोंगराळ प्रदेशात ३०°C पर्यंत पोहोचते, किंवा ब) कोरड्या बल्बचे तापमान एखाद्या प्रदेशाच्या सामान्य तापमानापेक्षा ४.५°C किंवा त्याहून अधिक वाढते, किंवा क) कोरड्या बल्बचे तापमान ४५°C पर्यंत पोहोचते. तसेच, IMD, म्हणजेच सरकार,

वरील तापमानाची परिस्थिती किमान दोन दिवस टिकल्यावरच उष्णतेची लाट जाहीर करेल. या वेळेपर्यंत, उष्णतेच्या जास्त संपर्कात असलेल्या लोकांसाठी खूप उशीर झालेला असतो आणि त्यांना आधीच उष्णतेशी संबंधित समस्यांना तोंड द्यावे लागते. IMD चेतावणींमध्ये आणखी एक मोठी कमतरता म्हणजे त्या त्यांच्या स्टेशनद्वारे रेकॉर्ड केलेल्या डेटावर आधारित असतात जे सहसा शहरांच्या सर्वात थंड आणि हिरव्यागार भागात असतात. अशा प्रकारे, शहरांच्या सर्वात व्यस्त आणि उष्ण भागातील लोकांद्वारे जाणवलेल्या तापमानाच्या तुलनेत IMD डेटा नेहमीच कमी नोंदवला जातो.

ड. शहरी उष्णता बेटाच्या परिणामामुळे शहरांमध्ये उष्णतेची परिस्थिती आणखी बिकट होते:

काही शहरी भागात, अति मानवी कामांमुळे, कार्बन उत्सर्जन, कमी वृक्ष वनस्पती, जास्त अभेद्य बांधकाम पृष्ठभाग आणि हवेचा कमी प्रवाह यामुळे आसपासच्या भागांच्या तुलनेत स्थानिक वातावरण जास्त गरम होते. शहरी प्रदेशांच्या अशा अतितप्त लहान भागांना शहरी उष्णता बेटे म्हणतात. शहरी भागातील अनौपचारिक आणि बाहेर काम करणाऱ्या कामगारांना सहसा अशा दाट शहरी भागात काम करावे लागते, म्हणून त्यांना नियमितपणे जास्त उष्णतेचा सामना करावा लागतो. तसेच, आयएमडी हवामान केंद्रे सहसा हिरव्या आणि अधिक खुल्या भागात असल्याने, सरकारने दर्शविलेले तापमान शहरी उष्णता बेटांमधील कामगारांना प्रत्यक्षात जाणवलेल्या तापमानापेक्षा खूपच कमी असते. भारतात काही प्रकरणांमध्ये, शहरी उष्णता बेटांचे तापमान आयएमडीने नोंदवलेल्या तापमानापेक्षा 9° सेल्सिअस जास्त असल्याचे आढळून आले आहे. अशाप्रकारे, कामगारांना त्यांच्या कामाच्या ठिकाणच्या सूक्ष्म पर्यावरणावरील उष्णतेच्या परिणामाचा खूप धोका असतो, म्हणूनच नियमित स्थानिक देखरेखीची आवश्यकता असते.

इ. घरीही उष्णतेचा ताण महत्त्वाचा आहे:

बहुतेक उष्णतेच्या ताणाच्या सूचना कामाच्या ठिकाणी होणाऱ्या जोखमींवर लक्ष केंद्रित करतात, परंतु अनौपचारिक कामगारांना घरीही तीव्र अस्वस्थतेचा सामना करावा लागतो. बरेच जण लहान, दाटीवाटीच्या आणि कमी हवेशीर आणि उष्णता अडकवणाऱ्या घरात राहतात ज्यामुळे विश्रांती घेणे आणि कामानंतर बरे होणे कठीण होते. साध्या, कमी खर्चाच्या उपायांमुळे जसे की छतावर पांढरा किंवा परावर्तित रंग, वरच्या भिंतीवरील वायुवीजन आणि दारांवर कापडी पडदे किंवा चादरी सूर्यप्रकाश रोखण्यास मदत होऊ शकते. शक्य असल्यास, सावलीत बाहेरील विश्रांती क्षेत्रे तयार केल्याने देखील आराम मिळू शकतो. मोठ्या प्रमाणात शीतकरण साहित्य खरेदी करणे किंवा चांगल्या गृहनिर्माणासाठी समर्थन देणे यासारखे सामुदायिक प्रयत्न मोठा फरक करू शकतात. अति उष्णतेमध्ये कामावरील कामगारांना मदत करणे जितके महत्त्वाचे आहे तितकेच घरातही कामगारांचे उष्णतेपासून संरक्षण करणे देखील महत्त्वाचे आहे.

2. धोरणात काय बदल करण्याची आवश्यकता आहे?

अ. उष्णतेच्या लाटेत अनौपचारिक कामगारांना सर्वात जास्त प्रभावित आणि असुरक्षित म्हणून ओळखले जाणे:

● उष्णतेच्या लाटेत अनौपचारिक कामगारांना त्यांच्या कामाचे स्वरूप, सावलीत किंवा हवेशीर जागांची मर्यादित उपलब्धता आणि सूर्यप्रकाशात दीर्घकाळ राहणे आणि तीव्र तापमान यामुळे सर्वाधिक त्रास सहन करावा लागतो. आणि अपुरी पायाभूत सुविधा, गारवा सुविधांची उपलब्धता नसणे, घरांची खराब परिस्थिती आणि सामाजिक संरक्षण उपायांचा अभाव यामुळे या त्रासात वाढ होते. उष्णता कृती योजना आणि उष्णतेच्या लाटांच्या धोरणांमध्ये त्यांची असुरक्षितता ओळखणे हे योग्य दिशेने पहिले पाऊल असले पाहिजे.

ब. सर्व प्रशासन स्तरांवर उष्णतेच्या लाटांसाठी उष्णता कृती योजना / मार्गदर्शक तत्त्वांमध्ये अनौपचारिक कामगारांसाठी स्वतंत्र विभाग सुनिश्चित करा:

● राष्ट्रीय, राज्य आणि शहर–स्तरीय उष्णता कृती योजनेमध्ये अनौपचारिक कामगारांचा स्पष्ट समावेश सुनिश्चित करा. उष्णता कृती योजनेमध्ये अनौपचारिक कामगार आणि समर्पित विभागांसाठी क्षेत्रीय मार्गदर्शक तत्त्वे आणि जबाबदारी यंत्रणेसह विशिष्ट अंमलबजावणी रोडमॅप सुनिश्चित करण्यासाठी आदेशांसाठी जोर द्या. त्यांच्या गरजा आणि तरतुदींसाठी अर्थसंकल्पीय खर्च देखील नियोजित केला पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत, शहरातील 30-40% पेक्षा जास्त लोक अनौपचारिक कामाच्या कोणत्या ना कोणत्या स्वरूपात गुंतलेले आहेत आणि त्यांना धोरणात्मक आणि अर्थसंकल्पीय वाटप करण्याची आवश्यकता आहे.

3. **शहरी स्थानिक संस्था आणि इतर सरकारी संस्थांकडून काय मागावे?**

अ. अति उष्णतेमध्ये सोईस्कर कामाचे तास लागू करा:

● दुपारचे अतिरेकी तापमान टाळण्यासाठी बांधकाम कामगार, रस्त्यावरील विक्रेते, कचरा वेचक आणि रिक्षाचालक यांसारख्या उघड्यावरील कामगारांना सकाळी लवकर किंवा संध्याकाळी उशिरा कामाच्या शिफ्टमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहित करा.

● सर्वात उष्ण वेळेत (दुपारी १ २ ते ४) जास्त वेळ विश्रांती घेता येईल आणि तापमान कमी झाल्यावर पुन्हा काम सुरू करता येईल अशा शिफ्टमध्ये कामगारांची विभागणी करण्याचे समर्थन करा.

ब. उच्च–जोखीम कार्य क्षेत्रे ओळखा आणि त्यांचे नकाशे तयार करा आणि क्षेत्र–विशिष्ट उपाययोजना विकसित करा:

● बांधकाम स्थळे, खुल्या बाजारपेठा, वाहतूक नाका, कचरा टाकण्याची ठिकाणे आणि औद्योगिक क्षेत्रे यासह उष्णतेला बळी पडणाऱ्या ठिकाणांचे नकाशे तयार करण्यासाठी ULBs आणि कामगार समूहांसोबत काम करा.

● या झोनमधील पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी सार्वजनिक पाण्याचे ठिकाणे, सावलीची रचना आणि कामगारांसाठी नियुक्त विश्रांती क्षेत्रे तयार करा.

● विशिष्ट कामगारांसाठी कूलिंग गियर, पाण्याची सुट्टी आणि संरक्षक कपडे (पीपीई) यासारख्या क्षेत्र–विशिष्ट सुरक्षा उपायांसाठी समर्थन द्या.

क. पूर्वसूचना प्रणाली लागू करा:

● कामगारांना उष्णतेच्या लाटेबद्दल वेळेवर सूचना एसएमएस, व्हॉट्सॲप ग्रुप किंवा कम्युनिटी रेडिओ घोषणांद्वारे मिळतील याची खात्री करा. सुलभतेसाठी स्थानिक भाषांचा वापर करा. थेट सुरक्षा सूचना पाठवण्यासाठी विद्यमान सरकारी डेटाबेस वापरा.

● कामगार नेते, संघटना, सहकारी नेटवर्क आणि नियोक्ते यांचा वापर करून स्थानिक चेतावणी प्रणालींना प्रोत्साहन द्या.

4. **अनौपचारिक कामगारांना उष्णतेशी लढण्यासाठी कसे तयार करावे?**

अ. कामगारांच्या नेतृत्वाखालील उष्णता लाट टास्क फोर्सेसची स्थापना आणि प्रशिक्षण:

● बांधकाम कामगार, कचरा वेचक, रस्त्यावरील विक्रेते, स्वच्छता कामगार आणि इतर अनौपचारिक कामगारांमध्ये क्षेत्रनिहाय मदत गट तयार करा.

● उष्णतेमुळे येणारा थकवा आलेले किंवा उष्माघाताचा सामना करणारे कामगार ओळखण्यासाठी व त्यांना मदत करण्यासाठी आणि गरज पडल्यास प्रथमोपचार देण्यासाठी सदस्यांना प्रशिक्षण द्या.

● मित्र प्रणालीला प्रोत्साहन द्या, जिथे कामगार एकमेकांची चौकशी करतील आणि जर एखाद्याला उष्णतेच्या ताणाची लक्षणे दिसली तर त्वरित मदत करतील.

ब. उष्णता संरक्षणाबाबत जागरूकता आणि प्रशिक्षण वाढवा:

● हायड्रेटेड राहणे, कामाच्या वेळेचे व्यवस्थापन करणे आणि उष्माघाताची लक्षणे ओळखणे यावर प्रशिक्षण सत्रे आयोजित करा.

● विक्रेत्यांसाठी अन्न सुरक्षा प्रशिक्षण, बांधकाम कामगारांसाठी व्यावसायिक आरोग्य कार्यशाळा आणि स्वच्छता कामगारांसाठी सुरक्षा सूचना यासारख्या सुरू असलेल्या कौशल्य विकास कार्यक्रमांसह उष्णतेच्या लाटेतील सुरक्षिततेबद्दल जागरूकता अनिवार्य करा.

● वारंवार पाणी पिणे, साखर/कॅफिनयुक्त पेये टाळणे, हलके जेवण खाणे आणि सैल, श्वास घेण्यायोग्य कपडे घालणे यासारख्या निरोगी सवयींना प्रोत्साहन द्या. उन्हापासून अतिरिक्त संरक्षणासाठी डोके झाकण्यासाठी कापड किंवा टोपी वापरण्यास प्रोत्साहित करा.

● अनौपचारिक आणि उघड्यावरील कामगारांमधील महिला आणि वृद्धांच्या आरोग्यावर आणि जीवनावर उष्णतेशी संबंधित परिणामांचा धोका जास्त असतो. महिला आणि वृद्ध कामगारांसाठी सुरक्षिततेच्या तरतुदी आणि विशेष लक्ष दिले पाहिजे.

क. अनौपचारिक कामगारांसाठी या सामान्य खबरदारींना प्रेत्साहन द्या. :

● हायड्रेटेड राहा: तहान लागली नसली तरीही वारंवार भरपूर पाणी प्या. पुन्हा वापरता येणारी पाण्याची बाटली जवळ ठेवा आणि शक्य असेल तेव्हा ती पुन्हा भरा.

● साखर आणि कॅफिनयुक्त पेये टाळा:

चहा, कॉफी आणि एरेटेड पेयांचे प्रमाण कमी करा, कारण ते

निर्जलीकरणामध्ये योगदान देऊ शकतात. त्याऐवजी, ORS किंवा ताकामुळे थंड राहून ऊर्जेची पातळी राखली जाते.

● हलके कपडे घाला:

थंड राहण्यासाठी सैल, श्वास घेण्यायोग्य, हलक्या रंगाचे सुती कपडे वापरा.

● डोके आणि शरीराचे उष्णतेपासून संरक्षण करा:

उष्णतेच्या थेट संपर्कापासून बचाव करण्यासाठी डोक्यावर आणि मानेवर टोप्या, स्कार्फ किंवा ओले टॉवेल घाला.

● सावलीत विश्रांती घ्या आणि वारंवार विश्रांती घ्या:

झाडांखाली, तात्पुरत्या निवाऱ्याखाली किंवा सावलीत असलेल्या इमारतींमध्ये वारंवार विश्रांती घ्या. जर तुम्ही मोकळ्या जागांवर (जसे की बांधकाम स्थळे, बाजारपेठ किंवा रस्ते) काम करत असाल, तर अतिताप टाळण्यासाठी आणि जास्त उन्हाचा संपर्क टाळण्यासाठी दर २०–३० मिनिटांनी छोटी विश्रांती घ्या.

ड. कामगारांना उष्णतेशी संबंधित आजार ओळखण्यास प्रशिक्षित करा:

● उष्णतेमुळे थकवा येण्याची लक्षणे:

जास्त घाम येणे, अशक्तपणा किंवा थकवा, चक्कर येणे, मळमळ होणे आणि डोकेदुखी.

● उष्माघाताची लक्षणे:

शरीराचे उच्च तापमान (१०३ओइ पेक्षा जास्त), भ्रम, जलद नाडी, मूर्च्छा येणे किंवा बेशुद्ध पडणे.

इ. खालील प्रथमोपचार उपायांना प्रोत्साहन द्या:

● बाधित व्यक्तीला थंड, सावली असलेल्या ठिकाणी हलवा.

● पाणी प्यायला द्या आणि घट्ट कपडे सैल करा आणि दारं खिडक्या उघडून टाका.

● चेहऱ्यावर, शरीरावर थंड पाणी लावा (ओल्या कापडाने किंवा स्पंज बाथने).

● लक्षणे कायम राहिल्यास ताबडतोब वैद्यकीय मदत घ्या.

● कामाच्या ठिकाणी नेहमीच आपत्कालीन हेल्पलाइन नंबर उपलब्ध ठेवा.

5. उष्णतेच्या लाटेत काय करता येईल?

अ. पिण्याचे पाणी आणि हायड्रेशनची उपलब्धता:

● सर्व अनौपचारिक कामगारांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध आहे याची खात्री करा.

● बाजारपेठा, बांधकाम स्थळे, औद्योगिक क्षेत्रे आणि सार्वजनिक वाहतूक केंद्रे यासारख्या जास्त रहदारी असलेल्या कामाच्या ठिकाणी वॉटर डिस्पेंसर किंवा हायड्रेशन स्टेशन बसवा.

● नियोक्ते, स्थानिक अधिकारी आणि कामगार सहकारी संस्थांना कामाच्या ठिकाणी (जसे की डीडब्ल्यूसाठी आरडब्ल्यूए कार्यालय, बांधकाम कामगारांसाठी इमारतीची ठिकाणे इ.) पाणी ब्रेक अनिवार्य करण्यासाठी आणि पुन्हा भरता येण्याजोग्या बाटल्या पुरवण्यासाठी प्रोत्साहित करा.

ब. सावलीची तरतूद:

● बांधकाम स्थळे, उघड्यावरील बाजार आणि इतर कामगारांच्या गर्दीच्या ठिकाणी तंबू, छत्री किंवा छत यासारख्या पुरेशा सावलीच्या रचना उपलब्ध करा.

● दीर्घकालीन गारव्याचे उपाय तयार करण्यासाठी सार्वजनिक कामाच्या जागा आणि बाजारपेठांमध्ये वृक्षारोपण आणि कायमस्वरूपी सावलीचे क्षेत्र तयार करण्याचे समर्थन करा.

● प्रवासात कामगारांना मदत करण्यासाठी सावलीचे पादचारी मार्ग आणि झाकलेले बस थांबे समाविष्ट करण्यास शहर नियोजकांना प्रोत्साहित करा.

क. उष्णता संरक्षण सामुग्रीचे वितरण

● कर्मचाऱ्यांना उष्णतेच्या ताणापासून वाचवण्यासाठी ओरल रिहायड्रेशन सोल्युशन (ORS), ग्लुकोज पॅकेट्स, कूलिंग टॉवेल, टोप्या आणि श्वास घेण्यायोग्य हलके कपडे यांचे सुलभ वितरण करा.

● मालक, संघटना, कामगार समूह आणि स्थानिक अधिकाऱ्यांनी प्रमुख कामाच्या ठिकाणी/किंवा कल्याणकारी मंडळांमार्फत या आवश्यक वस्तूंचे वितरण करण्यासाठी उष्णता लाट मदत मोहीम आयोजित करावी.

ड. विश्रांती आणि मदतीसाठी गारवा केंद्रे विकसित करा किंवा शोधा.

● जास्त गर्दी असलेल्या कामांजवळ तात्पुरती गारवा केंद्रे स्थापन करा - वाहतूक टर्मिनल्स आणि बाजारपेठांसारखी सार्वजनिक क्षेत्रे जिथे कामगार आणि मोठ्या प्रमाणात जनता थंड होण्यासाठी छोटी विश्रांती घेऊ शकतात.

● सार्वजनिक इमारती, सामुदायिक सभागृहे आणि विद्यमान पायाभूत सुविधा उघडा, जेणेकरून कामगारांसाठी सावलीत विश्रांती घेता येईल.

● सार्वजनिक उद्याने दुपारी (१२ ते ४) उघडी आहेत याची खात्री करा जेणेकरून कामगार सावलीत विश्रांती घेऊ शकतील.

● शहर नियोजनात शीतकरण पायाभूत सुविधा (जसे की सार्वजनिक उद्याने, ग्रीन झोन, वॉटर मिस्टिंग स्टेशन आणि सावलीत विश्रांती क्षेत्र) एकत्रित करता येतील अशा सार्वजनिक जागांची ओळख पटवा आणि त्यांचे नकाशे तयार करा.

6. उष्णतेच्या लाटांनंतर काय करता येईल?

अ. उष्णतेच्या लाटेनंतरच्या परिणामाचे मूल्यांकन आणि विश्लेषण

● आपत्कालीन प्रतिसाद प्रणाली, हायड्रेशन सुविधा आणि कामाच्या ठिकाणी बदल यासह हस्तक्षेपांच्या प्रभावीकतेचे मूल्यांकन करण्यासाठी उष्णतेच्या लाटेनंतरच्या परिणामाचे मूल्यांकन करा.

● रुग्णालयातील प्रवेश, मृत्युदर यांचा डेटा गोळा करा आणि धोरण आणि अंमलबजावणीतील तफावत ओळखण्यासाठी कामगार सर्वेक्षण करा.

● उष्णतेच्या लाटेनंतरच्या मूल्यांकनातील निष्कर्ष कामगार समुदायांसोबत पारदर्शकपणे सामायिक केले जातील आणि भविष्यातील शहर नियोजन चौकटीत एकत्रित केले जातील याची खात्री करा.

● भविष्यातील उष्णतेची जोखीम कमी करण्यासाठी सामाजिक संरक्षण उपाय, हवामान विमा योजना आणि शहरी आराखडा सुधारणांसह अनौपचारिक कामगारांच्या हवामान लवचिकतेसाठी दीर्घकालीन धोरणे विकसित करा.

ब. उष्णतेच्या लाटेमुळे प्रभावित झालेल्या अनौपचारिक कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा यंत्रणा

● आरोग्य विमा आणि वैद्यकीय सहाय्य: आयुष्मान भारत किंवा राज्य आरोग्य योजनांसारख्या विद्यमान योजनांअंतर्गत उष्णतेशी संबंधित आजारांसाठी कॅशलेस उपचार सुनिश्चित करून, अनौपचारिक कामगारांसाठी राज्य–समर्थित आरोग्य विमा कव्हर वाढवा.

● उत्पन्न संरक्षण आणि भरपाई: उष्माघाताशी संबंधित अनुपस्थिती किंवा कामाचे तास कमी करणे यासह, तीव्र उष्णतेच्या परिस्थितीमुळे उत्पन्न कमी झालेल्या कामगारांसाठी भरपाई योजना स्थापित करा.

● आपत्कालीन मदत निधी: उष्णतेच्या लाटेमुळे प्रभावित झालेल्या कामगारांना त्वरित आर्थिक मदत देण्यासाठी स्थानिक सरकारे आणि महानगरपालिका संस्थांमध्ये समर्पित निधी तयार करा, वैद्यकीय खर्च, गमावलेले वेतन आणि उपजीविका पुनर्संचयित करा.

● अतिवृष्टीच्या घटनांसाठी सामाजिक संरक्षण: उष्णता लाट, पूर किंवा इतर अत्यंत हवामान घटनांमुळे त्यांच्या कामात व्यत्यय येतो तेव्हा अनौपचारिक कामगारांना तात्पुरती बेरोजगारी समर्थन प्रदान करणारे हवामान–संबंधित उत्पन्न सुरक्षा कार्यक्रम विकसित करा.

● कामगार–नेतृत्वाखालील कल्याणकारी मंडळे: उष्णतेच्या लाटेची तयारी त्यांच्या फायद्यांमध्ये समाविष्ट करण्यासाठी, आपत्कालीन मदत, आरोग्य तपासणी आणि आर्थिक सहाय्य यासह विद्यमान कल्याणकारी मंडळे मजबूत करा.

NACEJ (नॅशनल अलायन्स फॉर क्लायमेट अँड इकॉलॉजिकल जस्टिस - NAPM), अनौपचारिक आणि उघड्यावरील कामगारांना हवामान बदल आणि अति उष्णतेपासून संरक्षण देण्याचे आणि हवामान न्यायाच्या त्यांच्या अधिकाराचे जोरदार समर्थन करते. त्यांच्या शारीरिक श्रमाद्वारे ते शहरी रहिवाशांचा राहणीमानाचा खर्च कमी करतात आणि कार्बन उत्सर्जन कमीत कमी ठेवतात. हवामान बदलाच्या संदर्भात, जे दरवर्षी आणखी वाईट होत चालले आहे, त्यांचा जीवन आणि कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेचा अधिकार सन्मानित करण्याची आणि सुनिश्चित करण्याची वेळ आली आहे. आम्ही सर्व नागरी समाज गट आणि कार्यकर्त्यांना तसेच सरकारला आवाहन करतो की त्यांनी अनौपचारिक कामगारांना प्राधान्य द्यावे, जे सर्वात असुरक्षित लोकसंख्या गटांपैकी एक आहेत, आणि या उन्हाळ्यात त्यांच्या संरक्षण आणि सुरक्षिततेसाठी सर्व प्रतिबंधात्मक उपाय सुनिश्चित करावेत.

मानवनिर्मित संकट परतवूया!

हवामान बदल, तपमान वाढ, भयंकर गर्मी,
अवकाळी पाऊस ही संकटे मानवनिर्मित!
हा विनाशकारी विळखा आपणच सोडवूया!!
सगळे मिळून हवामान संकट परतवूया!!!

टिप्पणी

पंजाबमध्ये महिला शेतकरी नेत्या व शिक्षिकांवर पोलिस अत्याचार

मीनल उत्तुरकर

पंजाब राज्यात अलीकडेच घडलेल्या एका गंभीर घटनेने संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले आहे. बठिंडा जिल्ह्यातील चौके गावातील आदर्श सीनियर सेकंडरी स्कूल मधील महिला शिक्षकांवर अन्याय झाला असून, या शिक्षकांना पाठिंबा देणाऱ्या महिला शेतकरी नेत्या हरिंदर बिंदू आणि परमजीत कौर पीथन यांच्यावर पोलिसांकडून अमानवी अत्याचार करण्यात आला आहे. या प्रकरणामुळे एकाच वेळी राज्यातील महिला सक्षमीकरण, पोलीस यंत्रणेचा बेजबाबदारपणा आणि लोकशाही विरोधी प्रवृत्तींचे वास्तव उघड झाले आहे. या विरुध्द देशभरातून संताप व्यक्त करण्यात आला आणि देशातील विविध सामाजिक संघटना, महीला हक्क कार्यकर्त्या, जन चळवळीचे कार्यकर्ते यानी पंजाबच्या मुख्यमंत्र्यांना पात्र लिहून संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची विनंती केली. मुख्यमंत्री हे स्वत: शेतकरी आंदोलनाला समर्थन दिल्ल्याने नंतर झालेल्या निवडणुकीतून मुख्यमंत्री झाले आहेत.

आंदोलनाची पार्श्वभूमी

आदर्श सीनियर सेकंडरी स्कूलमध्ये गेल्या दोन महिन्यांपासून शिक्षकांचे आंदोलन सुरू होते. ही शाळा सार्वजनिक-खाजगी भागीदारीत (PPP) चालवली जाते आणि तिच्या निधीचा ७०% हिस्सा राज्य सरकारकडून दिला जातो. शिक्षकांचे आरोप होते की शाळा व्यवस्थापनाने त्यांच्या पगारांची थकबाकी दिली नाही तसेच अनेक कर्मचाऱ्यांना बेकायदेशीररित्या कमी केले गेले. आर्थिक अपारदर्शकतेबद्दल जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समितीने अहवाल दिला होता, पण शासनाने तो ना सार्वजनिक केला, ना त्यावर काही कारवाई केली.

पोलिसांचा बळाचा वापर

५ एप्रिल रोजी, शाळेसमोर आंदोलन सुरू असताना शाळेच्या व्यवस्थापकांनी पोलिसांना बोलावले. पोलीसांनी आंदोलनकर्त्यांवर बळाचा वापर केला. काही शिक्षकांना अटक केली गेली, ज्यात एका १३ महिन्यांच्या बाळासह आलेली महिला शिक्षकाही होती. त्यानंतर, भारतीय किसान युनियन (एकता उग्राहन) या शेतकरी संघटनेचे काही नेते, ज्यात हरिंदर बिंदू आणि परमजीत कौर पीठों होत्या, त्या या शिक्षकांच्या समर्थनार्थ, अटक केलेल्या शिक्षिकांना सोडून द्यायच्या मागणीसाठी पोलीस ठाण्याबाहेर धरणे आंदोलनात सामील झाल्या. हे आंदोलन पूर्णपणे शांततेत होते. परमजीत कौर यांनी दिल्लीबाहेर झालेल्या ऐतिहासिक किसान आंदोलनात सक्रीय सहभाग घेऊन महत्त्वाची भूमिका पार पाडली होती.

पण पोलीस अचानक मोठ्या संख्येने आले आणि कोणतीही पूर्वसूचना न देता आंदोलनकर्त्यांवर लाठीचार्ज केला. विशेषत: हरिंदर बिंदू आणि परमजीत कौर यांच्यावर अतिशय निर्दयीपणे हल्ला करण्यात आला. बिंदू यांच्या कानांवर जोरदार मार बसल्याने त्यांना श्रवणशक्तीही कमी झाली. त्यांचे केस ओढून फरपटत नेले गेले. त्यांच्यावर लाथा–बुक्क्यांचा आणि अपशब्दांचा मारा करण्यात आला. पुरुष पोलिसांनी त्यांचे केस पायाखाली ठेवले आणि महिला पोलिसांना त्यांच्या पायांनी ओढायला सांगितले. या अमानुष मारहाणीदरम्यान त्यांचे कपडे फाटले, चष्मे फोडले गेले. पुरुष पोलिसांबरोबर महीला पोलिसांनीही त्यांना मारहाण केली.

यानंतर त्यांना २ तासाच्या प्रवासानंतर एका दुसऱ्या पोलीस ठाण्यात नेण्यात आले. तिथे त्यांना DSP प्रदीप सिंह, SHO जोगिंदर सिंह, सब इन्स्पेक्टर हरप्रीत कौर व सुखवीर कौर यांनी पुन्हा मारहाण केली. परमजीत कौर यांना मणक्याचा त्रास असूनही पाठीवर मारण्यात आले व त्यांना सांगण्यात आले की, "आता पुन्हा कधी व्यासपीठावर दिसणार नाहीस." त्यांना पाणी, स्वच्छता गृह आशा गरजेच्या सुविधाही पुरवल्या नाहीत. वैद्यकीय तपासणी दरम्यान शरीरावरील जखमा दाखवल्या गेल्या तरी डॉक्टरांनी त्या नोंदवण्यास नकार दिला. त्यांनी लॉक अप मध्ये ठेवण्यात आलं. तिथेही त्यांना अतिशय वाईट वागणूक देण्यात आली.

न्यायाची प्रतीक्षा

१० एप्रिल रोजी दोघींना सायंकाळी सोडण्यात आले आणि त्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. पण पुढील ४८ तासांपर्यंत पोलिसांनी कोणताही जबाब नोंदवला नाही, म्हणजेच जबरदस्तीच्या साक्षीचा पुरावा नष्ट करण्याचा स्पष्ट प्रयत्न झाला. १३ एप्रिल रोजी हरिंदर बिंदू आणि परमजीत कौर यांनी वरिष्ठ पोलीस अधिक्षक, पंजाब DGP यांच्याकडे लेखी तक्रार केली. पण आजतागायत कोणतीही कारवाई झालेली नाही.

या संपूर्ण प्रकरणामुळे समाजातील अनेक वर्गातून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. देशातील सामाजिक कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात केलेल्या खालील मागण्या अत्यंत

(पान ३६ वर)

विषेश

पर्यावरण जगवण्यासाठी लोकशाहीचे आरोग्य महत्वाचे

इंदवी तुळपुळे

पालघर येथे पार पडलेल्या 'महीला आरोग्य हक्क परिषदेच्या' नवव्या संमेलनात जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या इंदवी तुळपुळे यांनी अतिशय प्रभावी मार्गदर्शन केलं. ते त्यांचं बीजभाषण इथे वाचकांच्या माहितीसाठी देत आहोत. त्याच बरोबर इंदवी ताईंचा परिचयही थोडक्यात.

समाजवादी विचारांच्या कुटुंबात इंदवी ताईंचा जन्म झाला. राष्ट्र सेवादलात जडण घडण झाली. समाज कार्याचे शिक्षण घेतल्या नंतर त्यांनी कामाची सुरुवात वन निकेतन च्या माध्यमातून केली. पुढे जमीन, जंगल हक्क, मजुरी, पोलीस अत्याचार असे विषय समोर आल्यावर संघर्षाला पर्याय नाही हे जाणून जनसंघटन उभं केलं. जल, जंगल, जमीन या मुद्द्यावर आदिवासींच्या सोबत जोमाने काम सुरू केलं. आपण शहरात शिकलेलो. शहरी आणि ग्रामीण हा भाग किती वेगळा, समस्या निराळ्या. त्यामुळे काम करताना वेगवेगळ्या मुद्द्यांवर सखोल अभ्यास, खूप जोमाने, खूप चिकाटीने प्रयत्न करावे लागतात ते प्रयत्न ताईंनी केले. ठाणे जिल्ह्यातील अन्य संघटना संस्थां सोबत वनहाक्कासाठी सर्वोच्च न्यायालयात यशस्वी लढा दिला. हे काम करत असताना त्यांनी कायद्याचाही अभ्यास केला. काळू धरण रोखण्यासाठी जनहित याचिका दाखल केली. पर्यावरण जागृती व संवर्धनासाठी संघटनेने 'हिरव्या देवाची यात्रा' हा उत्सव सुरू करून गेली दहा वर्षे सातत्याने विविध कार्यक्रम घेतले जातात. त्यात स्थानिक ज्ञान टिकावे आणि त्यास प्रतिष्ठा मिळावी म्हणून रानभाज्या स्पर्धा, वनौषधी प्रदर्शन, विषमुक्त शेतकरी पुरस्कार असे उपक्रम असतात.

उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळावर राज्यपाल नियुक्त तज्ज्ञ सदस्य म्हणूनही त्यांनी तीन वर्षे काम केलं. त्या काळात आदिवासी जमीन हस्तांतरण, स्थलांतर थांबवण्यासाठी रोजगार निर्मिती व वन हक्कांतून कुपोषण मुक्ती ही कामे त्यांनी हाती घेतली. त्यांच्या या कामाची दखल घेत त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित केलं गेलं आहे.

अनेक संस्था संघटनांसोबत काम करत त्यांनी ठाणे जिल्ह्यातील मुरबाड येथे गेली 40 वर्ष आदिवासी समाजासोबत त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी श्रमिक मुक्ती संघटनेच्या माध्यमातून वेठ बिगार, लगीन गडी, आदिवासी व महिलांवरील अत्याचार यासारख्या अन्यायांना वाचा फोडत आहेत. अजूनही त्या अनेक प्रश्नांवर धैर्याने, धडाडीने काम करत आहेत.

वर्षाताईनी सकाळी सकाळी जिलबी किंवा पेढे किंवा काहीतरी खाल्लेल आहे, गोड गोड बोलतात. पण मला जे पुढे बोलायचं आहे त्याच्यात काही गंभीर असणार आहे. ते सगळं यामध्ये जाईल. आज नवव्या महाराष्ट्र आरोग्य हक्क परिषदे साठी मला इथे बीज भाषण द्यायला बोलवलं त्याचा खूप आनंद एका बाजूला आहे आणि बरच दडपण आहे कारण विचार मंचावर ज्या माझ्या जेष्ठ मैत्रिणी आहेत त्या सगळ्या आरोग्य, महिला आरोग्य या विषयात इतक्या तज्ज्ञ आहेत की मला त्या मानाने खूपच कमी अनुभव या विषयात आहे त्याची जाणीव होते. समोर बघितलं तर समोर सुद्धा अनेक जेष्ठ मैत्रिणी, अनेक जेष्ठ कार्यकर्ते आणि माझ्याच बरोबर काम करणारे आणि लहान मैत्रिणी सुद्धा आहेत, तरुण मैत्रिणी आहेत ज्या पुढे काय करावं या विचाराने इथे आलेल्या आहेत. या सर्वांच्यासाठी मला काही बोलायचं हे लक्षात घेऊन मला काही दडपण आलेलं आहे. पण तरी सुद्धा आजच्या घडीला, गेल्या 40 वर्षात अनेक विषय हाताळत हाताळत संघटना म्हणून, कार्यकर्ते म्हणून, जेव्हा आपण काम करतोय तेव्हा या परिषदेचा जो विषय आहे, विकास प्रकल्प आणि आरोग्य किंवा महिला आरोग्य याकडे वळण्यापूर्वी मला हे प्रकर्षाने जाणवलं ते म्हणजे - इथे प्रत्येकजण आपल्याला अभिवादन करताना म्हणतोय आणि आम्ही संघटना नेहमीच म्हणत

आलोय. आपण भेटलो तरी बोलतो. काय म्हणतो? जिंदाबाद! आज सुद्धा सगळ्यांची सुरुवात या जिंदाबादने झाली.

हे जिंदाबाद काय आहे? एकजुटीचं प्रतीक आहे. ताकदीचं प्रतीक आहे. हा जो शब्द आहे तो फार महत्वाचा आहे. जिंदा आबाद... आपण एकमेकांना हे सांगतोय की आपलं जे काही काम आहे, आपलं जे काही आयुष्य आहे, ते सन्मानाने आणि कायम शाश्वत पद्धतीने जगलं पाहिजे, टिकलं पाहिजे. आपल्या संघटना टिकल्या पाहिजेत. आपले संघर्ष टिकले पाहिजेत आणि म्हणून आपण हे जिंदाबाद अभिवादन करतो.

आज जर विचार केला तर हे जिंदाबाद अभिवादन करायलाच भीती वाटायला लागली आहे. कारण आपण कसं म्हणणार आहोत आपल्या एकमेकांना की आपण कायम आनंदी, प्रतिष्ठेने सन्मानाचं जीवन जगूया?

खूप उत्साहाने आपण या परिषदेच्या इतिहासाबद्दल बोललो. इतकंच नव्हे तर खूप उत्साहाने आपण खालून तारपा नृत्य करत आनंदाने वरती आलो. या उत्साहावर विरजण घालण्यासाठी नव्हे पण गांभीर्य जाणवायला पाहिजे यासाठी मला काही मांडावसं वाटत. आपण सन्मानाने जगायचं असेल तर आपले जे जीवनाधार आहेत… म्हणजे आज माणसाला काय लागत? माणसाला जे जीवनाधार आज आहेत जे आज पालघर सारख्या जिल्ह्यात असल्यामुळे - आपल्याला नुसती बाहेर नजर टाकली तरी दिसते. जंगल आहे, डोंगर आहे ,सूर्या नदी शेजारी आहे, थोडंस बाजूला गेलं तर समुद्र आहे. शेती आहे. बागायती आहे. म्हणजे हा जिल्हा एवढा प्रातिनिधिक आहे की काय नाही इथे असा प्रश्न पडेल. ही जी सगळी नैसर्गिक संसाधनं आहेत त्याच्याच आधारे आज ही संपूर्ण सजीव सृष्टी, आपण त्याला पर्यावरण म्हणू, पृथ्वी म्हणू काही म्हणू. पण हेच आपले जीवनाधार आहेत. मग तो अगदी मच्छीमार असो, शेतकरी असो, शेत मजूर असो की औद्योगिक कामगार असो किंवा शहरामधला उद्योगपती. सगळा जो डोलारा उभा आहे तो यांवरच.

आपण जर आरोग्य एवढी जरी एक संकल्पना घेतली तरी या सगळ्याचं जे आरोग्य आहे ,आपल्या पर्यावरणाचं, आपल्या पृथ्वीचं, आपल्या निसर्गाचं, ते वजा करता आपल्याला कुठलंही आरोग्य लाभू शकत नाही. बरेचदा म्हटलं जातं की स्त्री आणि धरती – पृथ्वी, स्त्री आणि नदी हे खूप साधर्म्य असलेले निसर्गातले घटक आहेत. स्त्रिचा आरोग्य हे नदीच्या आरोग्यात आणि नदीचं आरोग्य हे स्त्रीच्या आरोग्यात प्रतिबिंबित होतं. नदी जवळच्या समुद्राचं आरोग्य हे तिथल्या महिलांमध्ये प्रतिबिंबित होतं आणि जंगलाचं आरोग्य हे आदिवासी समाजात आणि त्याच्या आरोग्यामध्ये... त्यामुळे आपल्याला महिला आरोग्य परिषदेच्या या विषयात जर खोलवर जायचं असेल तर आपल्याला आज पृथ्वीच्या आरोग्याची, पर्यावरणीय आरोग्याची जी काही आणीबाणी आहे तिचा विचार केल्याशिवाय पुढे जाता येणार नाही आणि त्याची परिस्थिती काय आहे ही आज तुम्हा आम्हाला जगताना जाणवते. शास्त्रज्ञानी काय सांगितलंय, त्याच्याही बद्दल थोडस बोलू पण आपल्याला काय वाटतं? आज आपण ज्या पद्धतीच्या उन्हाळ्याबद्दल ऐकतो आहे, किंवा तुम्हाला माहिती आहे की बातम्या रोज येतात ..22 एप्रिलला वसुंधरा दिन होता. त्या दिवशी सोशल मीडियावर म्हणा अनेक ठिकाणी वसुंधरा दिन साजरा झाल्याच्याही बातम्या आल्या. कार्यक्रमांचे फोटो टाकले गेले. त्याच प्रकारे प्रत्यक्ष आज पृथ्वीवर काय परिस्थिती आहे याच्या ज्या काही बातम्या होत्या त्या इतक्या गंभीर आणि इतक्या अस्वस्थ करणाऱ्या होत्या की त्यांचा उल्लेख इथे करावाच लागेल. त्यातला मूळ काही गोष्टी आहेत त्या मला इथे सांगाव्या वाटतात आवर्जून!

आपण आजारी आहोत हे कसं ओळखतो? एक तर आपल्याला आजारी वाटतं. पण आपल्याला आजकाल डॉक्टर बघून, तुम्हाला स्टेटोस्कोप लावून किंवा आ करा , जीभ दाखवा, नाडी बघू दे असं बघून तपासत नाहीत. आपल्याला काय करायला सांगतो ? काही चाचण्या करायच्या आणि मग त्याच्यामध्ये आपल्या काही मर्यादा आपण ओलांडलेल्या असल्या की आपण आजारी आहोत .आपल्याला काय काय असू शकतं?

तुमच हिमोग्लोबिन- मग ते इतकं खाली आलं का म्हणजे आपण आजारी. ब्लड प्रेशर काय 70 110 80 120 असं काही असेल तर ठीक आहे. तुमच 150 160 वगैरे गेलं की बाप रे बाप! आपण म्हणतो ना आरोग्याचा प्रश्न आला की आपण माणसाच्या आरोग्यासाठी या सगळ्या चाचण्या करून मग आपण किती गंभीर आहोत याचा विचार करतो आणि आरोग्याकडे लक्ष द्यायला लागतो. तसं पृथ्वीच्या आरोग्याचा, आपल्या पर्यावरणाच्या आरोग्याचा काय विचार करतो? आपण कोणती चाचणी लावतोय? शास्त्रज्ञानी ज्या लावलेल्या आहेत त्या अनेकांना माहित असतील. मी फार खोलात जाणार नाही. 2009 सालच्या

सुमाराला पृथ्वीबद्दल अभ्यास करणाऱ्यांनी सांगितलं की पृथ्वीच्या, निसर्गाच्या, पर्यावरणाच्या... नऊ मर्यादा आहेत, ज्या ओलांडल्या गेल्या तर निरोगी जीवन माणसासाठी अशक्य आहे. माणसांना निरोगी, आनंदाचं, सुखाचं जीवन जगायचं जर असेल तर या निसर्गामध्ये या पृथ्वीच्या नऊ मर्यादा पाळल्या गेल्या पाहिजेत. पण या नऊ पैकी सहा मर्यादा आपण ओलांडलेल्या आहेत बरं का ! कोणत्या या सहा ओलांडलेल्या मर्यादा ?

अगदी सोपं बोलायचं तर पहिली मर्यादा आहे ती हवामान बदल. याबद्दल अधिक बोलण्याची गरज नाही कारण हवामान बदल या गोष्टीवरती अनेक चर्चा सत्र, अनेक पेपर, आता चित्रपट सुद्धा येत आहे. हवामान बदलाचे महत्वाचे दर्शक आहेत ते म्हणजे प्रचंड तापमान वाढ, त्यामुळे अतिवृष्टी , पूर, वादळे, गारपिटी, दुष्काळ यांसारख्या वारंवार येणाऱ्या नैसर्गिक आपत्ती. दुसरी मर्यादा ओलांडलेली आहे जैविक विविधतेची. जैविक विविधतेचा ऱ्हास आणि प्रजातींचे नष्ट होणे हे प्रमाणाबाहेर होऊन संतुलनाची मर्यादा ओलांडली गेलेली आहे.

आपण सगळे ग्रामीण भागातले आहोत. आपल्याला शेतीतल्या पिकातल्या प्रजाती माहिती आहेत, माशातल्या प्रजाती माहिती आहेत, कीटकातल्या माहिती आहेत, वनस्पतीतल्या माहिती आहेत.. साधारण एक दशलक्ष प्रजातींपैकी साधारण 10 प्रजाती वर्षभरात संपणे हे मर्यादेत मानले जाते. आज असं दिसत आहे की एक दरवर्षी दशलक्ष प्रजातींपैकी 100 प्रजाती नष्ट होत आहेत. तुम्ही म्हणाल यात आरोग्याचा काय संबंध आहे? आरोग्य परिषदेत अश्या काहीतरी आकडेवारीला काही अर्थ नाही. पण आपण आठवूया कोरोना! काय गंभीर परिस्थिती होती. हे असं जमणं, असं बोलणं, भेटणं शक्य होत नव्हतं. ही गंभीर परिस्थिती जर रोगजंतूंच्या अनिर्बंध वाढीमुळे उद्भवली असेल तर जैविक विविधतेचे संतुलन बिघडल्यास असे अनेक नवे नवे आजार भविष्यात येण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

असे संतुलन बिघडायला लागलं, म्हणजे, काही स्थानिक पिकांच्या प्रजाती संपल्या आहेत, माशांच्या प्रजाती संपत आहेत, मधमाशांच्या प्रजाती संपत आहेत.... मधमाशा ज्या मध्यवर्ती आहेत आपल्या संपूर्ण शेती व्यवस्थेसाठी आणि कोणत्याही अन्नाच्या उत्पादनासाठी... तर हे सगळं हे आरोग्यावरच शेवटी हल्ला करणारं आहे. तिसरी आणि ज्याच्याबद्दल असं म्हटलं जात आहे की ज्याच्यातून महायुद्ध पण निर्माण होत होऊ शकतं ती मर्यादा आहे ताज्या गोड्या पाण्याचा उपसा. आपण समुद्राचं पाणी पिऊन जगू शकत नाही. आणि आज पाण्यासाठी इतकी बिकट परिस्थिती झालेली आहे. कुटुंबासाठी पाणी पुरवण्याचा संपूर्ण विषय हा महिलेशी संबंधित आहे आणि महिलेच्या आरोग्याला अनेक जे धोके आहेत किंवा अनेक जी आव्हानं आहेत त्यात पाणी मिळवणं हे मोठं आव्हान आहे आणि पृथ्वीची ताज्या पाण्याची मर्यादा आपण ओलांडलेली आहे.

आपल्यासाठी हेही लक्षात घेणे महत्वाचे आहे की एकूण भूगर्भातल पाणी जे उपसलं जातं त्यात 20 ते 25 टक्के पाणी एकटा भारत उपसतो असे आकडेवारी सांगते. म्हणजे आपण जेव्हा कधी या परिषदेत आपल्या विकास प्रक्रियेतील हस्तक्षेपाद्दल बोलणार आहोत तेव्हा आपल्याला आपले सकारात्मक हस्तक्षेप काय असावेत याचा विचार करताना हा विचार करायला पाहिजे की आणखी धरणे, आणखी खोल विहीरी, खोल बोरिंग याच्या पलीकडे पाण्याचा प्रश्न सोडवण्याचा विचार केला पाहिजे.

त्याच्यानंतरची आपण जी मर्यादा ओलांडली आहे ती जमिनीच्या वापराची व्यवस्था. म्हणजे काय ते मलाही पहिल्यांदा कळलं नाही. मलाही अभ्यास करावा लागला. आपल्याला फार नॉर्मल वाटतं की एक गाव लहान पडलं, पाडा 25 घराचा होता, मग 50 घरं झाली. ती बांधायला शेतजमीन वापरली, कुठेतरी जंगल साफ केलं, कुठेतरी नदीत भराव टाकला. अर्धी मुंबई तर समुद्रात भराव टाकून उभी आहे; हे करण्यासाठी आपण जमिनीचे जे प्रमाण ज्या गोष्टींसाठी होती त्याच्याशी सगळा पार खेळ करून टाकला आणि आज पृथ्वीचा जेवढा भाग जंगलाखाली पाहिजे, हिरव्या आच्छादनाखाली पाहिजे तो राहिलेला नाही. जंगल कमी होणं, हिरवं आच्छादन कमी होणं याचा सरळ सरळ संबंध अन्नसाखळीशी आहे, हवामानाशी आहे, पाण्याशी आहे, ऑक्सिजन आणि कार्बन डायऑक्साइडच्या संतुलनाशी आहे. म्हणजेच आपल्या आरोग्याशी आहे.

आणखी आपण ओलांडलेली जी मर्यादा आहे ती मानवनिर्मित प्रदूषणाची. काय आहे हे ? प्रामुख्याने मायक्रोप्लास्टिक! तुम्ही वाचले ऐकले असेल की आज आपल्या अन्नात, पाण्यात आणि हवेत अतिशय बारीक, डोळ्याला न दिसणारे असे मायक्रोस्कोपिक प्लास्टिक कण आहेत. जरी आपण बाटलीबंद पाणी प्यायलो तरी सुद्धा ते आहे, आपण मासे खाल्ले तर मासे ज्या पाण्यात मोठे झालेत त्या पाण्यातून माशांमध्ये आणि माशांमधून

आपल्या पोटात ते जाते. आपण म्हणतोय आजकाल असे आजार दिसायला लागलेत की ज्याचं काही कोणाला कळतच नाही. कुणाच्या पोटात, कोणाच्या रक्तात, मेंदू मध्ये काहीतरी अडकतं....आमच्या गावठी भाषेत म्हणतात. आजवर विकासाच्या नावाखाली जे उपभोगवादी जगण्यासाठी मानवाने केलंय त्यातून निर्माण झालेले हे आरोग्याचे धोके आहेत त्याची जाणीव आपल्याला आता हळूहळू होते आहे.

सहावी जी मर्यादा आपण ओलांडली आहे ती आपल्या शेती व्यवस्थेशी संबंधित आहे. विकासाचा भाग म्हणून, हरित क्रांतीचा भाग म्हणून, उत्पादन वाढ म्हणून रासायनिक शेतीकडे आपण वळल्यापासून पृथ्वीवरचे जैव–भू–रासायनिक संतुलन मर्यादेबाहेर ढासळले आहे. पाण्यामधलं नायट्रोजन आणि फॉस्फरस चक्र ज्यावर संपूर्ण पाण्यातील जी जीवसृष्टी आहे ती धोक्यात आलेली आहे, पर्यायाने आपले आरोग्यही धोक्यात आलेले आहे.

ओलांडायच्या राहिलेल्या तीन मर्यादांबद्दल मी येथे बोलणार नाही. कारण अजूनही त्या मर्यादा आपण ओलांडलेल्या नाहीत. याचा अभ्यास आपण कोणीही करू शकतो. त्याच्यामध्ये मी आता वेळ कमी आहे म्हणून बोलत नाही. मात्र हे जे पर्यावरणाचं आरोग्य आहे हे बिघडण्या मागे जो सगळ्यात महत्वाचा मुद्दा आहे तो म्हणजे आपण निवडलेला विकासाचा मार्ग. आपण निवडलेला मी म्हणत आहे कारण शेवटी तो माणसांनी निवडलाय. आज आपण ज्यांच्याबरोबर काम करतो तो मच्छीमार असो, तो लहान शेतकरी असो, तो आदिवासी असो त्याचा फार कमी हातभार आहे या मर्यादा ओलांडण्यात. त्यांची जीवनशैली ही बरीचशी निसर्ग स्नेही आहे अजूनही. अति प्रचंड भांडवली गुंतवणूक असलेल्या आणि जे नैसर्गिक संसाधनांचं प्रचंड दोहन करतात अशा उद्योगांमधूनच विकास / प्रगती होते असे मानणाऱ्या विकृत विचारांमुळे पर्यावरणाचे आरोग्य बिघडले आहे.

मग प्रश्न असा येतो की हे सगळं चाललंय ते चालणारच आहे आणि आपण म्हणतोय की एवढी मोठी आणीबाणी आहे मग आपण आरोग्यहक्क हा विषय घेऊन यात हस्तक्षेप कसा करणार? आता पालघर जिल्ह्याबद्दल बोलायचं झालं तर मला वाटतं की दशदिशांना बघितलं तर आपल्याला दिसतंय की निसर्गाची, पर्यावरणाची वाट लावायला घेतली आहे. पालघर जिल्हा हा स्वतंत्र आदिवासी जिल्हा झाला, फार मोठ्या अपेक्षा वाढल्या. पण आज कुठल्याही दिशेला बघितलं तर विकासाच्या नावाखाली आक्रमण आहे.

या विकासाच्या नावाखाली होणाऱ्या आक्रमणातून नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास आहे आणि प्रचंड प्रदूषण आहे. आधी फक्त मायक्रोप्लास्टिक कचऱ्याबद्दल आपण बोललो. पण आज बायका सरपण गोळा करायला जाऊदेत, पाणी आणायला जाऊदेत, रोजगाराला जाऊदेत, इतक्या प्रचंड अत्यंत घाणीचा सामना त्यांना करायला लागतो. स्वच्छता हा चांगल्या आरोग्याचा एक महत्वाचा घटक आहे. पण तथाकथित विकास प्रकल्प आणत आहेत अशक्य पद्धतीची अस्वच्छता की जी स्वच्छच करता येत नाही.

काय आहेत आज विकास प्रकल्पांच्या प्रेरणा? पूर्वी एक लोकप्रिय पालुपद असायचं... इंग्रजीत ते शब्द होते आणि ते वाढते होते म्हणून छान वाटायचे. More, Bigger, better .. म्हणजे आपल्याकडे आहे त्याच्यापेक्षा जास्त पाहिजे, आहे त्याच्यापेक्षा मोठ्ठं पाहिजे ,आहे त्याच्यापेक्षा चांगलं पाहिजे . आता तर काय आहे त्याच्यापेक्षा Fast पाहिजे. आपल्याला अति वेगाने जाण्यासाठी समृद्धी हायवे पाहिजे.

शिवाय, कष्ट नकोत सर्व Easier पाहिजे. मात्र या सगळ्यातून आपण Dirtier झालोय, आपण कोरडे होत चाललोय, आपली संसाधने सगळी रोडावत चालली आहेत, प्रदूषित होत चालली आहेत, कित्येक नष्ट झाली आहेत. करण हा विकासाचा निर्णय जो आहे त्याच्याकडे आपलं दुर्लक्ष झालंय. आपण सुरुवातीला संविधानाचं वाचन केलं. संविधानाच्या प्रास्ताविकेचं वाचन केलं. आपली संविधानाची आपण स्वीकारलेली मूल्य आहे त्याच्यात स्वातंत्र्य समता बंधुता सगळं असताना मुळात लोकांचे लोकांनी चालवलेले लोकांसाठीचे राज्य आहे. मग तुम्ही सांगा मला आपले हे विकासाचे निर्णय हे लोकांनी घेतलेले आहेत का? काय वाटतंय आपल्या सगळ्यांना? आपल्या देशात लोकशाही आहे. आपण निवडून दिलेलं सरकार बसतं, विधानसभेत बसतात आपण दिलेले निवडून दिलेले आमदार. लोकसभेत बसतात आपण निवडून दिलेले खासदार. ते निर्णय घेतात की बुलेट ट्रेन हवी आहे. ते निर्णय घेतात की आता कुठला तो कॉरिडॉर हवा आहे. ते निर्णय घेतात की वाढवण बंदर करायचं आहे. ते निर्णय घेतात म्हणजे आपण निर्णय घेतो ना. हो की नाही?

नाही, बहुसंख्य लोकांच्या मतांचा, इच्छांचा , गरजांचा विचार या निर्णयात नसून मुठभर धनदांडग्यांच्या नफ्याचा, चैनीचा

आणि सत्ता टिकवण्याचा विचार इथे वरचढ ठरतोय.

मला वाटतं या परिषदेचा हा मुख्य प्रश्न असला पाहिजे की सर्व आरोग्याच्या प्रश्नांमध्ये लोकशाहीच्या आरोग्याचं काय? लोकशाहीचे आरोग्य म्हणजे काय हो? लोकशाहीचे आरोग्य म्हणजे एवढंच आहे ना की निर्णय प्रक्रिया ही जास्तीत जास्त विकेंद्रित होणे, पारदर्शक होणे, त्यामध्ये बहुसंख्यांच्या गरजा व इच्छा प्रतिबिंबित होणे. प्रत्यक्षात निर्णय प्रक्रिया आज केंद्रित होत चालली आहे.

इथे सरपंच बाई बसल्या आहेत. सरपंच म्हणून त्यांचा अधिकार आपल्या देशामध्ये आपल्या राज्यघटनेनुसार केवढा मोठा आहे. पण केवळ बैठकीच्या वेळी खुर्चीवर बसणं एवढं सोडून सरपंचांचं काय ऐकलं जातं? तुम्ही सांगितले की हे पाहिजे आमच्या गावाला आणि हेच झालं पाहिजे ते ऐकलं जातं? नाही ना?

म्हणूनच, आपण निश्चित आपल्या आरोग्य सेवा देणाऱ्यांवर देखरेख ठेवली पाहिजे. पण मुद्दा हा आहे की आम्हाला आमच्या सन्मानाने जगण्यासाठी काय पाहिजे आणि काय नको त्याचा निर्णय आम्हाला घेता आला पाहिजे ना? आणि त्यासाठी लोकशाही टिकली पाहिजे.

गेल्या आठवड्यात आपण सर्वांनी येऊ घातलेल्या जन सुरक्षा अधिनियमाच्या विरुद्ध आंदोलन केलं, निदर्शने केली. उद्या असं म्हटलं जाईल की तुम्ही संविधानाची प्रास्ताविका जी वाचली त्याच्यामध्ये तुम्ही काहीतरी टीका केली आहेत सरकारवर. तेव्हा आज सर्वात शेवटी मला असं म्हणावं लागतं की आरोग्याच्या सर्व प्रश्नांमध्ये आपल्याला आपली लोकशाही कशी टिकवायची आणि त्यासाठी आपली ताकद कशी वाढवायची? आपली ताकद संघटनेत आहे. आपला मोर्चा हजारोंचा निघतो. पण तरीसुद्धा आपल्याकडे येणारा प्रकल्प थांबवताना आपलं कोणीही ऐकत नाही ही परिस्थिती आज आपल्या देशात झालेली आहे.

राजकारणात आपली छाप कशी उमटवता येतील हा सगळ्यात कळीचा प्रश्न आपल्यासमोर आहे. लहान लहान प्रश्न हाताळायचे नाहीत असं मी म्हणणार नाही अजिबात, कारण कोणत्याही संघटना वाढण्यासाठी कोणत्याही चळवळी वाढण्यासाठी लहान लहान प्रश्न उचलावे लागतात. लहान लहान उपक्रम घ्यावे लागतात. लहान पातळीवरून मोठ्या पातळीवरती आपली ताकद वाढवत न्यायला लागते. पण आपला अंतिम उद्देश तो आहे की आमची लोकशाही टिकली पाहिजे. आमचं म्हणणं, आमचा आवाज हा टिकला नाही तर आज फक्त आणि फक्त भांडवल, नफा आणि त्यातून त्यासाठी लागणारा संपूर्ण प्रपंच विकासाच्या नावाने केला जाईल. विकासाची जी नशा चढली आहे अदानी अंबानी सारख्या लोकांना, त्यांच्यामुळे आपल्या सरकारांना, मग ते महाराष्ट्रातले असो की दिल्लीतले असो. ती नशा उतरवणं हे आपलं काम आहे. ती उतरवण्यासाठी आपल्याला रस्त्यावर, तुरुंगात कुठेही जायची वेळ आली तर जावे लागेल मग त्या आरोग्याच्या चळवळी असोत, जमिनीच्या चळवळी असोत, जंगल हक्काच्या चळवळी असोत. पण त्या हक्काच्या चळवळी आहेत हे लक्षात ठेवून आपल्याला काम करावं लागेल. कारण मला असं वाटतंय की आपण उत्साह नाही घालवणार. कितीही गंभीर परिस्थिती असली तरी आपल्याला त्यातून पुढे गेलं पाहिजे.

कारण आपण जेव्हा देशाला स्वातंत्र्य मिळावलं, त्याही वेळेला आपण बघितलंय की एक एक पिढी अशी असते की जी सर्व काही स्वत:चं बरबाद करते आणि पुढे जाते. तशी आपल्याला ती पिढी व्हावं लागेल, आपल्या पुढच्या पिढीला ती पिढी व्हावं लागेल आणि त्याच्या पुढच्या पिढ्यांसाठी आपल्याला सगळं ठेवायचं आहे. कारण आदिवासी भागात आदिवासी जिल्ह्यात जेव्हा आपण येतो तेव्हा आदिवासी एका नेत्यांनी जे काही फार पूर्वी म्हटलं होतं ते आठवतंय– ही जी सगळी निसर्ग संसाधनं आहेत आज ती आपल्याला वाड–वडिलांनी दिलेली भेट नसून, आपल्या पुढच्या पिढ्यांसाठी दिलेलं कर्ज आहे. ही मुद्दल आहे जी आपल्याला सांभाळून ठेवायची आहे आणि फक्त व्याज घेत राहायचंय. आपण काय केलंय? आपण मुद्दलच संपवायला घेतली. याचा आपण या परिषदेत विचार करूया.

मी सुरुवातीला जिंदाबाद नाही म्हटलं ते आता मला म्हणावसं वाटतय.

आरोग्य परिषद जिंदाबाद ! सूर्या नदी जिंदाबाद! शिरगाव सातपाटी चा समुद्र जिंदाबाद! चाहाड्याचा डोंगर जिंदाबाद! आपल्याला हे सगळं जगवायचं आहे, हे जगून आपण त्याच्यासोबत जगणार आहोत एवढच बोलून संपवते धन्यवाद!

indavi62@gmail.com

आता उठवू सारे रान आता पेटवू सारे रान,
शेतकऱ्यांच्या राज्यासाठी लावू पणाला प्राण !
- साने गुरुजी

खास वृत्तांत

NAPM राष्ट्रीय अधिवेशनात पर्यावरण संकटावर गट चर्चा

सुहास कोल्हेकर

NAPM च्या हैदराबाद येथील राष्ट्रीय संमेलनातील क्लायमेट चेंज व श्रमिकांचे प्रश्न या दोन गट चर्चांचे संक्षिप्त अहवाल.

पर्यावरणीय संकट तथा क्लायमेट क्रायसिस या संदर्भातील गटचर्चेत हिमालयापासून ते केरळ पर्यंत अनेक राज्यातील 50 पेक्षा जास्त प्रतिनीधी अत्यंत उत्साहाने सहभागी झाले. त्यांत युवा पिढीचा सहभाग उल्लेखनीय राहिला कारण प्रश्न थेट त्याच्या भविष्याचा आहे. त्यांना या संकटाबद्दल समजून घ्यायचं होतं अन् याला सामोरं जातांनाच येऊ घातलेली हानी कमीत कमी व्हावी यासाठी प्रयत्न करण्याची कळकळ ते व्यक्त करत होते. या विषयातील आंतरराष्ट्रीय किर्तीचे तज्ज्ञ सौम्यदत्ता व आशिष कोठारी यांसारखे जेष्ठ अभ्यासक कार्यकर्त्यांची साथ अन् मार्गदर्शन मिळते आहे, यामुळे एक प्रकारे आश्वासक दिलासाही नक्कीच मिळाला.

चर्चेला सुरवात करतांना सौम्या दत्तांनी मागील आठदहा महिन्यांपासून आपण हा मंचाच्या माध्यमातून हरियाना, राजस्थान, ओडिशा अशा काही राज्यांमध्ये क्षेत्रीय अभ्यास केल्याचे तर महाराष्ट्रांत दि. 30 नोव्हेंबर 2024 ला राज्य स्तरीय बैठक होऊन विविध भागांत कार्यकर्त्यांकरिता कार्यशाळा घेण्याचे आयोजन सुरु केल्यांचे नमूद केले. सर्व सहभागींकडून आपआपल्या क्षेत्रांतील अनुभवांमधून आपल्या पुढील आव्हानं समजून घेणे व परिस्थिती सुधारण्याकरिता काय काय करता येईल यावर चर्चा करणे असा गटचर्चेचा उद्देश असल्याचे स्पष्ट केले.

केरळचे जेष्ठ कार्यकर्ते सी आर नीलकंठन म्हणाले की, वायनाडच्या लँड स्लाईडची घटना ताजी आहे, पण केरळच्या विविध भागांत मागील काही वर्षांत सात वेळा पूर आलेत. सरकार म्हणतंय, आम्ही केरळ क्लायमेट रेझिलियंट म्हणजे पर्यावरणीय सकटांचा सामना करण्यासाठी तयार करतो आहोत, पण चुकीच्या सरकारी उपाय योजनांमुळेच संकटांत वाढ होते आहे. बुलेट ट्रेन, अणुऊर्जा केंद्र, मोठी धरणं याला विकास मानणे या सामान्य समजुती बदलण्याची गरज आहे. कारण असा विकास हेच या संकटाचे मूळ आहे. केरळच्या अरुंद किनारपट्टीतून अरबी समुद्राकडे नद्या वाहतात तो तीव्र उतार आहे, पाणथळ जमिनीचे समुद्र सपाटी खालचे क्षेत्र खूपच संवेदनशील आहे. आमच्याकडे गेली काही वर्षे सतत लहान मोठ्या ढगफुटी होतात. कोची मध्ये मागील शंभरवर्षांत नव्हता एवढा पाऊस कोसळला अन् पूर आला. लोकच उपाय सुचवतात,पण ते मान्य केले जात नाहीत, फक्त टेक्नीकल... कंपन्यांचेच उपाय सरकार मानते याकडे सुध्दा आपण लक्ष द्यायला हवे असा त्यांचा आग्रह त्यांनी व्यक्त केला.

मध्यप्रदेशच्या जागृत आदिवासी संघटनेच्या साथीने सांगितले की, वनहक्काचे दावे प्रलंबित असलेल्या आदिवासींच्या जमिनीवरील झाडांची मोठ्या प्रमाणांत अवैध कत्तल केली जाते आहे व सरकार त्या जमिनी कंम्पन्यांना (कार्बन क्रेडीट कमवण्यासाठी) देण्याचे षडयंत्र रचून पर्यावरणाचे नुकसान करते आहे. बुलेट ट्रेन करिता टनेल खोदण्यासाठी मध्यरात्री विस्फोट केले जातात माझ्या गावांत, त्यामुळे घरांच्या भिंतांना मोठ्या भेगा पडत आहेत, दगड नेण्यासाठी येमाऱ्या वाहनांशी टक्कर होऊन प्राणी मरताहेत, हे सगळं कसं थांबवायचं असा माझा आपणाला प्रश्न आहे असं एकाने मांडले.

हैदराबादच्या साथींनी एकंदरच प्रदूषण व विशेषत: दररोज 12 टन कचरा एकाच डंम्पिंग ग्राऊंडमध्ये टाकला जातो याबद्दल चिंता व्यक्त केली व हे थोपविण्यासाठी सल्ला मिळावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

खनन करणारी कम्पनी जमीन सरकारी म्हणून नुकसानभरपाई सुध्दा देत नाही, सिमेंटप्लँटमुळे गावांत श्वास घेणे देखिल कठीण होते आज.

उत्तरप्रदेशातील आदिवासी क्षेत्रातील रानीपूर अभयारण्याचा विस्तार करुन तिथे व्याघ्र प्रकल्प आणण्याकरितां सरकार 28 ते 30 गावांना प्रभावित–विस्थापित करते आहे, अन त्यांना शेती होऊ शकणार नाही अश्या खडकाळ ठिकाणी ढकलते आहे. केनबेथवा नदी जोड प्रकल्पामुळे बुडणा–या व्याघ्रप्रकल्पातील वाघांना पुनर्वासित करण्यासाठी दहा ठिकाणी प्रयत्न केले जात

आहेत, त्यापैकी हा एक आहे. पूर्वी जशी मोठी धरणं ही आदिवासींना-नैसर्गिक संसाधनांवर जगणाऱ्या समुदायांना विस्थापित करीत होती, तशीच आता ही अभयारण्य ठरत आहेत. या मागला खरा हेतू तर इथे सफारी सुरु करुन पर्यटकांना आकर्षित करणे असणार. अशा सर्व ठिकाणच्या अभयारण्यग्रस्तांच्या लढ्यांना समन्वयाने एकत्र आणून हे मुद्दे पुढे न्यावेत अशी अपेक्षा आहे असे मांडले गेले.

मच्छिमारांना हवामान बदलामुळे तोंड द्यावे लागणारे मुद्दे जानकी या तामिळनाडूच्या महिला कार्यकर्तीने तिच्या स्थानिक भाषेत अत्यंत प्रभावीपणे मांडले. ते तिच्या भाषेपलीकडील हालचाली व हावभावांमुळे आमच्यापर्यंत पोहचले. हिंदी अनुवाद करतांना सी आर ने सांगितले की, मच्छिमार 120 दिवस खोल समुद्रांत जातात. तिथे सिग्नल न मिळाल्याने त्यांना वादळाच्या सूचना देखिल पोहचू शकत नाहीत. यामुळे 80 हून अधिक मच्छिमार मेले. दुसरा महत्वाचा मुद्दा मांडला तो अवैज्ञानिक पध्दतीने बांधल्या जाणाऱ्या बंदरांचा. क्लायमेट क्रायसिसमुळे लाटांचा पॅटर्न बदलेल याची दखल न घेता बांधली जात असलेली बंदरं अनेकांचा जीव घोतील, अशी चिंता तिने व्यक्त केली. या सर्व जीवित वनउपजिविकांच्या नुकसानाकरिता सरकार कोणतीही नुकसान भरपाई सुध्दा देत नाही हे फारच संतापजनक आहे.

राजस्थानतील खनन प्रभावितांमध्ये दीर्घ काळ विविध स्तरावर कार्यरत कैलाश मीनाजी म्हणाले की, 600 किलोमीटर अरवली क्षेत्रांत अत्यंत भयावह परिस्थिती आहे. सिलिकासिसमुळे त्या समुदायांतील प्रत्येक परिवारातील 3 लोक मरण पावले आहेत किंवा मृत्युची वाट बघत आहे. महिला आणि वय वर्ष 2 ते 9 ची बालके अस्थमाची औषधे घेऊन जगताहेत. ब्लॅस्टींगनंतर पाणी भरल्याकारणाने चर्मरोग म्हणजे त्वचेचे आजार यांसह अनेक आजार पसरत आहेत. 2 लाख हेक्टर जमीन बरबाद झाली असे सरकारी कृषी दस्तावेज सागतात. खेती, किसानी तथा पशुपालन या उपजिविका खलास केल्या जात आहेत. रोजगार उपलब्ध नाही म्हणून युवकांमध्ये अपराधीकरण ही समस्या वाढते आहे. पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष वाढते आहे, भूजल पातळी खालवते आहे. हीट व्हेव - तापमानवाढ दिल्लीत झाली तर बातमी बनते पण राजस्थान व उत्तरप्रदेशांत सुध्दा उष्णतेमुळे मृत्यु होत आहेत. आमचे म्हणणे आहे की खनन थांबविले तर पाणी वाचेल. भूजल पातळी उंचावली की थोडी शेती करता येईल अन् रोजगार मिळून लोकांची स्थिती सुधारेल याकडे लक्ष वेधले पाहिजे.

महाराष्ट्राच्या कुरखेडा-कोरची या घनदाट जंगलांच्या गावांत काम करणारे डॉ.सतीश गोगुलवार म्हणाले की, दक्षिण गडचिरोलित खनन केल्यामुळे नद्यांचे पाणी लाल झाले आहे, वनहक्क मिळालेल्या गावंचे जंगल सुध्दा खराब होते आहे, तांदुळाच्या शेतीवर पण असर होणार. आता आमच्या उत्तर गडचिरोलीत सुध्दा असा प्रयत्न केला जातो आहे. ऐंशी टक्के गावांना सामुहीक वनहक्क मिळालेले आहेत, त्यांच्यासोबत आम्ही क्लायमेट बदलामुळे उदभवणाऱ्या संकटांला कसे तोंड द्यायचे याबद्दल प्लॅनिंगचे काम दोन गावांमध्ये करतो आहोत. शेती जगवायची तर कोणते वृक्ष जोपासायचे याचा विचार करतो आहोत.

तेलंगणातील रवी म्हणाले तांदळापासून इथेनॉल बनवण्याची 30 केंद्र तेलंगणांत (बिहरमध्ये 60, भारतात एकूण 300) येणार आहेत, म्हणून तांदुळाची किंमत वाढते आहे. करोना काळांत यांना मंजुऱ्या दिल्यांत. दोनच युनिटस् सुरु झालेत. ते त्यांची घाण नदीत सोडतात, बाहेर विषारी पदार्थ टाकतात व प्रदुषण होते आहे. अमेरिकेतील शास्त्रज्ञांनी नुकतेच सिध्द केले आहे की या प्रक्रियेतून निघणाऱ्या वायुंत कॅन्सर करु शकणारे 2 वायु आहेत. या सर्वाचा परिणाम म्हणजे शेतातील पिकांमध्ये बदल करावा लागतो, फक्त मकाच अशा परिसरांत वाढू शकतो जो हे उद्योगच वापरणार अन् आपल्याला अन्न बाहेरुन बोलवावे लागेल. त्यानी तेलगू पत्रक छापलेले दाखविले; इंग्रजी करुन इतरांनाही ते पाठवतील. केरळ ते उत्तरप्रदेश अनेक राज्यांत हे संकट येऊ घातले आहे. आता छत्तिसगडमध्ये एक सत्यशोधन करणार असल्याचे सौम्यदा म्हणाले.

तमिळनाडूच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या मोनिका म्हणाल्या की,क्लायमेट संकट हे विनाशकारी विकासाचाच परिणाम आहे, सरकारला समग्रविकासाची समज नाही, सामान्य लोकांचे जे ज्ञान आहे ते आपण इंजिनिअर्सना द्यायला हवे तरच न्याय मिळू शकेल असे त्यांनी तमिळ मधून अत्यंत परिणामकारकपणे मांडले. महाराष्ट्राच्या भुसावळ मधील चंद्रकांत भाऊंनी सांगितले की औष्णिक ऊर्जा प्रकल्पांमुळे परिसराचे तापमान वाढते आहे व त्यातून

निघणारी बारीक राख (Ash) यामुळे शेती व त्यातला रोजगार नष्ट होतो आहे. त्याविरोधात दीर्घ काळ संघर्ष सुरू असल्याचे ही सांगितले. सभोवतालचे जंगलावर पण राखेचा दुष्परिणाम होतो आहे व जंगलातील प्राणी गावांत शिरतात, नदीच्या पाण्यातही राख साचते आहे. केळ्याचे उत्पादन 40 टक्के घटते आहे, या सर्वाची भरपाई करावी व 24 तास वीज मिळावी, चांगले पाणी मिळावे म्हणून 12 वर्ष लढा सुरु आहे.

पालघरच्या सुजय मोरे यांनी वाढवण बंदराच्या लढ्याबद्दल सांगितले. सरकार म्हणते या पोर्टमुळे जी जीडीपी वाढणार म्हणजे काय तर झाड तोडून लाकूड विकले म्हणजे जीडीपी वाढतो असे काहीतरी.अत्यंत संपन्न जैवविविधता नष्ट होणार, याचे धोरणकर्त्यांना दु.ख नाही. या बंदराकरिता 12000 चौरस फूट जमीन रिक्लेम करणार आहेत. म्हणजे भराव टाकणार अन 12000 थेट व 6000 अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार असं सांगितलं जातं. पण सध्या तिथे असलेले तीन लाख रोजगार नष्ट होणार आहेत.मच्छिमारांवर संकट आहे, या भागांत मोठ्या इस्च्युरीतील मत्स्य पुनरुत्पादन व मत्स्य अभयारण्य नष्ट होऊन मुंबईत मासळी मिळण्यावर पण परिणाम होणार आहे. मला प्रश्न विचारायचा आहे की, धरण हवं, पोर्ट हवं, एअर पोर्ट हवं अशी मागणी करणाऱ्यांना कसं समजवायाचं, हस्तक्षेप कसा करायचा? चिलका सरोवर परिसरातील महिला कार्यकर्तीने क्लायमेट क्रायसिस मुळे येणाऱ्या अडचणी व स्थलांतरितांच्या समस्या मांडत पोलिटिकल इकॉनोमी असा उल्लेख केला तर लावासाच्या लिलाबाईंनी पुणे जिल्ह्यातील लावासा सिटी प्रकल्पा विरोधातील लढ्यातील स्वानुभव सांगत पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्या तथाकथित विकास प्रकल्पांच्या विरोधी लढ्यासारखा एकजुटीने लढा देण्याचे आवाहन केले. लवासा क्षेत्रांत सुध्दा नुकतीच लँड स्लाईडची घटना घडली होती त्याचा उल्लेख करत केरळच्या सी आर नी आठवण करुन दिली की वायनाड असो की इतरत्रही जमीन वापरासाठी युनायटेड नेशनच्या नियमांची अजिबात अंमलबजावणी केली जात नाही.

गुजरातच्या काकानी सरकार हेलिकॉप्टरमधून विलायती बाभुळच्या (सप्तपर्णी, या जमीन खराब करते म्हणून बँन असलेल्या) बिया फेकून वनक्षेत्र (ग्रीनकव्हर) वाढल्याचे फसवे चित्र उभे करण्याचा खटाटोप करते आहे. अशा फसव्या उपायांपासून सावध राहण्याची सूचना केली. युवराज गटकळने शेतकऱ्यांसोबत काम करण्याचे सुचविले.

अरवलीसंदर्भात काम करणाऱ्या नीलमने हरियानातील निवडणूकीच्या वेळी क्लायमेट जाहीरनामा तयार केल्याचे सांगितले. संकटाचा उपाय म्हणून कार्बन क्रेडिट मिळवण्याकरिता कंपन्या अडचणीतल्या शेतकऱ्यांची कशी फसवणूक करतात याबद्दल मांडले. याला जोडून सुहासताईंनी क्लायमेट क्रायसिस संदर्भात कार्बन क्रेडीट, ग्रीन वाश अशा विविध 25 संकल्पना सोप्या भाषेत समजविण्या करिता महाराष्ट्र गटाने मराठीत काढलेल्या पुस्तिकेबद्दल सांगितले व याचे हिंदी-इंग्रजी भाषांतर करुन देण्याचे आश्वासनही दिले.

काश्मीरच्या डॉ. शेख रसुल खान यांनी अशा पुस्तिकेचे स्वागत करत, आवश्यकता अधोरेखित केली. संकल्पनांच्या स्पष्टतेकरिता राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करुन सरकार लोकांच्या संसाधनांवर डाका घालतो आहे, हे समजवून देण्याची सूचना केली. जम्मू–कश्मीर मधल्या पशुपालकांच्या जमिनीचे चार प्रकार सांगून त्यांची पर्यावरण रक्षणाकरिता असलेली महत्वाची भूमिका सांगितली. सरकार लँड बँकच्या नावाने अशा सर्व व अन्य शेतजमिनी सुध्दा ताब्यांत घेत आहे. पर्यटन आधीच अती आहे, आता रेलसाठी टनेल खोदून नाजूक (तरूण) पहाड धोक्यांत आणले गेले, या ट्रेनसाठी आमचे पहाड,जैवविविधता, पाणी, पशुपालकांची सामायिक जमीन एवढी मोठी किंमत मोजावी लागली. ट्रेनमुळे पर्यटक दहापट वाढणार त्यांच्या व्यवस्थेकरता आमची संसाधने जाणार. हा सर्व विकास आपल्या काश्मीरच्या पर्यावरणाचा नाश करत चालला आहे. खनन, हायवे, आमचे पाणी पळवून वीज निर्मिती करतात पण आम्हाला 12 तास देखिल वीज पुरवठा मिळत नाही. कुठे तर 2 तासच वीज मिळते. भूजलस्तर खालावतो आहे अन् सरकार पाणी–वीज विकते आहे. हे सर्व कमी तर जम्मू–काश्मीर मध्ये वाढते सैनिकीकरण, बॉर्डर संरक्षणाच्या धातुयुक्त लँडमाईनस याने पर्यावरण अन् जनजीवन दोन्ही उध्वस्त होते आहे. राजकीय हितसंबंधा साठी आधीची एकच दिवसाची, फारतर एका सप्ताहाची अमरनाथ यात्रा आता महिनाभर चालवली जाते व त्या काळांत सर्व 50 हजारावर दलित वंचित समूहांना या भागात पशु चारण्याला

देखिल बंदी केली जाते. आमची पर्यावरण स्नेही संस्कृतीच नष्ट केली जाते आहे.

हिमालय क्षेत्रांत क्लायमेट आपत्तीची तीव्रता वाढली आहे, यामुळे आमची जीवनपध्दतीही बदलते आहे. हायवे व अन्य विकास प्रकल्पांमुळे जोशीमठ सारख्या अनेक घटना होतात, पण तिथे लोकवस्ती विरळ असते, त्या बातम्या दडपल्या जातात. सिक्कीम, अरुणाचल हे सीमाक्षेत्राजवळ म्हणून इथे संघर्ष करणे अधिकच अवघड होते आहे अशी मांडणी अनमोलने केली.

प्रिया पिल्ले यांनी मोठ्या केंद्रीत सौर पँनलसाठी जमिनी काबिज केल्या जाणे व त्याचा अन्नसुरक्षेवर परिणाम होणे याकडे लक्ष वेधले. संतोष ललवानी यांनी रीव्हरफ्रंट डिव्हलपमेंट मुळे नदीजवळची जेवविविधता व कांक्रिटिकरणामुळे पर्यावरणाची हानी याकडे लक्ष वेधले. तसेंच टेरी अनेक अभ्यासातून पुढील 50 वर्षांत क्लायमेट क्रायसिसचे भाकित मांडल्याचे सांगितले. रीव्हरफ्रंट सारखे प्रकल्प पुढे नेतांना यांत दिलेले पर्यावरणीय परिणाम लक्षांत घेतले जात नाहीत, जे घ्यायला हवेत अशी आठवण त्यांनी करुन दिली.

हिमालयन क्षेत्रातील आणखीन एका युवा साथीने आठवण करुन दिली की, क्लायमेटचे परिणाम व उपाय या सर्वांत लोक भूमीहीन केले जातात, तेंव्हा त्यांच्या पुनर्वसनाबद्दल काही धोरण ठरविण्याकरिता विशेष बैठक घेतली जावी. तसेंच जंगलांचे खाजगीकरण व सीमा सुरक्षेच्या नावाने व अन्यत्र सुध्दा वनहक्क कायद्याचे उल्लंघन किंवा अंमलबजावणी केली न जाणे या संदर्भातही फोरमने दबावगट म्हणून काम करावे असे सुचविले. सुहासताईंने सुचवले की,क्लायमेट ग्रस्तांना केवळ तातपुरती मदत डिसआस्टर म्हणजे आपत्ती निवारण विभागाकडून दिली जाते पण त्यांना विक्टीम्स...विकासाचे बळी म्हणून अन्य प्रकल्पग्रस्तांप्रमाणे त्यांचे संपूर्ण पुनर्वसन केले जावे, आरोग्य–पोषण– शिक्षण यासह त्यांच्या सर्व हक्कांचा सन्मान केल्या जावा असे ठराव आपण पारित करायला हवेत.

सौम्य दा म्हणाले की, ज्या सूचना आल्यांत त्यापैकी काही गोष्टी आपण मंच म्हणून सुरु केल्या आहेत. आपआपल्या क्षेत्रांत विविध गट काम करत आहेतच,पण ज्या गोष्टी अनेक ठिकाणी होत आहेत तसे मुद्दे आपण मंच म्हणून घ्यावेत. जयराम रमेश पर्यावरण मंत्री असतांना पर्यावरणीय दृष्टीने संवेदनशील भागांना नो गो झोन असे जाहीर केले होते, म्हणजे तिथे कोणतेही प्रकल्प, विनाश होताच कामा नये. आपण मंच म्हणून असे देशभरातील नो गो झोनसचे मॅपिंग करुन त्यांत आदिवासी–वननिवासी तसेंच मच्छिमार अशा समुदायाच्या पारंपारिक हक्कांचा सन्मान व्हावा या मागणीसह, एक संपूर्ण देश भरातील लोकांतर्फे सादर करावे. त्यांनी केलेली दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे वन हक्क कायद्याच्या धरतीवर कोस्टल राईटस... किनारपट्टीवरील लोकांचे हक्क अशा कायद्यासाठी आग्रह धरावा... नँशनल फोरम फाँर स्माल स्केल फिश वर्करस आणि फिश वरकर्स फोरम या दोन्ही मंचांच्यासह. तिसरा मुद्दा ते म्हणाले की, नवीनीकरण उर्जा प्रकल्पां करिता देखिल एनव्हारनमेंट प्रोयेक्शन एक्ट लागू करावा. त्यामुळे मोठ्या सोलर व पवन प्रल्कपांच्या नावे शेतजमीन हडपणे सारखे मुद्दे निकाली काढता येतील. शिवाय राज्य स्तरावर समर्थन व प्रतिसाद गट तयार केले जावेत ज्यांत कायदा, माध्यम व वैज्ञानिक क्षमता असलेले लोक हवेत. ओडिसांत चांगली परिषद झाली, हरियाणांत अभ्यास दौरा झाला. अशी कामं वाढावीत म्हणून स्वत: जबाबदाऱ्या घेण्याकरिता स्वयंसेवक पुढे यायला हवे. सत्यशोधन गटांनी वैज्ञानिक संकल्पना व संदर्भासह दर्जा वाढवायला हवा. अन्य नजर सारख्या मंचांची कायदेशीर दृष्टीने मदत मिळवता येईल. उत्तराखंडमधील 2014 ची आपत्ती आशियातील आत्तापर्यंतची सर्वांत मोठ्ठी पर्यावरणीय संकटामुळे आलेली आपत्ती आहे. त्यावेळी ठरलेल्यांना वन जमीन देण्याच्या दृष्टीने आम्ही प्रयत्न केले. प्रफुल्ल सामंतरानी ग्रामसभेच्या पूर्वसंमतीशिवाय करण्यांत आलेले सर्व व्यापारी लिलाव बेकायदेशीर ठरविल्या जावे यासाठी आग्रह धरायला हवे. तसेंच उद्योगांना साथ देणाऱ्या राज्य व केंद्र सरकारांचा मुद्दा आपण पोलिटिकल बनवायला हवा. तसेच आपत्ती निवारणात हक्कांचा आग्रह धरायला हवा असा सल्ला दिला. यानंतर आशिष कोठारींनी सुचविले की आम्ही असे पत्रक बनवावे की,आम्हाला काय नको आणि काय हवे आहे, हे स्पष्ट करावे. उदापरणार्थ शेतीची, पशुपालनासारख्या उपजीविकांची जमीन कोळसा किंवा सौर किंवा इथेनाँल प्रकल्पाकरिता खेचून घेतली जाऊ नये. दुसरा मुद्दा असा की क्लायमेट क्रायसिसच्या परिणामांच्या नुकसान भरपाई करिता

(पान ३३ वर)

खास वृत्तांत

NAPM च्या ३० व्या राष्ट्रीय संमेलनात श्रमिकांना न्याय मिळवून देण्याचा निर्धार

जगदीश खैरालिया

हैदराबाद येथे १ ते ४ मार्च २०२५ या काळात झालेल्या जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वयात तीन दशकांचा आढावा घेत विविध प्रश्नांच्या सद्यस्थिती वर चर्चा करत येत्या काळात दलित, आदिवासी, शेतकरी, शेतमजूर, स्त्रिया, या कष्टकरी वंचित गटांच्या ज्वलंत समस्या आणि सरकारी धोरणे या बाबतीत विचार विमर्श करून आगामी काळात लढा तीव्र करण्याचा निर्धार केला गेला.

श्रमिकांच्या सद्यस्थिती बाबत चर्चेत अनेक प्रश्न उपस्थित झाले.

- श्रमिकांना न्याय मिळवून देण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर कोणतं ही नेटवर्क उपलब्ध नाही.
- कुशल व नियमित स्वरूपाच्या बारामाही सतत चालणाऱ्या अत्यावश्यक कामांसाठी लागणाऱ्या कायम मनुष्यबळाच्या जागी नेमलेल्या कंत्राटी कामगारांना अतिशय तुटपुंज्या पगारात १२/१२ तास राबविले जात आहे. किमान वेतन अधिनियम पोस्ट bifurcation १९४८ सर्रासपणे पायदळी तुडविले जात आहे.
- स्थलांतरित महिला मजुरांना, मूलभूत सुविधांचा अभाव आणि शोषणरहित अतिशय असुरक्षित परिस्थितीमध्ये काम करावे लागत आहे.
- स्थलांतरित मजुरांची नोंदणी मूळ राज्यात आणि स्थलांतरित राज्यात केली जात नाही. स्थलांतरित मजुरांना आधार कार्डावर दुसऱ्या राज्यात रेशनकार्ड मिळत नाही. वैद्यकीय उपचार सुविधा उपलब्ध नसतात. लहान मुलांची हेळसांड होते,
- पेंशन नाही, भविष्य निर्वाह निधी, राज्य कामगार विमा योजना, सामाजिक सुरक्षा आदी योजनांपासून बहुसंख्य मजूर वंचित आहेत. कंत्राटी कामगारांना सामाजिक सुरक्षा आणि रोजगाराची हमी नाही.
- घरेलू कामगारांना आणि अन्य असुरक्षित कष्टकऱ्यांना ओळखपत्र आणि कामगार म्हणून मान्यता नाही. स्थलांतरित महिला मजुरांसाठी स्थलांतरित ठिकाणी शिशुगृह किंवा दिन–देखभाल केंद्र जिथे लहान मुलांची त्यांच्या पालकांच्या कामाच्या वेळेत किंवा इतर कामांसाठी सोयीस्कररित्या राहण्याची सोय नसते. शिक्षणाच्या वयाच्या मुलांसाठी शालेय शिक्षणाची सोय तसेच महिला मजुर व मुलांच्या आरोग्यासाठी, रेशन इ.व्यवस्था उपलब्ध नसते.
- मनरेगा श्रमिकांना वेतन वेळेवर मिळत नाही, जॉबकार्ड रद्द करण्याचे प्रमाण भ्रष्टाचारा मुळे जास्त आहे. मनरेगा श्रमिकांना १०० दिवसांची मजदुरी जीवन निर्वाह साठी अत्यल्प आहे.
- NMMS ची बायोमेट्रिक हजेरी पध्दत दोषपूर्ण असल्याने, तांत्रिक बिघाडामुळे कर्मचाऱ्यांचे वेतन नाकारले जाते. कामाच्या ठिकाणी शोषण केले जाते.
- कंत्राटीकरणाची जणू सक्तीच केली जात आहे. केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय, निमशासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळाच्या कायमस्वरूपी कामगारांच्या जागी सर्रासपणे कंत्राटदारांमार्फत तुटपुंज्या पगारात कामगार नेमण्याची मोहीम सुरू आहे. कंत्राटी कामगारांना ना भरपगारी रजा ना बँक हॉलिडे, ना ग्रॅच्युइटी.
- चहाच्या गार्डन मध्ये श्रमिकांना सामाजिक सुरक्षा नाही; महिला मजुरांचे शोषण थांबविण्यासाठी कोणतीही उपाययोजना नाही.
- ऊसतोडणी मजुरांना वेळेवर मेहनतांना मिळत नाही. हमालांची मजुरी कमी झाली आहे.
- जबरन VRS योजना लादली जाणे हे जबरदस्तीने सेवेतून निवृत्त करण्यासारखेच आहे.
- स्थलांतरित राज्यात गर्भवती स्थलांतरित महिलांच्या आरोग्याची ओढाताण होते. आधार कार्ड हे राष्ट्रीय पातळीवर गृहित धरून उपचार सुविधा पुरवण्याची व्यवस्था हवी.

या सर्व समस्यांवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर श्रमिकांच्या सशक्तीकरण आणि सामाजिक सुरक्षेसाठी राष्ट्रीय पातळीवर श्रमिक अधिकार लढाई तीव्र करण्याचा निर्धार करण्यात आला. त्या साठी काही उपाय योजना सुचवण्यात आल्या.

- या साठी राष्ट्रीय पातळीवर नॅशनल लेबर नेटवर्क उभारून विविध श्रमिक कार्य गट बनवून Fair wages, pensions and social securityच्या मागणी साठी संघर्ष उभारावा.

● स्थलांतरण पूर्व मजुरांची सुरक्षा आणि मालकांचे दायित्व निश्चित करण्यासाठी रजिस्ट्रेशन बंधनकारक करावे. मालक आणि मजुरांच्या सर्व माहितीची नोंद करावी.

● स्थलांतरित मजुरांना रेशन, आरोग्य सुरक्षा आणि अन्य सुविधा मिळण्यासाठी आधार कार्ड देशपातळीवर ग्राह्य धरण्यात यावे.

● घरेलु कामगारांना ओळख पत्र, श्रमिक म्हणून मान्यता हवी व सामाजिक सुरक्षा हवी.

● श्रमिकांसाठीच्या योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता आणण्यासाठी योजनांचे सामाजिक ऑडिट करण्यात यावे.

संमेलनात निर्धार

● कामगार चळवळ मजबूती साठी स्थानिक ते राष्ट्रीय पातळीवर कामगार संघटना उभारावी.

● कामगार कायदे व कामगारांचे अधिकार या बाबतीत नियमितपणे प्रशिक्षण आणि जनसंवाद मोहीम राबवली जाईल.

● कामगार विरोधी चार लेबर कोड रद्द करण्यासाठी केंद्र सरकार वर दबाव आणण्यासाठी सुरू असलेल्या आंदोलनात सक्रीय सहभागी व्हावे.

● मनरेगा योजनांचे बजेट वाढवावे, या योजनेच्या अंमलबजावणी बाबतीत नियमितपणे सोशल ऑडिटची मागणी लावून धरावी.

● सर्व नोंदणीकृत श्रमिकांसाठी युनिव्हर्सल रेशनकार्ड आणि वैद्यकीय उपचार सुविधा द्यावी, या मागण्यासाठी पुढाकार घ्यावा.

● स्थलांतरण पूर्व मजुरांची सुरक्षा आणि मालकांचे दायित्व निश्चित करण्यासाठी रजिस्ट्रेशन बंधनकारक करावे. मालक आणि मजुरांची सर्व माहितीची नोंद करावी.

● भविष्य निर्वाह निधी, राज्य कामगार विमा योजना आणि पेंशन योजना अंमलबजावणी साठी प्रयत्नशील राहवे.

● मॅन्युअल स्केव्हेंजींग पध्दत बंद व्हावी आणि मानवी मलमूत्र सफाईच्या कामासाठी यांत्रिक पद्धतीचा अवलंब करावा.

● केरळमध्ये मजुरांची नोंदणी केली जाते व सर्व कल्याणकारी योजनांचा लाभ सर्वांना दिला जातो. मात्र अन्य राज्यांच्या सरकारांनी हे धोरण राबवले पाहिजेत. या साठी जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वयातील सर्व संस्था, संघटना आणि जन आंदोलने यांनी संघटितपणे वाटचाल करावी.

Jagdish.khairaliya25@gmail.com

(खास वृत्तांत: पान ३१ वरुन)

पुरेसे बजेट केंद्र व राज्य सरकारांनी ठेवायला हवे. मागेल तेवढी ऊर्जा ऐवजी गरज तेवढी ऊर्जा या धोरण बदला नुसार ऊर्जेचे पुनर्वाटप, विकेंद्रित पध्दतीने ऊर्जा निर्मीतीचा आग्रह याचा अभ्यास करावा. असे एक 5-10 पानी घोषणापत्र बनवून आम्हाला काय हवे, काय नको आणि फक्त सरकारनेच नाही तर आम्ही काय करायला हे ही असावे. सरकार व कम्पन्या यांच्या प्रचारामुळे कार्बन क्रेडिट सारख्या गोष्टींबाबत समुदायामध्ये संभ्रम निर्माण केला जातो आहे, म्हणून सर्वांच्यात जागृतीकरिता सोप्याभाषेत साहित्य तयार करयाला हवे, मघा उल्लेख केलेल्या पुस्तिके सारखे.

मध्यप्रदेशातील नर्मदा काठचे भगवानभाई म्हणतात, आपण प्रकृतीशी खूप छेडछाड केली म्हणून ती रंग दाखवते आहे आपल्याला.

दिल्ली, मुंबई व अन्य शहरांमध्ये प्रदुषण व तापमान वाढीमुळे शहरी गरीब, कष्टकऱ्यांना क्लासमेट संकटाला सामोर जाण्यातकरिता या मंचाची मदत लागेल अशी अपेक्षा व्यक्त करण्यांत आली. राज्यांचे क्लायमेट अक्शन प्लँन व शहरांचे तर क्लायमेट व हीटव्हेव दोन्ही तयार आहेत, म्हणून शहरी गरीबांसोबत काम करणाऱ्याचा पण सहभाग हवा. या मुद्याला सुहासताईने पण दुजोरा दिला.अनमोल म्हणाला की, शहरी लोकांना विशेषत: युवकांना जीवनशैली व विकास अन् पर्यावरण यांचे परस्पराबलंबन पोहचवायला हवे, परस्परांच्या मदतीने. थोड्या खुल्या चर्चेनंतर काही जबाबदाऱ्या घेतल्या गेल्या, शेवटी खालील ठराव व कार्यक्रमांचा पाठपुरावा करण्याचे ठरले.

ठराव पहिला - क्लायमेट क्रायसिसमुळे प्रभावित व बळी ठरलेल्या सर्वांच्या आरोग्य, पोषण, शिक्षण यासह सर्व हक्कांचा सन्मान केला जावा. लहान मुलं, वृध्द, महिला ,अपंग यांचा प्राधान्याने विचार केला जावा. सर्व कष्टकरी–वंचित पर्यावरण संकटग्रस्तांना प्रकल्पग्रस्त मानून त्यांचे संपूर्ण पुनर्वसन केले जावे व याकरिता विशेष बाब म्हणून तातडीने आर्थिक तरतूद–बजेट मान्य करण्यांत यावे असा आमचा आग्रह आहे

ठराव दुसरा - अणुऊर्जेचा क्लायमेट संकटाच्या नावाने ग्रीन ऊर्जा म्हणून प्रचार-प्रसार केला जाऊ नये. ती ग्रीन नाही, क्लीन ही नाही अन् सुरक्षित-सेफ तर अजिवातच नाही. आम्ही सर्व अणुऊर्जेचा तीव्र निषेध करतो.

ठराव तिसरा - सरकार व कम्पन्या प्रचार करीत असलेल्या खोट्या उपायांचे कारस्थान उघडे करत लोकांमध्ये जागृती करण्यासाठी आम्ही कसोशीने सामुहीक प्रयत्न करु.

kolhekar.suhas@gmail.com

आघाडीवर

पंढरपूरमध्ये समता वारी संपन्न

दादासाहेब रोंगे

परमपुज्य साने गुरुजींनी अस्पृश्यांना श्री विठ्ठल मंदिर प्रवेश मिळावा यासाठी दि.०१ मे ते १० मे १९४७ दरम्यान केलेले उपोषण आणि त्या अगोदर लोकमानस घडविण्यासाठी केलेला झंझावाती महाराष्ट्र व्यापी दौरा म्हणजे महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनाला कलाटणी देणारा इतिहास आहे. संतविचार आणि मंदिर प्रवेश सत्याग्रह यामुळेच पंढरपूर हे सामाजिक समतेचे केंद्र झाले आहे.

या सामाजिक समतेच्या लढ्याची आठवण चिरंतन ठेवण्यासाठी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी परमपूज्य साने गुरुजी यांच्या विचारांनी प्रभावीत झालेली मंडळी, स्थानिक मंगळवेढा शहरवासीय, परिसरातील विद्यार्थी, नोकरदार वर्ग आणि परिसरातील ग्रामस्थ मंडळी दि. ८ मे २०२५ रोजी सायंकाळी पाच वाजता मंगळवेढ्यातील श्री. संत चोखामेळा यांच्या समाधीजवळ एकत्र जमली होती. त्या ठिकाणी मंगळवेढ्यातील मोहिनीबुवा हरिपाठ व भजनी मंडळ, काशीविश्वेश्वर महिला भजनी मंडळामधील महिला भगिनी भजन व अभंगवाणी गायन सेवा देण्यासाठी जमल्या होत्या. यावेळी पंढरपूर–मंगळवेढा विधानसभेचे आमदार समाधान आवताडे यांच्या मातोश्री श्रीमती पार्वतीबाई महादेव आवताडे ह्या भजन गायनाच्या सादरीकरणासाठी उपस्थित होत्या. यावेळी 'वारी परिवार' मंगळवेढ्याचे श्री. सतीश दत्तू सर व त्यांचे सहकारी उपस्थित होते. सायं. सात वाजता भजन सेवेनंतर दिंडीची सुरुवात करण्यात आली. श्री संत चोखामेळा समाधी मंडळाचे अध्यक्ष जयराज शेंबडे यांच्या हस्ते संत चोखामेळा यांची अभंग गाथा पालखीमध्ये ठेवून दिंडी श्री क्षेत्र पंढरपूरकडे मार्गस्थ करण्यात आली. संध्याकाळी श्री संत तनपुरे महाराज मठ पंढरपूर येथे मुक्कामास ठेवण्यात आली. या मठातच परमपूज्य साने गुरुजी यांनी अस्पृश्यासाठी श्री विठ्ठल मंदिर प्रवेश मिळावा म्हणून १ मे ते १० मे १९४७ च्या कालावधीत उपोषण केले होते.

प्रतिवर्षीप्रमाणे सर्व मंडळी दि.९ मे रोजी श्री. संत तनपुरे महाराज मठातील संतसेनानी साने गुरुजी स्मारकामध्ये सायं.६ वा. एकत्र जमली. परमपूज्य साने गुरुजींना वंदन करण्यासाठी महाराष्ट्रातील विविध ठिकाणाहून आलेली सानेगुरुजी प्रेमी मंडळी, संतविचार पिठाचे विश्वस्त व परिसरातील विद्यार्थी एकत्र जमले होते. 'खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे' ही प्रार्थना म्हणून प.पू.साने गुरुजींना वंदन करण्यात आले. तद्नंतर 'समतावारी संस्कार' शिबिराचा एक भाग म्हणून कासेगाव (ता. पंढरपूर) येथील लोटस इंग्लिश स्कूलकडे सर्वजण मार्गस्थ झाले. येथे समता वारी संस्कार शिबिरा अंतर्गत परिसंवाद – १ चे आयोजन करण्यात आले होते. परिसंवादाचा विषय होता – 'सामाजिक वास्तव आणि परमपूज्य साने गुरुजी यांच्या स्वप्नातील भारत'. या विषयाची मांडणी ह.भ.प. ज्ञानेश्वर बंडगर महाराज (घेरडीकर) व राष्ट्रसेवा दलाचे माजी कार्याध्यक्ष श्री.राजाभाऊ अवसक (संगमनेर) यांनी केली. या दिवशीच्या चिंतन शिबिराचे उदघाटन कासेगाव येथील श्री. विठ्ठल इन्स्टिट्यूट ऑफ प्रोग्रेसिव्ह एज्युकेशनचे उपाध्यक्ष श्री. भीमराव रोंगे यांच्या हस्ते करण्यात आले तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. विठ्ठल इन्स्टिट्यूट प्रोग्रेसिव्ह एज्युकेशनचे अध्यक्ष श्री हनुमंतराव बागल हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिरोळ नगर परिषदेचे मुख्याधिकारी श्री निशिकांत प्रचंडराव उपस्थित होते. यासाठी महाराष्ट्रातील विविध भागातून आलेले साने गुरुजी प्रेमी, परिसरातील नागरिक, विद्यार्थी व स्वेरी व स्वाईप या शैक्षणिक संकुलातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. परिसंवादाच्या समाप्तीनंतर सर्वजण श्री संत तनपुरे महाराज मठामध्ये अर्थात प.पू.साने गुरुजी स्मारकात एकत्रित आले. या ठिकाणी श्री संत तनपुरे महाराज मठाचे कार्यवाहक ह.भ.प.अनंत तनपुरे महाराज यांनी स्वादिष्ट भोजनाची व्यवस्था केली होती. यानंतर संस्कार चिंतन शिबिराचा दुसरा दिवस संपन्न झाला.

'समता वारी– २०२५ च्या तिसऱ्या दिवशी महाराष्ट्रातील विविध भागातून आलेले प.पू. साने गुरुजी प्रेमी, संतविचार पिठाचे पदाधिकारी, पंढरपूरातील नागरिक व विद्यार्थी सकाळी ठीक आठ वाजता श्री. संत तनपुरे महाराज मठामध्ये एकत्रित आले. प.पू. साने गुरुजींच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. तद्नंतर मंगळवेढ्यातून आणलेल्या श्री. संत चोखामेळा यांच्या अभंगगाथेचे पूजन केले. श्री.संत चोखामेळा यांच्या अभंगगाथेसह सर्वांनी दिंडीने पायी चालत श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिराकडे मार्गक्रमण केले. तेथील श्री संत चोखामेळा महाराज यांच्या समाधीचे दर्शन सर्वांनी घेतले व गीतातून समतेचा जागर केला. त्यानंतर श्री संत शिरोमणी नामदेव महाराज पायरी जवळ

(पान ३६ वर)

डॉ. शरदचंद्र शंकर कुलकर्णी

एक द्रष्टा ज्ञानव्रती

डॉ. शरदचंद्र शंकर कुलकर्णी (जन्म ७ मे १९२६, निधन ७ ऑगस्ट २०१९) यांच्या जन्मशताब्दीचे हे वर्ष (२०२५-२६).

शिक्षण, बँकिंग व्यवस्थापन, ग्रामीण पुनर्रचना, महिला सक्षमीकरण, आजीवन अध्ययन (Life Long Learning) अशा अनेक समाजाभिमुख ज्ञानक्षेत्रांत मनापासून विहरणारा हा ज्ञानतपस्वी. त्यांच्या जीवनकार्याचा आढावा घेताना मन थक्क होते.

त्यांनी १९६१ साली अमेरिकेतील सुप्रसिद्ध पर्ड्यू विद्यापीठातून गुणानुक्रमे Ph. D. पदवी सन्मानपूर्वक मिळविली. त्यानंतर एक वर्ष ETS (Educational Testing Services) या नामवंत संस्थेत काम करण्याची आणि नवीन कौशल्ये शिकण्याची संधी मिळाली. तो अनुभव त्यांना भारतात आल्यावर खूप उपयोगी पडला.

१९६२ साली भारतात (दिल्लीला) आल्यावर नव्यानेच (१९६१ मध्ये) स्थापन झालेल्या NCERT (राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद) या संस्थेत त्यांना सन्मानपूर्वक आमंत्रित केले गेले. तेथे त्यांनी स्वतः विकसित केलेल्या क्रमान्वित अध्ययनाच्या (Programmed Learningच्या) नव्या प्रणालीचे भारतीय शालेय शिक्षणात, अध्यापक प्रशिक्षणात उपयोजन केले. तसेच त्यातील अधिक संशोधन, शिक्षक प्रशिक्षणाच्या नव्या पद्धतींचा (प्रतिमानांचा) विकास, इत्यादी कार्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. अनेक नव्या प्रशिक्षक कार्यकर्त्यांची फळी तयार केली.

१९७० मध्ये National Institute of Bank Management (NIBM) या मुंबईत नव्याने स्थापन होत असलेल्या संस्थेचे ते संस्थापक सदस्य होते. त्यांच्या अनेकविध तंत्रांनी त्यांनी बँकिंग क्षेत्रातील "निवड आणि प्रशिक्षण पद्धतीमध्ये" क्रांती घडवली. जगातील अनेक विकसनशील देशांना त्यांनी आपल्या या क्षेत्रातील ज्ञानाचा लाभ करून दिला.

वयाच्या पासष्टीनंतर मात्र त्यांनी "नारायण आश्रम" (Society for Rural Reconstruction and Education) या संस्थेची स्थापना करून सिंधुदुर्ग जिल्ह्यात ४ क्षेत्रांत (शिक्षण, आरोग्य, जलसंधारण आणि महिला सक्षमीकरण) परिणामकारक कार्य केले, अनेक कार्यकर्ते तयार केले. त्यांच्या कार्याच्या विविध पैलूंवर अनेक नामवंत याच सदरात पुढील ११ महिन्यांच्या पहिल्या सामाजिक अंकात आपले मनोगत व्यक्त करतील.

त्यांच्या या प्रेरणादायी जन्मशताब्दीनिमित्त मन:पूर्वक अभिवादन!

डॉ. वसुधा कामत
पूर्व कुलगुरू, श्रीम.ना.दा. ठाकरसी महिला विद्यापीठ,
सदस्य, राष्ट्रीय शिक्षण धोरण मसुदा समिती

MKCL
MS-CIT
KLiC Courses
iLike

(खास वृत्तांत: पान ३४ वरुन)

जाऊन त्यांचे दर्शन घेतले. मंदिर व्यवस्थापनाच्या योग्य त्या परवानगीने ग्रंथरूपी श्री. संत चोखामेळा यांच्या श्री विठ्ठल पदस्पर्श दर्शनाचा सोहळा पार पडला.

श्री. विठ्ठलाच्या पददर्शन सोहळ्यानंतर सर्व मंडळी श्री संत कैकाडी महाराज मठात एकत्र जमली. संतविचार पीठ पंढरपूरच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय 'संतविचार साहित्य' निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले.

या दिवशीच्या चिंतन शिबीर व बक्षीस वितरण सत्राचे उद्घाटन श्री. विठ्ठल इन्स्टिट्यूट ऑफ प्रोग्रेसिव्ह एज्युकेशनचे अध्यक्ष श्री.हनमंतराव बागल यांच्या हस्ते करण्यात आले तर कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी 'श्रमिक मुक्ती दल'चे नेते श्री. मोहनराव अनपट हे होते. यावेळी श्रमिक सहयोग, चिपळूण या संस्थेचे उपाध्यक्ष श्री. भार्गव पवार हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यानंतर परिसंवाद – २ चे आयोजन करण्यात आले. चिंतनाचा विषय होता. 'संत साहित्य आणि सामाजिक वास्तव'. या विषयाची मांडणी सांगोल्याचे ज्येष्ठ साहित्यिक तथा संत साहित्य आणि विचारांचे गाढे अभ्यासक डॉ. कृष्णा इंगोले यांनी व महाराष्ट्रभर कीर्तन व प्रवचनाच्या माध्यमातून संविधान व पुरोगामी विचारांचा जागर करणारे परळी मधील ह.भ.प श्री.श्यामसुंदर सोन्नर महाराज यांनी केली.

संयोजकांमार्फत उपस्थित सर्वांचे आभार मानून चिंतन शिबिराची सांगता करण्यात आली. तद्नंतर श्री संत कैकाडी महाराज मठ, पंढरपूरच्या वतीने सर्वांना 'महाप्रसाद' देण्यात आला.

दि. ८ मे ते १० मे २०२५ दरम्यान संपन्न झालेल्या 'समतावारी २०२५' च्या आयोजनात संतविचार पीठ पंढरपूर, संतसेनानी साने गुरुजी स्मारक समिती पंढरपूर, श्री ० संत तनपुरे महाराज मठ, पंढरपूर, श्रीसंत कैकाडी महाराज मठ पंढरपूर, श्रीसंत चोखामेळा समाधी मंडळ मंगळवेढा तसेच 'वारी परिवार' मंगळवेढा तसेच श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट (स्वेरी) पंढरपूर व श्री. विठ्ठल इन्स्टिट्यूट ऑफ प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन (स्वाईप), पंढरपूर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

संयोजक: संतविचार पीठ, पंढरपूर
अध्यक्ष: श्री. ह. भ. प. भारत जाधव महाराज
उपाध्यक्ष: श्री. ह.भ.प.ज्ञानेश्वर बंडगर महाराज
सचिव: श्री. दादासाहेब रोंगे
खजिनदार: श्री. सारंग कोळी
विश्वस्त: श्री. राजाभाऊ अवसक
विश्वस्त : श्री. शिवाजी शिंदे
विश्वस्त –श्री. निशिकांत प्रचंडराव

8007553000

(टिप्पणी: पान २२ वरुन)

महत्त्वाच्या आहेत:

• दोषी पोलिसांवर गंभीर गुन्हे नोंदवून त्यांच्यावर फौजदारी खटले चालवावेत.
• त्यांना तत्काळ निलंबित करून स्वतंत्र शाखेकडून चौकशी केली जावी.
• पीडित महिलांना वैद्यकीय, मानसिक, कायदेशीर आणि आर्थिक सहाय्य राज्य सरकारने द्यावे.
• आदर्श शाळेतील शिक्षकांच्या मागण्यांवर तत्काळ कारवाई करावी.
• या घटनेचा अहवाल सार्वजनिक करण्यात यावा आणि लोकशाही मूल्यांची ग्वाही देणारे पावले उचलली जावीत.

हरिंदर बिंदू आणि परमजीत कौर या केवळ शेतकरी संघटनांचे चेहरे नाहीत, तर त्या आवाज आहेत – त्या महिला आहेत ज्या शोषणाविरुद्ध उभ्या राहतात. त्यांच्या सन्मानाला आणि सुरक्षिततेला धोका म्हणजे केवळ वैयक्तिक आघात नाही, तर लोकशाही व्यवस्थेवर घाव आहे. या घटनेने पुन्हा एकदा दाखवून दिले आहे की कायदा आणि सुव्यवस्थेच्या रक्षणकर्त्यांकडूनच जर स्त्रियांवर अन्याय होत असेल, तर शासनाला लोकांचा विश्वास परत मिळवण्यासाठी तातडीने कडक कारवाई करावी लागेल.

meenalutturkar16@gmail.com

To

'शाश्वत विकास न्यास'च्या मालकीचा 'आंदोलन-शाश्वत विकासासाठी'चा हा अंक संपादक, मुद्रक, प्रकाशक मेधा पाटकर यांनी 'श्री गुरुकृपा प्रिंटर्स' १२१, अलाइड इंडस्ट्रियल इस्टेट, राम पंजवानी मार्ग, माहिम, मुंबई ४०००१६ येथे छापून दादर, मुंबई येथून प्रकाशित केला.
प्रेषक : द्वारा केमिकल मजदूर सभा, २९-३०, पहिला मजला, 'ए' विंग, हाजी हबीब बिल्डींग, नायगाव क्रॉस रोड, दादर (पूर्व), मुंबई ४०००१४.